म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. १८५७६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सरस्वती मंदिर सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर,
ठाणे-४०० ६०३
दुरध्वनी - २५४०६७८७

वाचनालय नाटक
१९७१६
७।५।८३

तीन अंकी
स्वतंत्र सामाजिक
नाटक

# सावित्री

जयवंत दळवी

मॅजेस्टिक बुक स्टॉल

'सावित्री' या नाटकाचा प्रथम प्रयोग
कलावैभव, मुंबई, या संस्थेतर्फे
बुधवार, १८ नोव्हेंबर १९८१ रोजी दुपारी ४ वाजता
शिवाजी मंदिर, मुंबई, येथे सादर करण्यात आला.

दिग्दर्शिका । विजया मेहता
प्रकाश-योजना । दिलीप कोल्हटकर
वेशभूषा । न्यू नॅशनल टेलर्स

नेपथ्य । रघुवीर तळाशिलकर
ध्वनिसंकेत । राजा देसाई
रंगभूषा । दत्ता परब

निर्मिती प्रमुख । सौ. माधवी तोंडवळकर
सूत्रधार । मोहन तोंडवळकर

सावित्री । नीना जोशी (कुळकर्णी)
शान्ताबाई । उषा नाडकर्णी
सुषमा । अमिता खोपकर
बाळाराव । नारायण पै
बायजी । सुहासिनी आडारकर

श्यामू । शिवाजी साटम
मानसी । नीरा आडारकर
केटी । मोहन गोखले
सतीश । विराज चिटणीस
अय्या । प्रतिभा कुळकर्णी

या नाटकाच्या तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी
परवानगीसाठी पुढील पत्त्यावर
पत्रव्यवहार करावा.
जयवंत दळवी । १३, विकास । भवानी शंकर रोड । मुंबई ४०० ०२८.

© सौ. उमा दळवी

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४.

पहिली आवृत्ती :
मे १९८२

मूल्य पंधरा रुपये

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ३०.

मुखपृष्ठ :
आदिती दळवी

## जयवन्त दळवी

स. न. वि. वि.

माझा आपल्याशी परिचय नाही. माझ्या कॉलेजच्या दिवसांपासून मी आपल्या साहित्याची एक वाचक आहे. आपली सर्व नाटके मी पाहिली आहेत. 'संध्याछाया' आणि 'बॅरिस्टर' या नाटकांनी मला अस्वस्थ केले होते. कालच आम्ही—म्हणजे मी, माझे मिस्टर आणि आमचे शेजारचे एक जोडपे अशा चौघांनी आपले अलिकडले 'सावित्री' हे नवीन नाटक पाहिले. याही नाटकाने आम्हां सर्वांना अस्वस्थ केले. नाटक पाहून आल्यानंतर रात्री दोन वाजेपर्यन्त आम्ही या नाटकावर भारावून बोलत होतो. या नाटकाचा मला स्वतःला विशेष जाणवला, म्हणजे या नाटकावर मी एकटी विचार करू लागले, की अस्वस्थता खोलवर जाते.

हे नाटक पाहताना आणि पाहून आल्यावर आमच्या मनात थोडा गोंधळ उडाला. त्याचेच निरसन करून घेण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. शक्यतो लौकर उत्तर देऊन आपण या शंकेचे निरसन कराल, अशी आशा आहे.

हे नाटक आम्ही बरेच उशिरा पाहिले. त्यामुळे या 'सावित्री' नाटकावरील वर्तमानपत्रांत आणि साप्ताहिकांत आलेली काही परीक्षणे आमच्या वाचनात आली होती. बहुतेक सर्व परीक्षणांतून हे नाटक करीअर करणाऱ्या, घराबाहेर पडणाऱ्या महत्त्वाकांक्षी स्त्रीची शोकांतिका दाखवते, असे म्हटले होते. त्यामुळे हे नाटक त्या प्रश्नावर असेल, अशी आमची समजूत होती. परंतु नाटक पाहताना, पाहून झाल्यावर आणि विशेष म्हणजे रात्रभर त्यावर चर्चा करताना आम्हांला असे जाणवले, की हे नाटक वेगळ्या प्रश्नावर आहे. करीअर करू इच्छिणारी सावित्री त्यात आहे, हे खरे. पण ते संपूर्ण नाटक तिचे वाटत नाही. त्यादृष्टीने या नाटकास 'सावित्री' हे आपण दिलेले नाव चुकीचे वाटते. माझ्या मैत्रिणीची सूचना आहे की या नाटकाचे 'अरे, संसार संसार' हे नाव हवे होते.

आमच्या मनात प्रश्न आला, ही जर करीअर करणाऱ्या मुलीची किंवा स्त्रीची कथा असेल, तर श्यामू आणि सावित्री यांच्या भोवती अनेक जोडप्यांची का मालिका फिरते? सावित्रीची आई आणि तिचे वडील अय्या—नानाकाका; आत्या बायजी—बाळाराव, शेजारी शांताबाई—साहेब, सुषमा—विश्राम, मानसी—जमन आणि दोन नवरे, पाठी-मागल्या स्मशानात नेमाने येणारी आल्मेडा आणि तिचा मृत नवरा, थडग्यात झोपलेली परेरा आणि तिने खेळवलेले पुरुष, सुषमाची पळून गेलेली मुलगी वैशाली आणि तिचा प्रियकर अशी किती तरी जोडपी प्रत्यक्ष येतात, काही नुसत्या उल्लेखाने येतात. आणि सर्वांत महत्त्वाचा केटी आणि त्याची बायको रोहिणी! फक्त करीअर करणाऱ्या सावित्रीचा हा प्रश्न असता, तर इतकी जोडपी कशासाठी आली असती? ही सर्व जोडपी आणि त्या जोडप्यांतले भागीदार वेगवेगळ्या प्रकारांनी आपल्या व्यथा का मांडतात? आम्हांला वाटते, ही सर्व पात्रे संसारातल्या आपापल्या व्यथा मांडतात. एकदाच कोठे तरी मध्येच स्मशानाकडे बघत सावित्री सुषमाला विचारते, की या

संसाराचा अर्थ काय? नवरा आणि बायको यांच्यांतील नात्याचा अर्थ काय? (प्रत्यक्ष संवाद आठवत नाहीत; पण ते याच अर्थाचे आहेत.) या दोन प्रश्नांभोवती सर्व नाटक फिरते, असे मला वाटते.

शान्ताबाईची जीवनात कसलीच अपेक्षा नाही. ती देवाला मानावे, तसे नवऱ्याला मानते. ती सुखी आहे का? बाळारावांना बाहेर बाई ठेवण्याची इच्छा आहे, पण धीर होत नाही. ते बायजीला फ्रिजिड म्हणतात. बायजीला संशय येतो : बाळारावांनी बाहेर बाई ठेवली आहे. तरी दोघे एकत्र राहतात. का? सुषमा विश्रामशिवाय जगता येणार नाही, म्हणून घरदार सोडून पळाली; पण आता तिला संसारात रस नाही. का? केटीचा प्रेमविवाह; पण तो बायकोला सोडून सावित्रीबरोबर राहतो आणि वय उताराला लागताच तिला सोडून आपल्या बायकोमुलांत जातो. का? आपल्याप्रमाणे आपल्या मुलीने कुणाचा हात धरून पळू नये, म्हणून डोळ्यांत तेल घालून सुषमा जपते. का? तरी ती मुलगी पळून जाते. का? आणि अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांमागे ती आल्मेडा. ती अनेक वर्षे अविवाहित राहून पाठीमागल्या स्मशानात येते आणि आपल्या नवऱ्याच्या थडग्यावर मेणबत्त्या लावते. का? आणि मानसी. नवऱ्याची गुलामगिरी मानणार नाही, म्हणून दोन नवरे सोडते. मित्र गाठते. ती तरी सुखी आहे का? का आणि का? असे किती तरी प्रश्न मनात येतात आणि मन अस्वस्थ करतात. मग मनात प्रश्न येतो : या सर्व प्रश्नांच्या संदर्भात करीअर करणाऱ्या किंवा घराबाहेर पडणाऱ्या मुलीचा प्रश्न कुठे आहे? की आमचेच काही चुकते आहे?

आम्हांला हे जे वाटले, ते योग्य आहे, की या नाटकात करीअर करणाऱ्या स्त्रीचाच प्रश्न आहे?

– आपण आमच्या शंकेचे निरसन कराल का?

लहान तोंडी मोठा घास घेतला, तर आपणांस राग येईल का? दोन गोष्टी आम्हां सर्वांना खटकल्या. या नाटकाचे 'सावित्री' हे नाव चुकीचे आहे. तसेच या नाटकाचा शेवटही चुकीचा आहे. 'संध्याछाया', 'महासागर' आणि आता 'सावित्री.' या तिन्ही नाटकांत तुम्ही पात्रांना आत्महत्या करायला लावल्या आहेत. तिन्ही ठिकाणी या आत्महत्या चुकीच्या आहेत. मला वाटते, बायजी, सुषमा आणि आल्मेडा जश्या आपले शोकाकुल आयुष्य रेटतात, तसेच ते सावित्रीनेही रेटायला हवे होते. या अनाहूत सल्ल्याचा आपणांस राग येणार नाही, अशी आशा आहे. आम्ही आपल्या उत्तराची वाट पाहत आहो.

मुंबई ५०

आपली नम्र

×××

[प्रेक्षकांकडून वेळोवेळी आलेल्या काही पत्रांतले हे एक नमुनेदार पत्र. पत्र-लेखिकेच्या संमतीने छापले आहे. नाव छापण्यास संमती नव्हती. पत्र जसेच्या तसे छापण्यास परवानगी दिल्याबद्दल आभार. – ज. द.]

# अंक पहिला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९८७१८ नों. दि. ७।५।८३
वि. नाटक क्र.

[ मध्यमवर्गीय वस्तीतली, पहिल्या मजल्यावरची तीन खोल्यांची जागा. रस्त्याच्या बाजूला एक चिंचोळी गॅलरी आहे. रस्त्याच्याच दिशेला उभ्या लोखंडी गजांची एक खिडकी आहे. हॉलच्या मधोमध आतबाहेर जाण्याचा मुख्य दरवाजा. डावीकडे रस्ता, गॅलरी. उजवीकडे आणखी एक उंच खिडकी आहे. त्या खिडकीतून पाठीमागे पसरलेले ख्रिश्चन लोकांचे स्मशान दिसते. ते स्मशान आता वापरात नाही. उजवीकडे दरवाजा आहे. तो दरवाजा स्वैंपाकखोलीत आणि बेडरूमकडे जातो.

श्यामू खांडेकर आणि त्याची बायको अपर्णा कालच या जागेत राहायला आलेली आहेत. श्यामू वयाने साधारणतः तीस वर्षांचा असून तो इंग्रजीचा प्राध्यापक आहे. त्याची बायको अपर्णा वयाने पंचवीस वर्षांची असून नोकरी करणारी आहे. तिला तीन–चार वर्षांचा मुलगा आहे.

पडदा वर जातो, तेव्हा हॉलमधले सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले आहे. अर्थात, सर्व सामान– संसार नवाच असल्यामुळे किरकोळ आणि गरजेपुरते आहे. एक जुने, साधे टेबल. त्यावर दोन–तीन पुस्तके आणि एक टाइमपीस. एका स्टुलावर कव्हरात गुंडाळलेला टेबल-फॅन. दोन–तीन फोल्डिंग खुर्च्या. सहज इकडे तिकडे हालवता येतील, अशा दोन बैठका. छोट्या दिवाणासारखा बाक. दोन ट्रंका. एखादा भरलेला गोणपाट. आणि एक आरशाचे कपाट.

पडदा वर जाता जाता अपर्णा कपाट लावताना दिसते. साड्या,

बोचकी वगैरे लावून ठेवते आहे. तसे करीत असताना एक चाळा म्हणून जरीबुट्टीचा एक नऊवारी भरजरी शालू तिने अंगाभोवती गुंडाळला आहे. नाकात नथ घातली आहे आणि ती आरशासमोर उभी राहून, हाताने स्पर्श करीत स्वतःचे शरीर – छाती, कंबर वगैरे न्याहाळीत आहे. पार्श्वभूमीला अपर्णाच्याच आवाजातले जुने सैगलचे गाणे टेपवर सुरू आहे....' झुलना झुलाव झुलावो रे...अंबुवा के डारी पे कोयल बोले...' तेवढ्यात स्मशानातून प्रार्थनेचा आवाज ऐकू येतो. ती तशीच खिडकीकडे जाते. बाहेर पाहते. टेबलावरचा टेपरेकॉर्डर बंद करते. खिडकीतून बाहेर बघते आणि खिडकी घाबरून बंद करते.

तेवढ्यात दार लोटून शेजारच्या शांताबाई येतात. त्या पन्नाशी उलटलेल्या प्रौढ बाई आहेत; पण रुबाबदार आहेत. अंगाने चांगल्या जाडजूड – नऊवारी नेसण. डुलत डुलत पण घाईघाईने चालण्याची सवय. सुखासीन, संसारी बाई. त्या येतात, त्या घाईघाईने येतात – अपर्णाच्या कपड्यांकडे पाहून एकदम दचकतात. ]

शांता० : ( अपर्णाला शरीरभर न्याहाळीत ) हे, हो, आणखी काय ?

अपर्णा : ( चटकन् नथ काढते. हसत, शालू सोडत ) उगाच आपला चाळा ! कपाट लावीत होते....जुना शालू हाताला लागला....म्हटलं, पांघरू जरा ! कुठं नेसायचा योग येतोय् ?

शांता० : ( शालूचा पोत बघून ) भारीपैकी दिसतोय...

अपर्णा : जुना आहे...आईचा....

शांता० : अर्पणाबाई....

अपर्णा : ( हसत ) अर्पणा नाही ! अपर्णा माझं नाव ! कालपास्नं सांगत्येय्, शांताबाई....अ–प–र्णा....!

शांता० : ( हात उडवीत ) असू दे, हो ! अपर्णापेक्षा अर्पणाच नाव आवडतं मला ! अर्पणा म्हणजे नवऱ्याला अर्पण केलेली !...अपर्णाचा अर्थ काय ? सांगा, काय अर्थ ?

अपर्णा : ( गोंधळते) अर्थ.. कोण जाणे, काय अर्थ ? ( हसते. )

शांता० : विचारा तुमच्या श्यामरावांना ! प्रोफेसर आहेत ना ? ( एकदम जीभ

बाहेर काढून, लाजत ) प्रोफेसर नाहीत ना घरी ?

अपर्णा : आला नाही अजून कॉलेजातून....

शांता० : अरे, कर्मा ! नवऱ्याला अरेच म्हणता ?

अपर्णा : ( हसत ) हो ! त्यानंच सांगितलंय्....

शांता० : बरं आहे ! ( सामानाकडे बघत ) अजून लागायचंय् वाटतं, सगळं सामान ?

अपर्णा : लावतेय् हळू हळू....

शांता० : तसा नवाच दिसतोय् संसार....

अपर्णा : नवाच तर काय ?

शांता० : इथं यायच्या आधी कुठं राहात होतात ?

अपर्णा : दादरला ! बायजीकडे ! बायजी, म्हणजे माझी आत्या...

शांता० : काल आल्या होत्या, त्या का ?... जाडशा... आणि त्यांचे यजमान चिरूटवाले....

अपर्णा : ते बाळाराव !.... तिथं, त्यांच्याकडंच वाढले मी ! लग्नानंतरही तिथंच होते.

शांता० : का ? प्रोफेसरांना घर नव्हतं ?

अपर्णा : होती त्यांची एक खोली चाळीत ! होती, म्हणजे आहे अजून ! ठेवलीय् तशीच ! श्यामूची पुस्तकं वगैरे तिथंच आहेत !... पण मी नाही तिथं राहिले कधी....

शांता० : का ?

अपर्णा : ब्लॉकमध्ये राहायची सवय ! चाळीत कोण, हो, राहील ? टमरेल घेऊन सकाळी रांगेत उभं राहायचं !.... शी: ! ( शांताबाई हसते. ) बायजीचा मोठा ब्लॉक आहे....तिथंच मी राहात होते.

शांता० : आणि प्रोफेसर ?

अपर्णा : तो कधी खोलीवर, कधी बायजीकडे...

शांता० : पण काल तुम्ही इथं सामानसुमान घेऊन आलात, तर तुम्हांला सांगते, अर्पणाबाई, आम्हांला खूप...म्हणजे खूपच आनंद झाला ! आमचे साहेबसुद्धा म्हणाले, जोडपं सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहे ! तुम्ही येण्या-आधी इथं जी फॅमिली राहात होती ना ! ( कपाळावर हात जोडतात. )

अरे, परमेश्वरा! नको, रे, बाबा, असली माणसं जन्माला घालूस!

अपर्णा : कुणी तरी सरकार म्हणून होते ना?

शांता० : नावाचे सरकार! पण होते विरोधी पक्ष! म्हणजे असं आमचे साहेब म्हणायचे...अगदी विरोधी पक्षासारखे भांडायचे, हो...नवरा–बायको! साहेब त्यांना विरोधी पक्षच म्हणायचे! (अपर्णा हसते.) हसता, हो काय? त्या सरकाराचा एक म्हातारा मामा होता... (हात जोडून) परमेश्वरा, असला मामा कधी कुणाला देऊ नकोस!

अपर्णा : का? काय करायचा?

शांता० : काय करायचा! अरे, परमेश्वरा! अहो, खुर्ची टाकून या गॅलरीत बसायचा! तू गॅलरीचं भाडं भरतोस...गॅलरीत बस! पण गॅलरीतनं रस्त्यावर थुंक थुंक थुंकायचा! दिवसभर! रस्ता काय तुझ्या बापाच्या मालकीचा आहे! आमच्या साहेबांना तर खूपदा वाटायचं, त्याला जाऊन विचारावं काय, हो, हा रस्ता काय तुमच्या बापाचा आहे?

अपर्णा : विचारलं?

शांता० : विचारलं नाही! त्यानं 'होय' म्हटलं, तर काय घ्या! पण थुंकायचा म्हणजे, थुंकणं हेच आयुष्याचं ध्येय असल्यासारखा थुंकायचा... असं आमचे साहेब म्हणायचे! (थांबून सामानाकडे बघत) तुम्हांला सामान लावायचंय्...काही मदत करू?

अपर्णा : नको! लावते मी...

शांता० : मग तुमच्या छोट्या छब्याला घेऊन जाऊ का?

अपर्णा : सतीश त्याचं नाव....

शांता० : असू दे! छब्याच नाव आवडतं मला.... (बेडरूमकडे जात) आत झोपलाय् का?

अपर्णा : नाही....त्याला बायजीच्या घरी ठेवून आलेय्...नाहीतर सामान लावायला द्यायचा नाही.

शांता० : अहो, मी सांभाळला असता त्याला! माझा तरी वेळ कुठं जातोय्! साहेब कामावर....मुलं दोन्ही कॉलेजात!

अपर्णा : तुमचे साहेब नोकरीला कुठं?

शांता० : मुरारजी गोकुळदास! सायझिंग मास्तर आहेत! 'मास्तर' नाव

असलं, तरी हुद्दा वरचा आहे, हां! तुम्हांला कधी कापड चोपड लागलं, तर सांगा मला...! कापून देईन....तुमच्या बायजींचे साहेब काय करतात?

अपर्णा : बाळाराव कस्टममध्ये आहेत...अ‍ॅप्रेझर आहेत!

शांता० : मुलंबाळं काय?

अपर्णा : त्यांना मूलबाळ नाही! ...म्हणूनच सतीशला ती ठेवून घेते!

शांता० : तुम्हांला मुलं किती?

अपर्णा : हा एकच!...तरी आमची जरा घाईच झाली! आम्हांला ही हक्काची जागा मिळाली, म्हणजे मग मूल झालं असतं ना...

शांता० : काय नाय; हो! बरीचशी चांगली कामं घाईघाईतच होतात! असं आमचे साहेब म्हणतात! आमचा अरुण आता इंटरला आहे! त्याच्या वेळेला सुद्धा साहेबांना मी हेच म्हटलं होतं....तुमची सगळीकडे घाई! तेव्हा आमचे साहेब सुद्धा म्हणाले होते...जगातली सगळी चांगली कामं घाईघाईतच होतात.

अपर्णा : खरं असणार!

शांता० : साहेब म्हणतात, म्हणजे खरं असणारच! अहो, त्या वेळेला आमच्याकडे माणसं किती? साहेबांचे लग्नाचे दोन भाऊ. लग्नाच्या दोन बहिणी. शिवाय सासू आणि सासरे! सगळी पुरुषमंडळी हॉलात! सगळ्या बायका आतल्या खोलीत! (आनंद होऊन हसते.) घड्याळात एकाचा टोला होईपर्यंत जागं राहायचं...मग साहेबांनी स्वैंपाकघरात माठातलं पाणी घेतलं...माठाला ग्लास आपटला, की...मी स्वैंपाकघरात यायचं...ठरलेलं! (एकदम लाजून पदरात तोंड लपवते.) सगळी घाई घाई, गे, बाई! पण ते गमतीचे दिवस होते, हो! (हसत जाते, पण मध्येच थांबून)...आणि गंमत, हो, काय? एकदा मी घड्याळाचा लंबकच थांबवून ठेवला होता... पहाटे पाच वाजेपर्यंत साहेब टोल्याची वाट बघत होते. (हसते.)

[ अपर्णा भिंतीवर एक खिळा मारते. आणि त्यावर आपल्या वडिलांचा—नानाकाकांचा—फोटो अडकवते. मानेपर्यंत त्यांचे केस रुळत आहेत. चेहरा रुंद आहे! ती तो फोटो लावते. आणि थोड्या दुरून फोटो पाहात असताना वरच्या मजल्यावरची सुषमा दार लोटून आत येते. ही

पस्तीसएक वर्षांची आहे. पण थोडी स्थूल आणि थकलेली आहे ! पण दिसायला मात्र देखणी आणि तरतरीत आहे. डोळ्यांभोवती पुसटशी काळसर वर्तुळं आहेत. कानशिलांवरील केसांवरही किंचित रुपेरी झाक आली आहे. ती आत येताच– ]

अपर्णा : या, सुषमाबाई !

सुषमा : वर चालले होते...म्हटलं, दरवाजा उघडा आहे....बघावं....! शांताबाई काय करताहेत ?

शांता० : शांताबाई काय करणार ? बडबड !

[ सगळ्या जणी हसतात. ]

सुषमा : ( हलक्या आवाजात ) मिस्टर आहेत ?

अपर्णा : नाही ! तो कॉलेजला गेलाय् !

सुषमा : तुम्ही आज काय, सुट्टी ?

अपर्णा : काय करणार ? एवढंसं सामान आहे, पण ते लागता लागत नाहीए !

शांता० : ती लग्नाच्या जेवणातली माणसं असतात ना...कितीही माणसं जेवून गेली, तरी थोडी माणसं आपली जेवणाची वाट बघत बसलेलीच असतात...तशी ही बोचकी आहेत.. लाव लाव लावून ठेवली, तरी शिल्लक आहेतच !

[ सर्वजणी हसतात. ]

सुषमा : काल तुम्हांला तुमच्या त्या आत्या...बायजी ना ? त्या तुम्हांला कुठल्या नावानं हाक मारीत होत्या, हो ?

अपर्णा : ( हसत ) सावू...सावू... ! सावू म्हणते ती मला ! माझं माहेरचं नाव सावित्री ! वटपौर्णिमेचा जन्म माझा.

शांता० : खरंच ? उद्या वाढदिवस ! उद्या वटपौर्णिमा !.. आपण साजरा करू ...म्हणजे साजरा होणारच !

सुषमा : शांताबाई सगळ्या बायकांना ओढून उद्या सकाळी नेणारच वटपूजेला ! त्या इराण्याच्या हॉटेलच्या पलीकडे वडाचं मोठं झाड आहे !

शांताबाई म्हणजे लीडर आहेत इथल्या ! उद्या सगळ्यांनी नऊवारी नेसायला पाहिजे. आम्ही मोर्च्यानंच जातो आणि वडाला घेराव घालतो. ( हसते. )

अपर्णा : ( हसते ) आणि नऊवारी नसलं, तर ?

शांता० : तुमच्याकडे आहे की ! मग्राशी पांघरलं होतंत, ते !

सुषमा : कुणाकडे नसलं, तर शांताबाई आपलं देणार !...हाच नवरा जन्मोजन्मी मिळो, म्हणून हे व्रत केलंच पाहिजे ! शांताबाई त्याशिवाय सोडायच्याच नाहीत !

शांता० : आपलं बायकांचं व्रत आहे ते ! नाय ? करायला पाहिजे ! (एकदम आठवण होऊन ) अग, बाई ! वाजले किती ? साहेब्र येतील इतक्यात ! मी चालले ! तुमचे प्रोफेसर श्यामराव आले, की मला सांगा हां ! जरा काम आहे...( घाईघाईने जाते. )

सुषमा : ( स्मशानाकडील खिडकी उघडत ) खिडकी उघडते. छान वारा येतो इकडनं....

अपर्णा : पलीकडे ते स्मशान नसतं, तर किती बरं झालं असतं. नाही ?... रोज आपलं मृत्यूच्या सावलीसारखं...

सुषमा : पण ते आता वापरात नाही ! फक्त जुनी थडगी आहेत...झाडी बघा ना, किती वाढलीय् ? नेहमी पोरं पतंग उडवतात तिथं...काही विद्यार्थी अभ्यास सुद्धा करतात थडग्यांवर बसून !

[ स्मशानात अल्मेडाबाई प्रार्थनेसाठी आलेली दिसते. तिला दोघी पाहतात. ]

अपर्णा : ती बाई कोण, हो ?

सुषमा : अल्मेडाबाई ! वारंवार येते. तिचा नवरा अठ्ठाविसाव्या वर्षी अपघातात गेला, म्हणे. इथं येते. मेणबत्त्या लावते. सतत गेली दहा वर्षं येतेय्— ( थांबून ) संध्याकाळ झाली, की पोरं–पोरी दिसतील तुम्हांला...थडग्यांमागं लपून प्रेम करतात ! ( गज धरून काही क्षण बघत राहते. तिच्यामागे उभी राहून अपर्णाही थडगी बघते. ) तुम्ही कधी असं लपून छपून प्रेम केलंय्, की नाही ! ( हसते. )

अपर्णा : छे, हो ! श्याम् एकदा रविवारी घरी आला आणि त्यानं सरळ मला मागणी घातली ! झालं लग्न ! ( हसते. ) लपणार कुठं ? आणि प्रेम करणार कुठं ?

सुषमा : सुखी आहात ! ( बाकड्यावर बसते. )

अपर्णा : काल मी तुम्हांला पाहिल्यापासून विचार करतेय, सुषमाबाई... मी काल बायजीला सुद्धा म्हटलं...तुमचा चेहरा मला ओळखीचा....पूर्वी पाहिल्यासारखा वाटतोय् !

सुषमा : ( खूश होऊन ) तुम्ही कुठं तरी मासिकातनं वगैरे माझे जुने फोटो पाहिले असतील....जाहिराती...किंवा कॅलेंडरवर... बारा-तेरा वर्षांपूर्वी ....म्हणजे तुम्ही शाळेत असताना विशाखा नटीचं नाव ऐकलं होतं ?

अपर्णा : ( आश्चर्यचकित होऊन ) अय्या....विशाखा ? म्हणजे 'बदलते दिवस' या सिनेमात....विशाखा आणि विश्राम...पॉप्युलर जोडी !

सुषमा : ती विशाखा मी ! आणि विश्राम माझा नवरा !

अपर्णा : सिनेमातला नवरा !

सुषमा : आणि खरा सुद्धा....

अपर्णा : म्हणजे विश्रामशी तुमचं लग्न झालंय् ?

सुषमा : तसं म्हणजे लग्न झालेलं नाही ! पण आम्ही लग्न झाल्यासारखे एकत्र राहतो....आम्हांला एक मुलगी आहे.... वैशाली...

अपर्णा : केवढी आहे ?

सुषमा : बारा वर्षांची आहे ! सातवीत आहे !

अपर्णा : हाऊ लकी यू आर् ! अगदी नशीबवान आहात !

सुषमा : का ?

अपर्णा : विश्रामसारखा नवरा.. विश्राम किती चिकणा आहे, नाही !

सुषमा : ( विषादपूर्वक हसत ) चिकणा होता !...हल्ली तुम्ही त्याला पाहिलेला नाही ! होल्डॉल भरल्यासारखा फुगलाय् ! नाटकाच्या दौऱ्यावर गेलाय्... आला, म्हणजे बघा ! तुम्हांला ओळखता नाही येणार... ( नानाकाकांचा फोटो बघत ) हा फोटो कुणाचा, हो ?

अपर्णा : नानाकाकांचा— माझ्या वडलांचा !

सुषमा : कुठं असतात ?

अपर्णा : त्यांना जाऊन खूप वर्षं झाली ! गाण्याचा क्लास होता त्यांचा....

सुषमा : तुम्ही शिकलात गाणं ?

अपर्णा : थोडंसं ! मी अकरा वर्षांची असतानाच गेले नानाकाका ! नाहीतर खूप शिकले असते ! भावगीतं वगैरे म्हणत होते....

सुषमा : आणि तुमच्या आई ?

अपर्णा : (क्षणभर थांबून, दुःखानं) पळून गेली ! आमच्याच क्लासमधल्या मुसलमान तबलजीबरोबर ! ती गेली आणि वर्षभरात नानाकाका गेले. धक्का सहन झाला नाही त्यांना !

सुषमा : सॉरी. मी तुम्हांला हे विचारायला नको होतं.

अपर्णा : छे, हो ! नाहीतरी तुम्हांला कळलंच असतं कधी ना कधी ! आणि खरं म्हणाल, तर आता मला फारसा त्रासही होत नाही.

सुषमा : येतात कधी भेटायला ?

अपर्णा : कोण ? अय्या ? आई ? अय्या म्हणायची मी तिला...छे ! नानाकाका गेल्याचं कळलं, तेव्हा एकदा आली होती ! पण त्यावेळी सगळ्यांनी हाकलून लावली तिला ! बायजीकडे येणं तर शक्यच नव्हतं....फाडून खाल्ली असती तिला बायजीनं....(विषय बदलावा, म्हणून) हल्ली तुम्ही नाही सिनेमात काम करीत ?

सुषमा : (विषादपूर्वक) छे ! आता नोकरी.... जेठाभाई सॉलिसिटर्स .... नोकरी आणि संसार ! 'अरे, संसार संसार' मधला संसार ! (विकट हसते.)

अपर्णा : नोकरीची गरज आहे, म्हणून नोकरी ? की....

सुषमा : गरज....गरज ! अहो, विश्रामला कामं कुठं मिळताहेत ? माझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी मोठा आहे ! पन्नाशीला आला ! आता त्याला कुठं कामं मिळताहेत ? सिनेमांत नाहीत, नाटकांत नाहीत ! कुठं तरी जुन्या नाटकांत काही तरी मिळतं....हल्ली 'बेबंदशाही'त काही तरी करतो....दौऱ्यापुरते थोडे प्रयोग आहेत....शाश्वती काही नाही ! म्हणून मी बावळे मोडेपर्यंत टायपिंग करते जेठाभाईकडे !

अपर्णा : आज गेला नाहीत ?

सुषमा : आज अंग दुखायला लागलं ! म्हटलं, झोपून दिवस काढायचा ! राहिले घरीच ! विश्राम दौऱ्यावर आहे, म्हणून विश्रांती....नाहीतर बघायला

नको...जाते मी...आता वैशाली येईल शाळेतनं....खाली जाऊन त्या इराण्याकडून थोडी बिस्किटं आणून ठेवते....( जाता जाता टेबलावरील घड्याळाकडे बघते आणि दचकते. ) अग, बाई ! सहा वाजले ?

अपर्णा : ( हसत ) ते सकाळचे सहा आहेत ! त्या घड्याळाकडे पाहायचं नसतं ! स्मृतिचिन्ह आहे ते ! जुनी आठवण ! श्यामूचे वडील मॅट्रिक पास झाले होते, तेव्हा त्यांच्या वडिलांनी ते त्यांना बक्षीस दिलं होतं ! ऐतिहासिक आहे ते–भवानी तलवारीसारखं ! श्यामू दर सहा महिन्यांनी तीस–पस्तीस रुपये दुरुस्तीत घालवतो. ( हसते. )

सुषमा : ( हसत ) पण चालत नाही ?

अपर्णा : चालतं ! म्हणजे काटे फिरतात...पण टाइम कळत नाही !

सुषमा : मग ते माळ्यावर का नाही टाकत ?

अपर्णा : छे...छे ! श्यामू आपलं रिस्टवॉच पाहणार...आणि या घड्याळाचे काटे फिरवीत बसणार ! उद्योगच आहे त्याचा तो !

सुषमा : ( हसते. जायला वळता वळता ) येते ! वेळ मिळेल, तेव्हा या वर.... गप्पा करू !.... आमची नाटकं–सिनेमांच्या फोटोंची...परीक्षणांची फाईल दाखवीन तुम्हांला....ते सगळं जुनं बघायला गंमत वाटते....

अपर्णा : हो...हो...येईन एकदा संध्याकाळी !

[ सुषमा जाणार, तोच... दार लोटून श्यामू येतो. श्यामू दिसायला उमदा आणि तरतरीत आहे ! सर्वसाधारणपणे प्राध्यापकाला शोभेल, असा पोशाख. पँट, बुशशर्ट ! डाव्या हातात ब्रीफ केस आणि उजव्या हातात दोन जाडजूड ग्रंथ. आत येताच तो दोघींच्याकडे बघून वाकून अदबीने हसतो. ]

अपर्णा : या सुषमा अमृते ! वर राहतात !...हे श्यामराव खांडेकर...इंग्रजीचे प्रोफेसर...सी. बी. कॉलेज !

श्यामू : नमस्कार ! ( सुषमाही नमस्कार करते. )

अपर्णा : श्यामू, तुला ' बदलते दिवस ' हा काही वर्षांपूर्वी गाजलेला सिनेमा आठवतो ?

श्यामू : नाही !

अपर्णा : विशाखा आणि विश्राम ही नावं तरी आठवतात ?

श्यामू : ( विचार करीत ) विशाखा...अं... अं.... अं... ( त्याला काहीच माहीत नसते. )

अपर्णा : त्या विशाखा याच...आणि विश्राम यांचे मिस्टर !

श्यामू : ( विशेष रस नाही ) हो, का ? अरे, वा !

सुषमा : आत्ताच आम्ही तुमच्या या घड्याळाबद्दल बोलत होतो.

श्यामू : हो ऽ हो ऽ ! फार जुनं घड्याळ आहे हे....असलं मशीन आता पैसे टाकले, तरी मिळायचं नाही ! जुनं मशीन आहे...( टेबलाजवळ जातो. ...आणि आपले रिस्टवॉच पाहात घड्याळाचे काटे फिरवतो. त्या दोघी मोठ्याने हसतात. हसता हसता सुषमा निघून जाते. श्यामू गोंधळतो. ) काय झालं हसायला ?

अपर्णा : काही नाही ! दरवाजा बंद करते ! ( दरवाजा लोटते. ) सारख्या शेजारणी येऊन जाताहेत ! शांताबाई केव्हा टपकतील, नेम नाही. मजेशीर आहे बाई.

श्यामू : पण साधी आहे बिचारी !

अपर्णा : बरी साधी ! चहा घ्यायला चल...सांगते, तिनं घड्याळाचा लंबक कसा थांबवला होता, तो ! ( हसत आत जाते. )

श्यामू : ( सामानाकडे बघत बुशशर्टाची बटणे काढतो, आणि– ) लवकर चहा ठेव...आणि माझ्या चहात मसाला घाल...तोपर्यंत मी जरा झाडू मारून घेतो...

अपर्णा : मानसी यायचीय् आता ! थोडा वेळ थांबतोस का ?

श्यामू : हो....हो ! थांबू ना...

अपर्णा : मानसी येणार, म्हणजे तू थांबणारच ! ( बाहेर येत ) तू दमून आलाहेस...आत्ता झाडू मारायची गरज आहे का ?

श्यामू : नाही कशी ? तुझ्या पैशातून तू हा ब्लॉक घेतलास. सामानही तूच लावलंस. मला काही मदत करायला नको का ? आण झाडू. ( झाडू उचलत ) तू शांताबाईंच्या लंबकाचं काय म्हणत होतीस ?

[ असे आपल्या नादातच विचारीत श्यामू बुशशर्ट काढून दिवाणावर

फेकतो. त्याला त्या अवस्थेत पाहताच अपर्णा पिसाळल्यासारखी होते... कारण श्यामूचा गंजीफ्रॉक दोन्ही काखांत, पाठीवर, पोटावर खूप जाळीदार फाटलेला असतो. ती एकदम भडकते. ]

अपर्णा : श्यामू... ( रागाने )... श्यामू... !

श्यामू : ( झाडू मारीत ) तुला आता ओरडायला काय झालं ?

अपर्णा : श्याम्या, आधी तो तुझा गंजीफ्रॉक काढून फेकून दे.

श्यामू : ( बावळटपणे ) का ?

अपर्णा : ( चिडून ) का म्हणून विचारतोस ! तुला लाज कशी वाटत नाही ! तो किती फाटलाय्, बघ !

श्यामू : फाटू दे ! मला आवडतात फाटलेले गंजीफ्रॉक.

अपर्णा : ( दातओठ खात ) तुला, श्याम्या, प्रोफेसर कुणी केला ? सदा मळकट, बावळट कपड्यांत असतोस ! प्रोफेसर आणि फाटका गंजीफ्रॉक...

श्यामू : तू बाकीच्या प्रोफेसरांचे गंजीफ्रॉक पाहिलेले नाहीस.

अपर्णा : ( कमरेवर दोन्ही हात घेऊन ) बऱ्या बोलानं तू तो गंजीफ्रॉक-काढणार आहेस, की नाही ?

श्यामू : हे बघ, सावू, तू माझ्या स्वातंत्र्याच्या आड येते आहेस !

अपर्णा : फाटका गंजीफ्रॉक घालणं हा तुझा जन्मसिद्ध हक्क असल्यासारखा बोलू नकोस !

श्यामू : मी घरी पट्ट्यापट्ट्यांची अर्धी चड्डी घालीत होतो, ती तू बंद केलीस ...गादीच्या कापडाच्या चड्ड्या नाही घालायच्या, म्हणून— आता गंजी-फ्रॉकवर आलीस...

अपर्णा : ( कातर शोधून काढते ) आधी दुसरा गंजीफ्रॉक घाल...नाहीतर मी हा फाडून टाकणार...आधी दुसरा गंजीफ्रॉक घाल !

श्यामू : ( बचाव करीत ) हे बघ.... दुसरा गंजीफ्रॉक याच्यापेक्षा जास्त फाटलेला आहे ! त्याच्या कुठल्याही भोकातून डोकं जातं.

[ ती रागारागाने त्याच्या गंजीफ्रॉकला हात घालणार, तोच दरवाजा वाजतो. श्यामू दरवाजा उघडतो. दारात शांताबाई. ]

श्यामू : या, शांताबाई....

[ शांताबाई आत येतात. ]

शांता० : अहो, अर्पणाबाई... ( श्यामू हसतो. ) मी अर्पणाबाई म्हटलं, म्हणून श्यामराव हसताहेत ! हसा ! मी अर्पणाबाईच म्हणणार ! अपर्णा म्हणजे काय ?... सांगा... अर्थ काय ?

अपर्णा : ( श्यामूला ) तू सांग....

श्यामू : अपर्णा म्हणजे... ( गोंधळतो. )

शांता० : सांगा, तुम्ही प्रोफेसर ना ?

श्यामू : मी मराठीचा प्रोफेसर नाही ! इंग्रजीचा आहे !

शांता० : इंग्रजीत सांगा !

श्यामू : नाही, त्यापेक्षा, शांताबाई, तुम्ही तिला अर्पणाबाईच म्हणा.

शांता० : तेच म्हणते ! अर्पणाबाई, मी मघाशी तुम्हांला सांगायलाच विसरले. अहो, उद्या वटपौर्णिमा ! तर आपण सर्वांनी उद्या वटपूजेला जायचं.... आणि.... मग माझ्या घरी फराळाला यायचं.

अपर्णा : माझं ऑफिस आहे...शांताबाई.

शांता० : असू दे ! आपण लवकर निघणार ! आणि वडाचं झाड या कोपऱ्या-वर, इराणी हॉटेलच्या जरा पुढं आहे !...अहो, महत्त्वाचा दिवस आहे.... हाच नवरा जन्मोजन्मी मिळो, अशी प्रार्थना करायचं व्रत आहे हे. बरं, तुमच्याकडे नऊवारी लुगडं आहे, म्हणा...

अपर्णा : हो !

शांता० : नथ आहे ? नसली, तर देईन ! माझ्याकडे सासूबाईंची नथ आहे !

श्यामू : मग सासूबाईंना ?

शांता० : ( एकदम दुखवटा व्यक्त केल्यासारखी गंभीर होते. ) दोन वर्षांपूर्वी आमचे सासरे गेले ! असू दे ! मी जाते.... ( मघापासून अपर्णा श्यामूने बुशशर्ट घालावा, म्हणून खाणाखुणा करते आहे. पण त्याचे लक्ष नाही. शेवटी ती बुशशर्ट उचलून देणार, तोच ) असू दे ! आम्ही शेजारी !

अधनं मधनं आम्ही येणार, जाणार....प्रत्येक वेळेला शर्ट घालायची फॉर्-मॅलिटी कशाला ? सगळे पुरुष फाटकेच गंजीफ्रॉक घालतात ! ( जायला वळतात ) तुम्हांला काही वाटायला नको !

श्याम् : ( अपर्णाला ) घे ! यांचे साहेब सुद्धा ! ( हसतो. )

शांता : साहेबांचं सोडा ! ते गंजीफ्रॉकच घालत नाहीत ! ते म्हणतात, जे दिसत नाही, ते कशाला घालायचं ? ( तरतर निघून जाते. )

श्याम् : ( दरवाजा बंद करून दाराला पाठ टेकीत ) घ्या ! साहेबांचं तत्त्व-ज्ञान ! म्हणजे गंजीफ्रॉक नाही आणि.... ( लंगोटही नाही ! )

अपर्णा : गप्प ! फाजील बोलायचं नाही !...उद्या मी तुला गंजीफ्रॉकच्या दोन जोड्या आणून देते.

श्याम् : ओ ऽ ऽ ! हाऊ स्वीट ऑफ यू, छबूताई !

अपर्णा : ( चिडून ) चूप ! मला छबूताई म्हणायचं नाही !

श्याम् : मी तुला छबूताईच म्हणणार ! मला छबू हे नाव आवडतं.

अपर्णा : मग तेच का नाही ठेवलंस ?

श्याम् : हे छबूताई म्हणजे लाडातलं नाव, ग...(तिच्या कमरेवर हात टाकतो.)

अपर्णा : ए, श्याम्, उद्या वटसावित्रीच्या पूजेसाठी मी नव काय नेसणार ?

[ शालू दाखवते. ]

श्याम् : कसले अन्नाड्यासारखे सण साजरे करता ? जन्मोजन्मी हाच नवरा... जन्म...जन्म आहेच कुठं ?

अपर्णा : सण, म्हणजे जरा मौजमजा, रे ! तुम्ही इंटलेक्च्युअल्स् म्हणजे नुसते एरंडेलवाले ! दोन घटका कुणी आनंदात घालवणार, तर तुम्ही एरंडेल पिणार ! नवे सण निर्माण होत नाहीत, तोपर्यंत जुने सण साजरे केले, तर बिघडतं काय ?

[ अपर्णा अंगावर शालू घेते आणि आपले अंगप्रत्यंग आरशासमोर उभी राहून वळून वळून पाहाते. तसे करताना गाणे गुणगुणते. ]

श्याम् : सारखी सारखी आरशासमोर उभी राहू नकोस.

[ श्यामू तिच्याजवळ जातो. ]

अपर्णा : ( एकदम चपापते. ) काय म्हणालास ?

श्यामू : सारखं सारखं असं आरशात पाहू नये ! ( अपर्णा एकदम जुन्या आठवणीने हालते. बघत राहते. ) अशी काय बघते आहेस माझ्याकडे ?

अपर्णा : एकदम आठवण झाली ! नानाकाका सुद्धा आईला असंच म्हणायचे.

श्यामू : अजून खूळ गेलं नाही का डोक्यातून ? किती वर्षं झाली त्याला आता ?

अपर्णा : बायजीसुद्धा माझ्यावर अशीच ओरडायची...जरा आरशासमोर उभी राहिले, की म्हणायची: कार्टी, मेली, आईच्या वळणावर जाणार !

श्यामू : महामुर्ख आहे बायजी तुझी !

अपर्णा : मला बरं दिसावंसं वाटतं...चांगलं घर असावंसं वाटतं. नीटनेटकं, आकर्षक राहावंसं वाटतं...यात माझं काही चुकतं का, रे ?

श्यामू : छे, ग ! तू नुसता विचार करीत बसू नकोस ! ( तिच्या पाठीवर थाप मारून उत्साह निर्माण करण्यासाठी ) चला, छबूताई, आपण छानसा मसालेदार चहा पिऊ....!

[ ती दोघे आत जायला वळतात...तोच खालून रस्त्यावरून मानसी हाका मारते, ते ऐकू येते. ती 'श्यामू....ए ऽऽ सावू' अशा हाका मारते. ]

अपर्णा : मानसी हाक मारतेय्, वाटतं.

[ अपर्णा आणि श्यामू गॅलरीत येतात, मानसी रस्त्यावरून विचारते : 'आहात का घरी ?' ]

अपर्णा : ये, ग, मानसी ! ये वर ..

[ गॅलरीतून आत येतात. मानसी त्यांची मैत्रीण आहे. ती वर येते आहे, म्हणून श्यामू घाईघाईने शर्ट घालतो. ]

अपर्णा : आता बरा शर्ट घालतोयस ?

[ श्याम् शर्ट काढून ठेवतो. दरवाजा उघडतो. दुसऱ्या क्षणी मानसी येते. पांढरी शुभ्र साडी. गळ्यात, हातांत काही नाही. फक्त घड्याळ. लिपस्टिक वगैरे काही नाही ! बॉयकट् केलेला, अत्यंत साधी आणि स्वाभाविक दिसते. पण चेहरा बुद्धिमान आणि हसतमुख. ]

श्याम् : पत्ता शोधायला वेळ लागला का, ग !

मानसी : नाही ! थोडा वेळच बसणार आहे; पण... या इथं साऊथ इंडियन हॉलमध्ये जमनचं लेक्चर आहे....ॲडव्हर्टायजिंगवर...( अपर्णाला )सावू, तू येणार का ?

अपर्णा : लेक्चरला ?...छे, ग ! आज सबंध दिवस सामान लावण्यात गेला ! आता संध्याकाळी बायजीकडे जाऊन सतीशला आणायचाय् ! त्याला तिथं ठेवलाय्...

मानसी : पण तुझा पोरगा तिथंच असतो ना ?

अपर्णा : असतो, म्हणजे...कालपर्यंत मीच तिथं होते....पण आता त्याला तिथंच ठेवायला हवा....बायजीचाही वेळ जाईल.

श्याम् : तुझा जमन आज बोलणार कशावर !

मानसी : बोडकं त्याचं ! ॲडव्हर्टायजिंगमध्ये आपल्याला काही तरी अधिक समजतं, असं इंप्रेशन व्हावं, म्हणून दर महिन्याला भाषणं करतो ! आहे मात्र ब्रिलियंट ! ए व्हेरी नाइस पर्सन... !

श्याम् : हल्ली तू जमनबरोबरच ना !

मानसी : येस् ! एनी ऑब्जेक्शन ?

श्याम् : माझं कसलं ऑब्जेक्शन !

मानसी : एक जुना प्रियकर, म्हणून ! ( अपर्णाला डोळा मारीत हसते. अपर्णाही हसते. )

श्याम् : हे बघ.... तू सावूला डोळाबिळा मारून नाटकातल्या व्हिलनसारखा अभिनय करू नकोस ! तुझ्या बाबतीत मी तिला सगळं काही सांगितलंय्.

मानसी : गुड ! ( श्यामूला ) श्याम्या, फक्कडसा चहा करून आण, जा !

चि. ......... .... ... नं. .. ................



अपर्णा : मी आणते....

मानसी : काय झालं या नवरेमंडळींनी जरा चहा केला, म्हणून ? काय धाड भरलेय् ?

श्यामू : आणतो ! हिनं केलेलाच आहे....( आत जातो. )

मानसी : ( तो आत जाताना ) माझ्या चहात तुझा तो मसाला नको हं घालू ! माझ्या नशिबी येतात, ते मसालेवाले ! हा जमनसुध्दा.... चहात मसाला हवाच !

अपर्णा : अग, जमन आणि तू ही कंपनी सोडताय् ? कुणी तरी म्हणत होतं ऑफिसमध्ये....

मानसी : या ॲडव्हर्टायजिंग फील्डमध्ये नेहमी अस्थिरता असते !....तुझ्या कंपनीत सुध्दा गडबड चाललीय्...थोडी माणसं जाणार...

[ श्यामू ट्रे घेऊन येतो. ]

श्यामू : कुठं जाणार ?

मानसी : साबूच्या कंपनीत रिट्रेंचमेंट होणार....बातमी गेली ना !

अपर्णा : नवीन कुणी ठोसर म्हणून मराठी माणूस येणार, म्हणून ऐकलंय्... डायरेक्टर, म्हणून.

मानसी : तो कृष्णा ठोसर ! कृष्णकांत ठोसर ! सगळे 'केटी' म्हणतात त्याला. त्याचा स्वतःचा मोठा कमर्शियल स्टूडिओ आहे. शेदीडशे माणसं कामावर आहेत... त्यानं ही ॲडिशनल कंपनी घेतलीय्-- बट ही इज् ए व्हेरी नाइस मॅन.

अपर्णा : माझ्या छातीत धडकीच भरलीय्....ही नवीन जागा घेतलीय्.... माझी नोकरी गेली, म्हणजे....याच्या पगारात काय होणार ? थोडे पैसे होते...आमची-नानाकाकांची जागा विकली, तेव्हाचे ! बाकी कर्ज काढलंय्...मी फेडणार आहे माझ्या पगारातून.

श्यामू : हो...हो...तुझ्या पगारातून ! चहा घे ! तुम्ही दोघी बसून माझ्यामध्ये एक प्रकारचा इन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्स निर्माण करताय्. दुसरं

काही नाही !

[ दोघी हसतात. ]

अपर्णा : अग, लग्न केलं, तेव्हा होतं काय याच्याकडे ? ( गंजीफ्रॉक दाखवीत ) हे बघ !

मानसी : एवढंच नाही हं !....त्याच्याकडे आणखी एक घड्याळ होतं.

अपर्णा : आहे ! सकाळी जाग यावी, म्हणून गजर लावला, तर रात्री झोपल्यावर तो वाजतो !

श्याम् : ( चिडून ) हो ! हो ! पण वाजतो ना ?

अपर्णा : वाजतो ! तो गंजीफ्रॉक काढ. नाहीतर शर्ट घाल !

मानसी : तुला फाटक्या गंजीफ्रॉकचा...

श्याम् : असू दे ! ( बुशशर्ट घालतो. )

मानसी : माझ्याशी तुझं लग्न झालं असतं, तर तुला मी या फाटक्या गंजीफ्रॉकनंच कॉलेजमध्ये पाठवला असता ! शिकव !

श्याम् : आज स्त्री–मुक्तिदिन आहे, असं समजून तुम्ही दोघी माझ्यामागं का लागलाय् ?

अपर्णा : ( हात उडवीत, श्यामूला ) तू गप्प रे, ! कप आत ठेव जा...( श्यामू कप घेऊन जातो. ) हा जो कृष्णकांत ठोसर आहे....

मानसी : नोन् ॲज् केटी ! सगळे केटी म्हणतात त्याला.

[ श्यामू बटणे लावीत येतो. ]

अपर्णा : त्याला जरा जमनमार्फत सांगायला हवं...सांगशील ?

मानसी : सांगेन मी ! तुझा जॉब रिसेप्शनिस्ट-क्लार्कचा आहे....नो प्रॉब्लेम !

श्यामू : आणि मी एक सांगतो ! जॉब गेला, म्हणून मोठा प्रॉब्लेम नाही ! मी पेपर्स तपाशीन... ट्यूशन्स् घेईन.... पीएच्. डी.चं काम थांबवीन.

अपर्णा : याच्यापेक्षा मला सव्वाशे रुपये जास्त मिळतात, म्हणून हा जळतोय् ! नुसता जळू आहे !

मानसी : सगळे नवरे म्हणजे शेवटी जळाऊ लाकडंच, ग ! जळत असतात,

मेले !]

श्यामू : मी तसा जळत नाही ! पण तू साधी मॅट्रिक ! मी एम्. ए. हायर सेकंड क्लास ! आणि हिला सव्वाशे रुपये अधिक ?... पण म्हणून नोकरी सोड, असं मी म्हणत नाही ! ... प्रश्न आहे... आता स्वतंत्र बिऱ्हाड केलंय्... घरी जेवण... घर बघणं.... सतीशला बघणं....

मानसी : नॉन्सेन्स ! ते तू कर नोकरी सोडून ! ते बायकोनंच कशाला करायला पाहिजे ? काही नाही ! बायकांना जखडून ठेवण्याचे हे तुमचे मार्ग आहेत ! बायकांना बाहेर वावरू द्यायचं नाही... त्यांचा कॉन्फिडन्स वाढवायचा नाही.... त्यांना करीअर करू द्यायची नाही !

श्यामू : ( चिडून ) करीअर करणाऱ्या बायकांच्या घरांची अवस्था एकदा बघा डोळे उघडून !

मानसी : त्याची जबाबदारी बायकांवर का ? नवऱ्यानं ईक्वली जबाबदारी घेतली पाहिजे !... सावूपेक्षा तुझा पगार कमी आहे ! तू सोड नोकरी. आणि बघ घर....

श्यामू : ठीक आहे ! तुम्ही दोघी या घटकेला आहात मेजॉरिटीमध्ये... मी आहे मायनॉरिटीमध्ये ! सध्या गप्प राहिलं पाहिजे !

मानसी : (हसत) एक बरं आहे या श्यामूचं ! तसा गरीब आहे ! ( सावूला ) त्याच्याकडून जेवणबिवण करून घे हं ! छान जेवण करतो ! आमच्या कॉलेजच्या ट्रिप्स् गेल्या, की श्यामू स्वैपाकी !

श्यामू : आणि तुझा तो फडणीस–टकल्या ! बबन फडणीस....( अपर्णाला ) मानसीचा पहिला नवरा...! ( श्यामू आणि मानसी हसतात. ) भेटला होता का हल्ली ?

मानसी : तो इथं कुठं असतो ! अहमदाबादला गेला होता ना ?

श्यामू : आलाय् परत इथल्या कुठल्या तरी कॉलेजात !

मानसी : मला कुणी मित्र भेटायला आले, की संतापायचा ! त्याला वाटायचं, नवरा नवरा, म्हणून मी त्याच्या भोवती गोंडा घोळावा ! माझं अडलंय् ! ... आणि एवढा इंटलेक्च्युअल म्हणवतो, साला ! मला म्हणायचा, मला मुलगी नको, मुलगा हवा ! म्हटलं, मुलाला खाली बोटभर असतं, ते काय सोन्याचं असतं ? इडियट ! ( अपर्णाला ) वर्षभरातच आमचं फिसकटलं !

श्यामू : पण त्याला दुसरी आता मुलगीच झालीयू.
मानसी : झालं! बव्हन्याचं टक्कल वाढणार! दुसरं काही नाही!
श्यामू : मानसी, आपण परत एकदा चहा घेऊ! तुझ्या सगळ्या जुन्या नवऱ्यांचा उद्धार होतोय! वेळ लागणारच! गरम गरम चहा घेऊ.... (अपर्णाला) चला, छबूताई, थोडा चहा आणा. सॉरी हं! छबूताई, तू चहा आणतेस, की मी आणू? बरोबर ना, मानसी?

[सावित्री चहा आणायला जाते.]

मानसी : गुड्! पण तुझं छबू नाव, श्याम्या, आवडीचं दिसतंय्...
श्यामू : का?

[अपर्णा आत जाता जाता ऐकण्यासाठी वळून थांबते.]

मानसी : इन् दोज् गुड ओल्ड डेज्....तू मलाही छबूच म्हणायचास, नाही? काही इमोशनल इन्व्हॉल्व्हमेंट! वगैरे?
श्यामू : मॅड आहेस तू! बोडक्याची इन्व्हॉल्व्हमेंट! (अपर्णाला) तू चहा आण, जा!

[ती आत जाते.]

मानसी : (मिस्किल हसत) कशी केली गंमत?
श्यामू : (चिडून) मूर्ख आहेस एक नंबरची! हे हिच्या पुढ्यात सांगायची काय गरज होती? (अपर्णा दारात उभी.) नको तिथं आगाऊपणा! (थांबून) मध्यंतरी एकदा तुझा तो दुसरा नवरा भेटला होता.
मानसी : खंड्या?
श्यामू : खंड्या मंडलिक! तुझी चौकशी करीत होता.
मानसी : खंड्यानं परत लग्न केलं नाही अजून?
श्यामू : तू परत येशील, असं वाटत असावं त्याला!
मानसी : खंड्या तसा चांगला आहे हं! जेम ऑफ ए मॅन!.... पण रामायणातला रामभाऊ! त्याला आई-बापाशिवाय दुसरं जग नाही! त्यांनी

'वनवासाला जा' म्हटलं, तर हा मला म्हणणार: 'चल, सीते, वनवासाला जाऊ!'

श्याम् : आता त्या जमनबरोबर तरी धड राहा!

मानसी : तो काय, आपला मित्र आहे! (खांदे उडवते. आत बघत) काय छबू? चहा होतोय् का?

[अपर्णा आतून चहा आणते.]

श्याम् : आणि आता आम्हांला ही जागा मिळालीय्...मानसी, एकदा जेवायला ये! छबू फारच छान जेवण करते.

मानसी : असं नवऱ्यानं म्हणायचं आणि बायकोला स्वैपाकात गाडायची! म्हणजे तिला बाहेरची दिशा नाही.

श्याम् : तुझे हे जे बायकांसंबंधी विचार आहेत ना, ते खरोखरच आदर्श आहेत.... पण...

मानसी : पण ते दुसऱ्या कुणी तरी आचरणात आणावेत! असंच ना? तो दुसरा कोण? त्याचा पत्ता दे! त्याच्यासाठी माझं लग्न अडलंय्...

श्याम् : लग्न अडलंय्, म्हणून तुझं थोडंच अडलंय्?

[सर्व हसतात. मानसी उठते.]

मानसी : चला, आता पळते! जमनचं भाषण सुरू झालं असेल! खूप वेळ गेला.... (जागा बघत) तुझी जागा मात्र सुरेख आहे!.... (फोटो बघत) हा फोटो कुणाचा?....

[अपर्णा कप घेऊन आत जाते.]

श्याम् : नानाकाकांचा! हिच्या वडिलांचा!

मानसी : हिची आई दिसली होती का, रे, कधी? तबलजीबरोबर पळून गेली, ती?

श्याम् : छे! कित्ती वर्षं झाली! कुठं असते, कोण जाणे! त्यामुळं सावूचं शिक्षण राहिलं. आईसारखी कुणाचा तरी हात धरून पळून जाईल, म्हणून

बायजीनं सावूला कॉलेजमध्येसुद्धा घातली नाही...हे तिला फार खुपतं !

[ खिडकीजवळ उभी राहते. अपर्णा बाहेर येते. ]

मानसी : इथं स्मशान दिसतंय ! मग काय, सावू, भुतंबितं येतात, की नाही ? ( तिला घाबरवण्याच्या आवाजात विचारते ) रात्री...अपरात्री... भुतं ... भुतं.... ?

अपर्णा : ( घाबरून ) सांग ना, रे, श्यामू, तिला ! मला भीती वाटते, म्हणून !

श्यामू : नको, ग, मानसी ! मग घाबरते ती ! झोपेत घाबरून उठते.

मानसी : काय काळजी घेतोय् बायकोची ! बाकी, सावू, हा श्यामू तुला अगदी आदर्श नवरा आहे ! असा नग शोधून सापडायचा नाही !

श्यामू : म्हणजे काय ? उद्या ती वटपूजेला जाणारच आहे ! हाच नवरा जन्मोजन्मी मिळू दे, म्हणून प्रार्थना करणार आहे....

मानसी : या सगळ्या हिंदू बायकांचं रक्त एकदा बदलून घ्यायला पाहिजे. सध्या आहे त्या रक्तात सीता-सावित्र्या इतक्या भिनल्या आहेत...दोघींचीही अगदी बोगस ट्रॅडिशन... ! सीतेबद्दल आपल्याला काही वाटावं, असं तिनं केलंय् काय ?

अपर्णा : काय करायला पाहिजे ? अग्निदिव्य नाही केलं ?

मानसी : तेच ! अग्निदिव्यासारख्या अपमानास्पद गोष्टीला तयार झाली... श्यामू, तुझ्या या सीता–सावित्रीवर लक्ष ठेव. नाहीतर चुकून सतीबिती जायची ! हा हिंदुधर्म म्हणजे....म्हणे, एक नवरा जन्मोजन्मी.... खरं म्हणजे याच जन्मी नकोसा होतो ! ( अंग शहारल्यासारखं करते. )

श्यामू : तू लक्ष देऊ नकोस, ग ! तुला हवाय् दर वर्षाला एक–कॅलेंडरसारखा !

मानसी : पुनर्जन्मावर विश्वास ठेवावा, की नाही, हा वेगळाच प्रश्न. आता संतति–नियमनाच्या काळात पुनर्जन्मावर विश्वास ठेवणं व पुनर्जन्म घेणं तरी सोपं आहे का ?.... आत्मे सगळे क्यू लावून उभे असतील--जन्म घ्यायला !...( हसते–आणि घाईघाईने पळत ) पळते, ग, मी, सावू....

अपर्णा : परत ये ! एकदा जेवायला ये !...

[ ती पळत पळत जाते. श्यामू आणि अपर्णा दार बंद करून गॅलरीत

येतात. हात वर करून टाटा करतात. आत येतात. अपर्णा श्यामूकडे बघून छद्मीपणे हसते. पण श्यामूच्या लक्षात येत नाही. श्यामू बुश-शर्टाची बटणे काढू लागतो.]

श्यामू : चला! आपल्याला बायजीकडे जायचंय् ना? सतीशला घेऊन येऊ!... मी पाच मिनिटांत आंघोळ करून येतो. (तरीही ते न ऐकता अपर्णा छद्मीपणाने हसते. दोन्ही हात पाठीमागे बांधून श्यामूकडे चेष्टेने बघत बघत हसते....गाण्याची न....न...न...न...अशी लकेर घेते.) तुला आणखी आता काय झालं हसायला, सावू?

अपर्णा : (गालांत हसत) मानसी आली, की तुला भयंकर उत्साह येतो. लग्न का नाही केलंस तिच्याशी?

श्यामू : अशा तेज, आग्रही, हुशार मुली मैत्रीला, चर्चेला ठीक असतात, सावू! बायको म्हणून नाही. (श्यामू टॉवेल गुंडाळून आंघोळीच्या तयारीत) पाच मिनिटांत आंघोळ करून येतो. बायजीकडे जाऊ! आणि हे बघ.... जेवूनच जा, असं बायजी म्हणाली, तर 'नको, नको' म्हणू नकोस! आज मला भयंकर भूक लागलीय्!

अपर्णा : नाही हं. आज बायजीकडे नाही जेवायचं. पहिलाच दिवस आपला आपल्या घरातला...जा, पळ—ब्रेड आणि अंडी घेऊन ये. खाऊ आणि मगच सतीशला आणायला जाऊ.

[श्यामू कपडे काढीत घाईघाईने आंघोळीसाठी आत जातो. अपर्णा आवराआवर करीत असतानाच काळोख होतो.]

(काळोख)

(प्रकाश)

[श्यामूचे घर. वेळ संध्याकाळची— म्हणजे कचेऱ्या वगैरे सुटायची वेळ. अपर्णा अजून घरी आलेली नाही. दरवाज्याची बेल वाजते. श्यामू घाई-घाईने बाहेर येतो. तो कपडे करतो आहे—बाहेर जाण्याच्या तयारीने. त्याने नवा कोरा हातांचा गंजीफ्रॉक घातला आहे. पँटला पट्टा बांधत

तो बाहेर येतो आणि दरवाजा उघडतो. दारात शांताबाई उभ्या. त्या गडबडीने आत येतात. ]

श्याम् : काय म्हणता, शांताबाई ? सावू अद्याप आलेली नाही.
शांता० : अर्पणाबाई अद्याप हॉस्पिटलातनं आलेल्या नाहीत ? वाजले किती ?

[ टेबलावरील घड्याळाकडे पाहतात. ]

श्याम् : ( रिस्टवॉच पाहून ) आता सहा वाजताहेत.... ( टेबलावरील घड्याळाचे काटे फिरवीत ) काही काम होतं, शांताबाई ? ( कंटाळतो. )
शांता० : काम काही नाही, हो, श्यामराव ! काय होतं ? मी विसरले, म्हणजे विसरले... असं माझं डोकं... म्हणून आठवण झाली, की मी बोलून घेते....
श्याम् : काही सांगायचंय् का सावूला ?
शांता० : सांगायचंय्, म्हणजे काय ?....तुम्ही ' शोले ' सिनेमा पाहिला का ?
श्याम् : हो, पाहिला !
शांता० : ( निरुत्साही होते ) पाहिला का ! म्हणजे प्रश्नच मिटला !.... ( थोड्या उत्साहाने ) पण अर्पणाबाईंनी
श्याम् : हो ! तिनंही पाहिला.
शांता० : ( निराश होत ) पाहिला ?
श्याम् : हो ! का ?
शांता० : नाही, म्हणजे काय...पाहिला नसला, तर पाहा, असं सांगणार होते ! आम्हांला ' शोले ' फार आवडला...फार, म्हणजे फारच...
श्याम् : तुम्ही कधी पाहिला ?
शांता० : मी नाही पाहिला ! आमच्या साहेबांनी पाहिला. आणि त्यांनी मला गोष्ट सांगितली ! असं केलं, की एका तिकिटाचे पैसे वाचतात... !
श्याम् : म्हणजे तुम्ही सिनेमा पाहातच नाही ?
शांता० : पाहते...आमचा अरुण येणार असला, तर !....म्हणजे एका बाजूला साहेब...दुसऱ्या बाजूला अरुण !...मला ते हावरट लोकांचे धक्के नाही आवडत– फाजील लोक ! बसल्या जागेवरून सिनेमा करायला बघतात.

[ तेवढ्यात खालून रस्त्यावरून मानसीच्या 'श्यामू…ए ऽऽ श्यामू ऽऽ' अशा हाका ऐकू येतात. श्यामू गॅलरीत जातो. तिला वर बोलावतो. शांताबाई खिडकीतून बघते…. 'ये, वर ये….थोडा वेळ टॅक्सी थांबवून ये…' असे सांगून श्यामू आत येतो. शांताबाई…'कुणी मैत्रीण वाटतं तुमची?' अशी नुसती चौकशी करून निघून जातात. तेवढ्यात घाईघाईने मानसी येते. ती तशीच, अगदी साधी–स्टार्च केलेल्या पांढऱ्या शुभ्र साडीत आहे. बॉयकट्. अस्ताव्यस्त केस. गडबडीत येते. आल्याबरोबर दार लोटून घेते. ]

श्यामू : बस…बस ! मी पटकन् चहा करतो….मलाही बाहेर जायचंच आहे.

मानसी : मला चहा नको ! मला बसायलाही वेळ नाही…मी टॅक्सी थांबवून आलेयूँ…सावू नाही आली ?

श्यामू : तिला वेळ आहे थोडा….तू बैस तरी.

मानसी : असू दे ! मी काय सांगायला आले, माहीत आहे ? जमननं केटीला सांगितलं होतं….

श्यामू : केटी कोण ?

मानसी : (वैतागून, घाईमुळे) तुला सगळं काही सांगायला पाहिजे… केटी म्हणजे तो कृष्णा ठोसर…सावूचा नवा बॉस !….त्याला जमननं सांगितलं होतं…रिट्रेंचमेंटमध्ये सावूला उडवू नकोस, म्हणून…पण लकीली ही इज् मच् इंप्रेसड् विथ् सावू…तो तिला प्रमोशनच देतोय…थोडं पब्लिक रिलेशन्स्…थोडं कोऑर्डिनेशन…प्रदर्शनं वगैरे सगळं तिला करावं लागेल …तिला चॅलेंज आहे…बाहेरगावी जायला मिळेल…प्रदर्शनं ऑर्गनाइझ करायला….( ऐकता ऐकता श्यामू गंभीर होतो. ) तू, श्याम्या, असा पोस्टमास्तरसारखा गंभीर का ? आनंद नाही झाला ? ( किंचित हसतो. ) तुझी सावू मॅट्रिक असली, तरी हुशार आहे ती…

[ तेवढ्यात बंद दरवाजा लोटून शांताबाई येतात आणि— ]

शांता० : श्यामराव, अर्पणाबाई नाहीत घरी, म्हणून विचारते– मी दोन कप चहा आणून देऊ का तुम्हांला ?

मानसी : नको....नको...थँक्यू...मी निघालेच.
श्यामू : नको, शांताबाई...त्या निघाल्याच !

[ शांताबाई जातात. ]

मानसी : आदर्श शेजारी आहेत.
श्यामू : तशा त्या आदर्श शेजारी आहेतच. पण आता आल्या होत्या; त्या फौजदारी वॉच ठेवायला...काय चाललंय्, ते पाहायला.
मानसी : कमाल....कमाल आहे या लोकांची ! ( हात जोडते आणि हसत जायला निघते. ) तर ही गुड न्यूज सावूला दे...अँड काँग्रॅच्युलेट हर ! ( निघते. )
श्यामू : पण तिला पगार काय मिळणार ?
मानसी : आत्ता अठराशे तरी मिळेल...बिसाइडस् प्रवासाचा भत्ता, पर्क्स.... वगैरे दोन– अडीच हजारांच्या आसपास असेल.
श्यामू : ( स्वतःशीच कडवटपणे ) मी एम्. ए.... हायर सेकंड क्लास–गोल्ड मेडॅलिस्ट...लेक्चरर...अकराशेच्या आसपास ! बायको – मॅट्रिक ! अडीच हजारांच्या आसपास !
मानसी : श्याम्या, चोरा...तुझ्यातला दॅट डॅम डर्टी नवरा जागा होतोय्... जळतोयस् तू...
श्यामू : तिला जास्त पगार, म्हणून मी नाही जळत, मानसी ! पण एकूण समाजातली रचना पाहा !....म्हणजे समाजातली एकूण विषमता...
मानसी : ( हसत ) हे बघ....त्यासाठी आपण मग एखाद्या फॅशनेबल मार्क्स-वाद्याला गाठू या ! ते चर्चा बरी करतात... ( श्यामूला गंभीर बघून ) तुला, श्याम्या, आनंद झालेला नाही का ?
श्यामू : ( तक्रारीच्या सुरात ) आनंद का नाही होणार ? घरात आलेला पैसा नको कुणाला आहे ?...परंतु पैसा म्हणजे काही सर्वस्व नव्हे !.... घर कोण सांभाळणार ? सतीशचं कोण पाहणार ? त्याला काही कायमचं बायजीकडे आणि बाळारावाकडे ठेवता येणार नाही.
मानसी : अरे, एवढी कुठं तरी अॅडजस्टमेंट करायला हवी, श्याम्या ! हा

तिच्या करीअरचा....पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचा प्रश्न आहे...बरं, जाते मी... ...(एकदम लक्ष जाऊन) हॅ...हॅ...ऐकत नाहीस.... गंजीफ्रॉक नवीन?

श्यामू : आता हे पाहा! मी एक जोडी आणली...सावूनं आणखी दोन जोड्या आणल्या! आता सहा गंजीफ्रॉक झाले! करायचेत काय?

[ दरवाजा उघडाच असतो. त्यातून घाईघाईने अपर्णा येते. ती खूप आनंदात आहे. आनंदाच्या भरात बोलू लागते. ]

अपर्णा : ए, श्यामूऽ! (मानसीला पाहते) आधीच पोचलीस का तू? म्हणजे माझ्या आधी श्यामूला बातमी देऊन मोकळी! (मानसी हसते. श्यामू गंभीर. मिठाईची पुडी उघडते. श्यामूच्या चेहऱ्याकडे लक्ष जाऊन) तू एवढा घुश्श्यात का, श्यामू?

मानसी : तुला जास्त पगार मिळणार, म्हणून! जळाऊ लाकडं ही!

श्यामू : शट् अप्, मानसी! (अपर्णाकडे वळून समजावण्याच्या सुरात) सावू, तुझं हे फिरतीवर जाण्याचं जे काम आहे, त्यासंबंधी आपण गंभीरपणे विचार करायला पाहिजे...बोलायला पाहिजे आपण...

अपर्णा : का?

श्यामू : का, काय? तू सतत घराबाहेर राहणार! आणि हे घर कोण सांभाळणार? सतीशला काय कायमचा बायजी आणि बाळारावांकडे ठेवायचा? ...आणि मी कुठं रोजच्या रोज 'दुर्गाश्रम', 'अनंताश्रम' अशा खाणावळी शोधत फिरायचं?

अपर्णा : (किंचित हसत) आणखी काही?

मानसी : आणि गेलास खाणावळीत, तर बिघडतं कुठं? (श्यामू तिच्याकडे जरा रागानेच बघतो.) बघतोय् बघ कसा! जाते मी! (रेंगाळते.)

श्यामू : मला हे सगळं तुझ्याशी एकदा डिस्कस करायचं आहे, सावू!

[ तो शर्ट चढवून जायला निघता निघता क्षणभर वळून तिची प्रतिक्रिया पाहण्यासाठी तिच्या तोंडाकडे पाहतो. ]

अपर्णा : कुठं निघालास?

श्यामू : आज महिन्याचा शेवटचा गुरुवार...इंग्लिश असोसिएशनची मीटिंग आहे! (पैशाचं पाकीट उघडून पैसे बघू लागतो.)
अपर्णा : हवे आहेत का पैसे तुला ?
श्यामू : (तुसडेपणाने) नको! आहेत माझ्याकडे!
अपर्णा : महिना संपत आलाय्, म्हणून विचारलं.
मानसी : (खवचटपणे मान हलवीत) हिंदू नवरेशाही! जळाऊ लाकडांची जंगी वखार! तू काळजी करू नकोस, सावू! मी बौद्धिक घेईन श्याम्याचं! आहेच तो जरा येडा.

[श्यामू आणि मानसी बरोबरच निघतात. दारात शांताबाई भेटतात.]

शांता० : कोंबडी केली होती, घेऊन आलेय् थोडीशी! अर्पणाबाई आलेल्या पाहिल्या...खाऊन बघा आमची कोंबडी...मालवणी मसाला...
श्यामू : या ना आत.

[मानसी व श्यामू जातात.]

अपर्णा : शांताबाई, या! (शांताबाई येतात) पेढे खा आणि तोंड गोड करा! (त्यांच्या हाती पेढे देते.) मला बढती मिळाली!

[शांताबाई कोंबडीचे भांडे आत ठेवतात.]

शांता० : हो, का ? आनंद झाला मला! म्हणजे आता मोटारगाडी वगैरे घेणार का ?
अपर्णा : (हसत) छे, हो!....फक्त फिरतीवर जावं लागणार...अहमदाबाद ...नागपूर...राजकोट वगैरे....!
शांता० : वा...वा....! छान झालं! एकटयानंच फिरणार? का श्यामरावांना घेऊन ?
अपर्णा : एकटीच! कधी कधी ऑफिसची माणसं असतील.
शांता० : पण जरा सांभाळून!...बोलून चालून पुरुष माणसं! उद्योगी! गप्प बसायची नाहीत!

अपर्णा : हो....हो ! ( हसते. )

शांता० : या आता गेल्या, त्या ?

अपर्णा : मानसी.

शांता० : हां...हां ! त्या त्याच ! त्यांना म्हणावं....जरा शकुंतला हेअर ऑईल वापरा.. केस वाढतील !

अपर्णा : ( हसते ) अहो, तिनं केस कापलेत ते तसे...

शांता० : मला माहीत आहे, हो ! मी जरा विनोद करीत होते. (दोघी हसतात. ) सुषमाबाईंना सांगितली, की नाही, बातमी ? आनंद होईल त्यांना. थांबा, मी बोलावते. (गॅलरीतूनच दूर पाहून हाका मारतात. तेवढ्यात अपर्णाला एकदम खाजगी आवाजात सांगतात ) हिचा...सुषमाचा, हो...नाटकी नवरा आलाय्....( दारू पिऊन पडलेला असतो, असा अभिनय करतात. तेवढ्यात सुषमा दिसते. ) या, हो, सुषमाबाई ! पेढे घ्या ! आपल्या अर्पणाबाईंना बढती मिळालीय्....त्या फिरतीवर जाणार...अहमदाबाद... राजकोट ...नागपूर... नागपूरची संत्री आणा, जाल तेव्हा ! आमच्या साहेबांना भारी आवडतात. जाते, हो, मी....साहेब यायची वेळ झाली ! ( जातात. )

सुषमा : आज कुठं चर्चगेटला दिसला नाहीत ?

अपर्णा : मी बोरिवली डबलफास्टला गेले....पाच त्रेचाळीस....मी पाहिलं तुम्हांला....दोन नंबरला....बरोबर कोण होती, हो, तुमच्या ?

सुषमा : असं काय ? ती क्लॅरा रॉड्रिक्स....

अपर्णा : इश्श ! साडी नेसली होती....म्हणून ओळखलीच नाही मी तिला.

सुषमा : तिच्या हातांत नेहमी दोन टाचण्या असतात...

अपर्णा : का ?

सुषमा : काही पुरुष, मेले, गर्दीत मुद्दाम मांड्यांना हात लावतात...मग ही हाताला टाचण्या टोचते...

अपर्णा : ( हसते, आणि ) छान आहे कल्पना ! मलाही टाचण्या घेतल्या पाहिजेत ऑफिसातून येताना. मलाही तो त्रास होतोय् हल्ली ! (पेढे देत ) पेढे घ्या ! मला बढती मिळालीय्....!

सुषमा : हो का ! कॉंग्रॅच्युलेशन्स !....तुमच्या जाहिरातीच्या फील्डमधल्या नोकऱ्या बऱ्या असतात....आमच्याकडे बढत्या नाहीत आणि काही

नाही ! वर्षाला साहेबाच्या मर्जीनं पंधरा-वीस वाढतात, तेवढेच ! खरं म्हणजे...माझ्या बाबांच्या कारखान्यात मला मोठी नोकरी मिळाली असती ...पण आमचा वाकडेपणा आहे ना...?

अपर्णा : का ?

सुषमा : लग्नावरून ! त्यांना पसंत नव्हतं...आम्ही ब्राह्मण...विश्राम सोनार ....शिवाय नाटकी...शिवाय त्याची आधीची इतर नटयांशी प्रकरणं होती...शिवाय वयानं मोठा...म्हणून विरोध ! मी पळून गेले ना ? (बसत) नाहीतर आज मी मोटारगाडीनं फिरले असते ! बाबांचा स्टेनलेस् भांड्यांचा कारखाना आहे...शालूचा नवरा तिथंच मॅनेजर आहे !....शालू –माझी धाकटी बहीण...बाबांनी तिला मोटर घेऊन दिलीय्...मी कधी बस-स्टॉपवर उभी असते...ही मोटारनं जाते...बघते...पण कधी लिफ्ट देत नाही ! न पाहिल्यासारखं करते ! असू दे ! मोटारगाडीतच काही सगळं सुख नाही ! नाही ? मी सुखी आहे.

अपर्णा : (थोडी थांबून) हल्ली आमच्या ऑफिसमध्ये बरीच गडबड चाललीय्.

सुषमा : तुमचा बॉस कुणी तरी नवीन आलाय् ना ?

अपर्णा : (उत्साहित होऊन) हो...हो ! कृष्णराव ठोसर...केटी म्हणतात त्याला...

सुषमा : दिसायला देखणा आहे, म्हणे !

अपर्णा : तुम्हांला कुणी सांगितलं ?

सुषमा : तुमच्या राजेबाई भेटल्या होत्या गाडीत ! त्यांना पण मिळालं का प्रमोशन ?

अपर्णा : छे....छे ! त्या नुसत्या कॅशियर आहेत ! मी आता मेडिया कोऑर्डि-नेटर झालेय्– म्हणजे मला त्या कामाची फारशी माहिती नाही...पण जमेल अनुभवानं !

सुषमा : राजेबाई म्हणत होत्या....केटी दिसायला सुंदर आहेत...स्वभावानं गोड आहेत...उमदे आहेत...

अपर्णा : (एकदम गोड स्वप्नात शिरल्यासारखी करीत) एक गंमतीचा योगायोग कसा आहे, पाहा...(एकदम वेगळ्या आवाजात) तुम्हांला थोडा वेळ आहे ना पण ?

सुषमा : भरपूर !

अपर्णा : तुमचे विश्राम आलेत, म्हणून म्हणते.

सुषमा : तो पीत बसला असणार.... ! सांगा तुम्ही.

अपर्णा : एक गमतीचा योगायोग, म्हणजे तुमचा विश्वास आहे, की नाही, कोण जाणे...पण माझा आहे....मी बायजीकडे राहायला आले ना....कधी? मी बारा वर्षांची होते...तिथं, वरच्या मजल्यावर, एक सिनकर नावाची फॅमिली राहायची...आई....आणि मुलगा...वडील त्याचे त्यावेळी बदली होऊन बेळगावला गेले होते....हा मुलगा मॅट्रिकला होता....सतीश नाव त्याचं ...सतीश सिनकर...छान दिसायचा...चांगला गोरा...धारदार नाक.... कपाळावर असे त्याचे केस भुरभुरायचे...मी गच्चीत गेले, की तो माझ्या मागून गच्चीत यायचा...दोन-तीनदाच आला. त्याला इंग्रजी कवितांचं वेड होतं....आणि त्याला सैगलची गाणी आवडत...मला एकदा म्हणाला, 'सावू, तुला इंग्रजी कविता आवडतात?' मी त्यावेळी बारा वर्षांची.... मला काय कळतं इंग्रजी कवितेत ! पण मी 'हो' म्हटलं...मग तो एखाद्या मोठ्या नटासारखा उभा राहिला...आणि कविता म्हणू लागला :

> They are all gone away...
> The House is shut and still
> There is nothing more to say.
> Through broken walls and gray
> The winds blow bleak and shrill.
> They are all gone away...

इंग्रजीचा प्रोफेसर व्हायचं होतं त्याला. तेवढ्यात खालनं आईनं त्याला हाक मारली... आईला फार घाबरायचा तो...हाक ऐकताच भ्याला...मला शेकहॅण्ड करीत म्हणाला, 'पुढली कडवी उद्या म्हणतो...' आणि परत कधी भेटलाच नाही !

सुषमा : का ?

अपर्णा : त्याच्या आईनं बंदी केली.

सुषमा : का ?

अपर्णा : माझ्यामुळं अभ्यासात दुर्लक्ष होईल, म्हणून ! शिवाय पळून गेलेल्या

आईची मुलगी मी ! तो हुशार होता…पहिल्या पन्नासांत आला असता मॅट्रिकला….त्याला सैगलची गाणी आवडत, म्हणून मी गॅलरीत बसून गाणी गायची… ‘ झुलना झुलाव झुलावो, रे ! अंबुवा के डारी पे कोयल बोले… ’ तो वरनं गॅलरीतनं ऐकायचा…गॅलरीच्या कठड्यावर हनुवटी ठेवून…ढगातून चंद्र दिसावा, तसा दिसायचा…त्याच्या गॅलरीत गुलाबाच्या कुंड्या होत्या….मी खाली गाऊ लागले, की तो वरून गुलाबाच्या पाकळ्या माझ्या अंगावर टाकायचा !…

[ ती स्वप्नात विरघळल्यासारखी बघत राहते. तिला त्या गाण्याचे मंद स्वर ऐकू येतात. ]

सुषमा : मग ? पुढं काय झालं ?

[ अपर्णा एकदम स्वप्नातून जागी होते. ]

अपर्णा : मग बायजीला सांगून त्याच्या आईनं मला गायची बंदी केली .. त्याच्या अभ्यासात व्यत्यय येतो, म्हणून…मग त्याला घेऊन ती आपल्या बहिणीकडे गेली … परीक्षा झाल्याबरोबर सतीशला घेऊन बेळगावला गेली ! मग तो कधी दिसलाच नाही.

सुषमा : पुढं ?

अपर्णा : जूनमध्ये कळलं…सतीश नापास झाला….पाठोपाठ कळलं…बेळगावला रेल्वे इंजिनला आपटून तो गेला…

सुषमा : आत्महत्या ?

अपर्णा : कोण जाणे !

[ ती गंभीर व उदास होते. उदास संगीत ऐकू येते. दोघीही थोडा वेळ गप्प. ]

सुषमा : जाऊ द्या, हो ! शेवटी भेटलेच ना श्यामराव ? तेही इंग्रजीचे प्रोफेसरच की !

अपर्णा : श्याम् मला प्रथम मागणी घालायला आला ना, तेव्हा सुद्धा मला वाटलं, याला सतीशच्याच आत्म्यानं माझ्याकडे पाठवलं असेल का?

सुषमा : म्हणून तुम्ही मुलाचं नाव सतीश ठेवलंत ?

अपर्णा : ( डोळे पुसता पुसता मानेने होय म्हणते. ) तो झाला, तेव्हा अगदी सतीशसारखा दिसायचा !

सुषमा : पण आत्ता त्या योगायोगाचं काय सांगत होता ?

अपर्णा : ( भानावर येत ) आता हा ऑफिसमध्ये केटी आलाय् ना ?...त्याला पाहिल्याबरोबर मला वाटलं, यालाही सतीशच्या आत्म्यानंच पाठवलाय्.... हुबेहूब सतीशसारखा ! आज सतीश असता, तर तो केटीसारखा दिसला असता... आणि गंमत बघा.... केटीलाही सैगलची गाणी आवडतात.... मी त्याला माझ्या आवाजातली टेप दिली...' झुलना झुलाव झुलावो, रे '... केवढा खूश झाला तो माझ्यावर....!

सुषमा : ( उठण्याच्या बेतात ) गंमत आहे एक एक...

अपर्णा : सुषमाबाई, तुमचा विश्वास आहे का, हो, या गोष्टीवर ?

सुषमा : कुठल्या गोष्टीवर ?

अपर्णा : की आपल्या भोवती आत्मे वावरत असात्रेत, यावर !

सुषमा : कुणाला मेलीला वेळ आहे याचा विचार करायला ? काहींचा विश्वास असणारच...ती अल्मेडाबाई येते ( उठत स्मशानाकडील खिडकी-कडे येते. बाहेर पाहते. ) इथं थडग्यापाशी, ती का उगाच ! ( ती बाहेर थडग्याकडे पाहत राहते. तिच्या मागोमाग अपर्णा उभी राहून स्मशाना-कडे बघते. ) ते तिथं कोपऱ्यात ते उंच संगमरवरी थडगं, दिसतंय् ना ?

अपर्णा : ( बाहेर बघत ) ते ! कुणाचं ते ?

सुषमा : हायसिंथ परेरा नाव तिचं....सुंदर होती, म्हणे, दिसायला ! अनेक पुरुषांना तिनं सौंदर्याच्या जोरावर नाचवलं होतं...तिच्या थडग्यावर दोन ओळी कोरलेल्या आहेत :

As you are now–so once was I,
Prepare for death, and follow me...!

[ तेवढ्यात दारात बाळाराव उभे. बरेचसे बावळट ध्यान. पन्नाशीच्या पुढचे. पँट–टाय्–कोट. डोक्यावर सनहॅट ! दारात उभे राहतात आणि हॅट काढून काखेत धरतात. चश्मा मागे सारतात. ]

अपर्णा : ( चकित होऊन बाळाराव ? आज क्लबमध्ये न जाता इथं ? आश्चर्यच आहे !

[ बाळाराव फक्त हसतात आणि आत येतात. सुषमा जायला निघते. 'मी येते, हो' असे सांगून जाऊ लागते. पण तेवढ्यात बाळाराव तिचा हात हातात घेऊन शेक–हँड करीत राहतात. त्यांना तो छंद आहे. ]

बाळा० : ओऽऽहो....हो ! सुषमाबाई का ! वाः वाः ! ( ती हात सोडवून घेते. ) मी दचकलोच एकदम ! मला वाटलं, बायजी आलीय्, की काय ?

अपर्णा : येणार होती ?

[ सुषमा 'येते, हो...' असे म्हणून हसत हसत पळ काढते. ]

बाळा० : येणार आहे ? ( बसता बसता उठतात. )

अपर्णा : ( हसत ) नाही, हो ! तुम्ही बसा ! पण नेहमीचा क्लब सोडून.... तुम्ही इथं कसे ?

बाळा० : क्लबचा प्रेसिडेंट मेला ! क्लबमध्ये आज दुखवट्याची सभा आहे ! म्हटलं, तिथं दोन मिनिटं उभं राहण्यापेक्षा इथं दोन मिनिटं बसावं ! ( हसतात. ) श्यामराव कुठं गेले ?

[ त्यांना गंभीर–कष्टी चेहऱ्याने, एकसुरी पण खालच्या आवाजात बोलायची सवय आहे. शिवाय चिरूट. विझलेला असला, तरी तो तोंडात हवाच ! ]

अपर्णा : श्यामू बाहेर गेलाय ! बायजी काय म्हणते ?

बाळा० : ती कधी काय म्हणते ? पूजा–अर्चा–उपास–कीर्तनं–भजनं–पुराणं ! शंकराला तीन लाख बेल–गणपतीला पाच लाख दूर्वा–कृष्णाला आठ लाख तुळशी ! तिथं लाखाशिवाय बात नाही ! शिवाय स्वामी–मुनी आणि

बुवा !....आणि तुमचा सतीश ! तिचा वेळ बरा जातोय्...तो नुसता दमवतोय् तिला !

अपर्णा : मला आठवडाभर येताच आलं नाही तिथं ! काल श्यामूला म्हटलं होतं, जा आणि सतीशला घेऊन ये ! पण त्यालाही जाता आलं नाही !

बाळा० : श्यामराव कुठं गेले ?

अपर्णा : आज त्याची मीटिंग आहे....इंग्लिश अ‍ॅसोसिएशनची ! ( उठत ) बाळाराव, चहा करते गरम गरम...आणि थोडे पोहे !

बाळा० : नको !....नको !

अपर्णा : का ?

बाळा० : सूर्यास्त झाला ! चहा-कॉफी-दूध वगैरे सूर्यास्ताच्या आधीचीड्रिंक्स् !

अपर्णा : तुम्ही घरी पिता, ते इथं कसं मिळेल ?

बाळा० : पाणी तरी मिळेल ? मला तू पाणी स्टेनलेस्च्या ग्लासातून दे ! किंवा तांब्या आणि फुलपात्र ! ( ती आत जाते. बाळाराव चिरूट पेटवतात आणि बसतात. ती तांब्या–फुलपात्र घेऊन येते. ) गुड् ! फुलपात्र बरं ! ( फुलपात्रात पाणी ओततात. आतल्या खिशातून ब्रँडीची छोटी चपटी बाटली काढून थोडी ब्रँडी फुलपात्रात ओततात ! ) तू होतीस, तेव्हा रात्री मी क्लबामधून घरी आलो, की तू स्टुलावर बाटली, ग्लास, पाणी ठेवायचीस ! आता सगळं मलाच करावं लागतं !...तू अजून फ्रीझ घेतला नाहीस ! ( स्वतःशीच 'चीअर्स' असे म्हणून फुलपात्र वर करतात आणि तोंडाला लावतात. )

अपर्णा : केवढी महागाई, बाळाराव ! पगारात कुठं भागतंय् ?

बाळा० : पूर्वी बायजी शाळेत नोकरी करीत होती, तेव्हा घरात दोन पगार येत होते. तेव्हाही भागत नव्हतं ! आता त्या दोन पगारांपेक्षा अधिक पगार मी एकटा कमावतो, तरीही भागत नाही ! तात्पर्य काय ? भागत नाही, हा सगळ्याच पगारांचा समान गुणधर्म आहे ! भागेल...

अपर्णा : सांगायला विसरलेच तुम्हांला, बाळाराव ! आजच मला प्रमोशन मिळालं ! ( पेढे देते. )

बाळा० : गुड्....गुड् ! ( तिचा हात हातात घेऊन बराच वेळ हातवीत राहतात. आणि ) काँग्रॅच्युलेशन्स्–काँग्रॅच्युलेशन्स्–काँग्रॅच्युलेशन्स....!

[ ती हसते...पण मनातून वैतागते. मग ती हात सोडवून घेते. थोडा वेळ कुणी काही बोलत नाही. बाळाराव चिरूट ओढत, पीत राहतात. अपर्णा बोलू, की नको, अशासंभ्रमात पडते. ]

अपर्णा : बाळाराव, तुम्हांला एक गोष्ट विचारू ? राग नाही ना येणार ?

बाळा० : विचार ग, विचार ! तुझ्यावर मी कधी सुद्धा रागावणार नाही !

अपर्णा : पण खरं म्हणजे अगदी खरं सांगायचं...

बाळा० : सांगेन ! तुला मी खोटं नाही सांगणार...तुझ्याशी मोकळेपणानं बोलणं हा एक माझा विरंगुळा आहे, सावू !...विचार...

अपर्णा : तुम्ही बाहेर बाई ठेवलीय्...? ( बाळाराव एकदम चमकून बघत राहतात. ) असा बायजीला संशय आहे !

बाळा० : खोटं, खोटं....साफ खोटं ! ( पितात. )

अपर्णा : पण तिला तसा दाट संशय आहे !

बाळा० : ती नुसतीच मूर्ख नाही, महामूर्ख आहे ! ( पितात....चिरूट पेटवतात ) पण अगदी तुला म्हणून एक सांगतो....मला बाहेर बाई ठेवावी, असं मात्र वाटतं ! बट् आय् हॅव नो करेज...मला ते धैर्य नाही ! म्हणून मी हे रेटतोय् सगळं ! मारून मुटकून ! आणि वर ही वटसावित्रीची पूजा करते ! महामूर्ख !

अपर्णा : पण का ? असं का वाटावं ? मारून मुटकून का ?

बाळा० : ते, सावू, तुला कळायचं नाही ! तू लहान आहेस ! ( पितात गटकन....आणि तोंड वेडंवाकडं कडवट, करीत म्हणतात ) शी इज ए डॅम फ्रिजिड वुमन ! कसलं कसलं म्हणून सुख नाही ! मनाला कसला विरंगुळा नाही ! दोन वेळच्या जेवणासाठी एकत्र राहायचं ! टेरिबल ! टेरिबल ! हे ( मद्य दाखवीत ) हे सुद्धा मी प्रमाणाबाहेर पितो, म्हणजे काय ? बिछान्यावर पडलो, की झोप यावी.

अपर्णा : पण मला कळत नाही...संसारात हे असं का व्हावं ?

बाळा० : इथं मी आलो होतो, म्हणून सांगू नकोस तिला ! मी कधीही घरी उशिरा आलो, की ही परत परत....खोदून खोदून विचारणार.. ( नक्कल करीत ) सावूकडे गेला होतात ? सावूकडे गेला होतात ? तुझ्यावरून

सुद्धा ती माझा संशय घेते! शी:! खरं म्हणजे तू मला मुलीसारखी! (काही क्षण पीत राहतात...आणि मग...) तुझा तो गोड पोरगा...कोण तो? तो सतीश सिनकर...ग...

अपर्णा : (एकदम चमकून) त्याचं काय?

बाळा० : तो गच्चीत ती कविता म्हणायचा. तूच सांगितली होतीस मला... (दारूने जड झालेले डोके खाली करून, अपर्णाचे अस्तित्व विसरून, जड आवाजात चार ओळी म्हणतात :)

There is ruin and decay
In the house on the hill
They are all gone away...
There is nothing more to say...

तशी आमच्या घराची गत झालेली आहे!...There is nothing more to say...

[ ते पुन: मद्य ओततात आणि फुलपात्राकडे गरीब होऊन पाहत राहतात. अपर्णाही त्यांची दया येऊन त्यांना पाहत राहते.

[ इतक्यात दारावर टकटक. अपर्णा दार उघडते. बाहेरून बायजीचा आवाज. 'संध्याकाळी दारं कसली लावून बसता?' बाळारावांची तारांबळ. ती पाहून अपर्णाला हसू येते. बायजी आत येते. तिच्या हातात बेलाने भरलेली पिशवी. पायात काहीतरी दुखापत असल्यासारखी चालते. अंगाने स्थूल. डोळ्यांवर चश्मा. दिसण्यास तेलकट, बावळट, आणि निरस. ]

बायजी : तुम्ही इथं कसे?

बाळा० : क्लबचा प्रेसिडेंट मेला!

[ बाळाराव फक्त पीत बसतात. बोलतात थोडे. ]

बायजी : म्हणून इथं?

बाळा० : इतक्या लवकर घरी जाऊन काय करायचं?... करायचं काय? काय बेलाची तिकटी निवडायची?

[ बायजी पाय पसरून जमिनीवर बसते. ]

बायजी : ( बाळाराव पितात. त्यांच्याकडे पाहून )... फुलपात्रातून कशाला ते घ्यायचं तीर्थासारखं? जगभर माहिती आहे. लपवायचं कशाला? ( अपर्णाला ) तुझे हे जिने चढायचे, म्हणजे जिवावर येतं, बाई! कपडे झाले का तयार सतीशचे!

अपर्णा : अग, तू कशाला यायला हवं होतंस?.... उद्या श्यामू आला असता .... कॉलेजातून येताना.

बायजी : ( दिवाणावर बसत...तोंड वेडंवाकडं करीत ) अग, मुद्दाम कपडे आणायला म्हणून आले नाही. सतीश गेलाय् लॉरेल–हार्डी बघायला शेजारच्या केतकीबरोबर! मी आले होते या दत्तमंदिरात....! भजन होतं नांदुर्डीकरबुवांचं!... छान गळा आहे बुवांचा! आणि या वयात सुद्धा दिसायला, ग, किती देखणे, लालबुंद, तुकतुकीत! ( कंटाळवाणा चेहरा करीत ) मला वाटतं, बऱ्याचशा बायका, मेल्या, त्यालाच बघायला आल्या होत्या!

बाळा० : हीच फक्त तेवढी कीर्तनाला गेली होती!

बायजी : होऽऽ! काही तरीच बोलायचं ते!

अपर्णा : ( हसते ) पिशवीत काय एवढं भरून आणलंस?

बायजी : बेल तो!...देवळाच्या बाहेरच मिळाला.

अपर्णा : पण तू सोमवारी घालतेस ना बेल?

बायजी : पाच लाखांचा संकल्प सोडलाय्! दर दिवशी थोडा थोडा वाहते बेल!

अपर्णा : ( हसत ) बायजी, तू एवढी बी. ए. बी. टी...बी. टी. फर्स्ट क्लास–

बायजी : ( गंभीरपणे ) उपयोग काय? असंच ना?

[ बायजी पिशवीतून कागदात गुंडाळलेला एक फोटो काढते. अपर्णाचा वाडी भरलेला फोटो. ]

बायजी : हा घे तुझा फोटो...काल कपाट लावीत होते, तेव्हा मिळाला.
अपर्णा : कुठला फोटो? (घेते व कागद सोडू लागते.)
बायजी : तुझा गरोदरपणी वाडी भरलेला फोटो, ग! बघ, कशी तेजवान् दिसत होतीस!
बाळा० : (पिता पिता) आणि आता दिसत नाही, की काय तेजवान?

[बायजी नापसंतीने मान वळवून बघते. बाळाराव मान खाली घालून, चिरूट तोंडात फिरवीत राहतात.]

अपर्णा : (फोटोकडे पाहून एकदम लाजल्यासारखी होते) शीः! केवढं पोट दिसतंय् माझं?
बाळा० : बघू...बघू.... (फोटो घेतात आणि बघत राहतात.)
बायजी : तुझ्या हॉलात लाव... (जागा दाखवीत) तिथं लाव.
बाळा० : (फोटो बघत) गरोदर बाई म्हणजे... एक वेगळंच सौंदर्य असतं...
बायजी : (वैतागून) असू दे! आणा तो इकडं... (फोटो घेऊन अपर्णाकडे देते.) कपाटात पडला होता.... माझ्या लक्षातच नाही.
अपर्णा : तुझा तो एक चाळा आहेच...! कपाट लावायचं.... स्वैपाकखोली-तल्या डब्यांवर हरभरे... चवळी... मूग... मटकी अशी लेबलं लिहून ती चिटकवायची!
बायजी : पण हल्ली डोक्यात म्हणून काही राहात नाही. एकदा सगळं घर सुद्धा झाडायचं आहे.... खूप झुरळं झालीत...
बाळा० : (चढलेल्या आवाजात) एकही झुरळ नाही घरात! पण हिनं एक वेळ घालवण्यासाठी सवय लावून घेतलीय्! ...झाडू घेऊन झुरळ शोधत बसायचं.... दुसरा उद्योग नाही!
बायजी : होय! तुम्ही असता कुठं घरी? रात्री दोन घास गिळण्यापुरते असता तेवढे! (अपर्णाला) इथं नाहीत ना झुरळं?
अपर्णा : छे! पण पाली मात्र आहेत!
बायजी : पाली मारू नकोस, हो! पाल मारली, की वंश वाढत नाही! पाली मारू नयेत.
बाळा० : (पेल्यातला शेवटचा घोट घेत, जड आवाजात) फक्त झुरळं

मारावीत !

बायजी : ( बाळारावांवर वैतागाचा कटाक्ष टाकून ) सावू, जरा माझे पाय चेपून दे, बाई ! नुसते सकाळपासून घण घातल्यासारखे फुटताहेत...तू गेल्यापासून कोणी नाही चेपत ! तुझा सत्या पायावर उभा राहतो, ग...तो पोर...पण त्या पोराला काय वजन आहे ? ( झोपते. बाळाराव पँटीचे बटण सोडत बाथरूमला जातात. अपर्णा खिडकीचे गज धरून बायजीचे पाय चेपते. चेपता चेपता ) सावू, विचारलंस का त्यांना ?

अपर्णा : कुणाला ?

बायजी : ( चिडून, मान वर करीत ) तुला सगळं मोठ्यानं ओरडून सांगायला हवं ! विचारलंस तुझ्या रावजींना ?

अपर्णा : बाळारावांना ना ? विचारलं ! ( बायजी पोटावर झोपलेली असताना मान वर करून बघते. ) बायजी, तुझा हा संशयी स्वभाव आहे ना, तो तू सोडून दे !

बायजी : ( स्वतःशीच ) काही नाही संशयी स्वभाव...

अपर्णा : अशानं संसाराचा विचका करून घेशील !

बायजी : काय व्हायचा राहिलाय् ? ( आणि चिडून ) आणि तुझ्या रावजींचा स्वभाव काही कमी संशयी नाही.

अपर्णा : त्यांनी काय केलंय् ?

बायजी : तुला सगळं जुनं सांगून, काय करायचंयू काय ?... ( मग एकदम राग येऊन ) तारकुंडे मास्तरांवरून संशय घेऊन मला नोकरी सोडायला लावली.... आणि घरी बसवली मला !... आणि तू तोंड वर करून विचारतेस, बी. ए. बी. टी. असून उपयोग काय ?.... उपयोग ? बायकांचा जन्म !

अपर्णा : हे मी एकेक ऐकते ना, बायजी, तेव्हा तेव्हा माझा जीव कासावीस होतो ! वाटतं, संसार... संसार... याला अर्थ काय ?

बायजी : ( शांतपणे ) कर्म... कर्म एकेकाचं ! दुसरं काय ?... पुरे तुझं पाय तुडवणं...

[ बायजी उठून बसते. बसल्या बसल्या आपणच पाय दाबते. क्षणभर

दोघी शांत बसतात. मग– ]

अपर्णा : बायजी, तुला चहा करू, की कॉफी ?

बायजी : तुला माहीत आहे ना ?-- या वेळेला मी चहा-कॉफी घेत नाही, ते ? उशिरा चहा घेतला, की झोप नाही यायची... रात्रभर बिछान्यात तळमळायला पाहिजे.

[ बाळाराव बटणे लावीत परत येतात व बसतात. ]

अपर्णा : तुला त्रास देतो का फार !... सत्त्या, ग...

बायजी : काही विचारू नकोस ! नुसता वांड झालाय ! पण जाग होते घरात.

अपर्णा : ही सुट्टी झाली, की त्याला इथंच आणायचं म्हणतोय् श्यामू.

बायजी : इथं त्याला पाहणार कोण ? तुझी नोकरी ! श्यामराव कॉलेजात ! कॉलेजातून आले, की त्यांचं डोकं पुस्तकात...सत्त्याकडे बघणार कोण ?

अपर्णा : श्यामू म्हणतो, नोकरी सोड... अय्या, विसरलेच ! ( पेढे आणायला जाते. )

बायजी : नोकरी मात्र सोडू नकोस ! बायकांनी परस्वाधीन होता नये.

[ बाळाराव विझलेला चिरूट पेटवण्याचा प्रयत्न करतात. ]

अपर्णा : मला ऑफिसमध्ये प्रमोशन मिळालं, बायजी !

बायजी : छान झालं, बाई ! नोकरीबिकरी सोडायची नाही, हो ! माझं काय झालंय्, ते बघ. एकूण नवरेमंडळींचं काही खरं नाही !

[ बाळाराव परत परत काड्या पेटवून चिरूट पेटवतात– मग जायला उठतात. ]

बाळा० : निघतो मी, ग, सावू...

बायजी : थांबा जरा !... मी पण येते...

बाळा० : ( पळ काढण्याच्या इराद्याने ) मला दुसरीकडं जायचंय्.

बायजी : ( त्यांच्या पाठोपाठ घाईघाईने जात ) सरळ घरी चला ! सगळ्या बायकांची तोंडं बघत कशाला भटकायचं ते ?

[ दोघेही जातात. अपर्णा तांब्या, फुलपात्र वगैरे सारे आवरून आत जाते. थोडे संगीत सुरू होते...
आणि दारात एक बाई आमलेली दिसते. तिच्यावर प्रकाशझोत पडतो. वयाने उतार. संपूर्ण पांढरे वस्त्र नेसलेली. मांजरपाटासारखे बरेच मोठे कापड अंगाभोवती गुंडाळून डोक्यावरून घेतलेले. फक्त तोंड दिसते. किंचित पांढुरके केस. कुंकू नाही. फिक्कट चेहरा. पान खाऊन खाऊन ओठ बरबटलेले. तिने अंगावरचे वस्त्र दोन्ही हातांनी आवळून धरले आहे. एका हातात कपड्यांची पिशवी लोंबते आहे.
अपर्णा बाहेर येताच ती बाई तिच्या दृष्टीस पडते. क्षणभर अपर्णा तिला न्याहाळीत राहते. तिला चटकन् ओळख पटत नाही. ती बघतच राहते. ती बाई मात्र हसण्याचा प्रयत्न करते. ]

अय्या : सावू, किती मोठी झाली माझी सावू ? ...आत्ता बायजी–बाळाराव गेले...ओळखलं नाही त्यांनी...

अपर्णा : ( गोंधळून ) कोण तू ?

अय्या : आई तुझी ! मी तुझी अय्या, सावू...आई तुझी... ( अपेक्षेने बघते )

अपर्णा : ( तिला धक्का बसतो. स्वतःला सावरते. ) सावूची अय्या मेली आहे. तुला हा पत्ता कुणी सांगितला ? ( अय्या बोलत नाही. पाहत राहते. ) तू आता इथं कशाला आली आहेस ?

अय्या : मला चार दिवस ठेवून घे, सावू...

अपर्णा : तू पळून आली आहेस ?

अय्या : नाही.

अपर्णा : तुला त्या तबलजीनं – कासमनं टाकली आहे ?

अय्या : नाही !

अपर्णा : मग तू कशासाठी आली आहेस ?

अय्या : तुझं स्वतःचं घर झालंयू ! चार दिवस आपल्या मुलीकडं राहावंसं वाटतंयू ! चार दिवस आपल्या पद्धतीचं जेवावं, अशी इच्छा झालीयू...तुझ्या

हातचं... केळीच्या पानावर वाढ मला.... वरणभात.... गरम गरम... श्रावण महिना आलाय्.

अपर्णा : दहा वर्षांच्या पोरीला आणि सज्जन नवऱ्याला टाकून जाताना विचार करायचा होतास !

अय्या : ( थोडा वेळ थांबून ) त्या जुन्या गोष्टी आता विसरून जा, सावू ! ( थांबून, अपेक्षेने ) राहू मी दोन दिवस ?

अपर्णा : नाही. माझी आणि नानाकाकांची केलीस तेवढी परवड पुरे आहे.

अय्या : किती वर्षं झाली त्याला ?

अपर्णा : आणि आता आलीच आहेस, तर एक सांग... मी नानाकाकांची, की त्या कासमची ?

अय्या : काय विचारतेस, सावू ?

अपर्णा : मी तुला आज विचारतेय् ? दहाव्या वर्षापासून मला सगळे विचारायचे.

अय्या : कोण ? सगळे, म्हणजे कोण ?

अपर्णा : सगळे ! नानाकाकासुद्धा !

[ अय्या दोन क्षण काहीच बोलत नाही. ]

अय्या : राहू मी ?

अपर्णा : नको !

अय्या : नातवंडाचं तरी तोंड दाखव !

अपर्णा : ( चिडून ) नाही ! तू आलीस, तशी परत जा ! आणि परत इथं येऊ नकोस. सांगून ठेवते !

[ अय्या निराशेने वळते आणि निघून जाते. ती जात असताना तिला पाठमोरी बघत अपर्णा उभी आहे. हळू हळू काळोख होत जातो. ]

पडदा.

# अंक दुसरा

[ श्यामूचे घर. एक-दीड वर्षानंतर. वेळ संध्याकाळची. घरात दिवे लागलेले आहेत. श्यामू धुतलेल्या कपड्यांच्या घड्या करून ठेवतो आहे. साधारण अकरा–बारा वर्षांचा सतीश एक मासिक चाळत बसला आहे. तो जांभई देतो. जरा कंटाळतो. मासिक बंद करून श्यामूकडे पाहतो.]

सतीश : मी करू का घड्या ?

श्यामू : नको ! मी करतो !

सतीश : ( पुन: मासिक चाळत ) बाबा, तुम्हांला एक कोडं घालू का ! ( घड्या करता करता श्यामू फक्त वर बघतो. ) एका राजाने परगावाहून आपल्या राणीस कबुतराच्या चोचीतून एक पत्र पाठवलं ! आणि त्या कबुतराबरोबर एक सुतार-पक्षी सुद्धा पाठवला !...का ?

श्यामू : का ?

सतीश : हरलात ? ( श्यामू मानेने होय म्हणतो ) राणीच्या दारावर चोचीनं टक्‌टक् करण्यासाठी ! ( आणखी एक विनोद वाचता वाचता स्वतःशीच हसतो. )

श्यामू : काय झालं ?

सतीश : ( हसत ) एक गंमतीचा संवाद आहे... ( वाचतो ) श्यामराव...

श्यामू : ओ ऽ ऽ

सतीश : तुम्ही नाही ! इथं रामराव श्यामरावांना विचारताहेत : 'श्यामराव, तुम्ही रात्री झोपतानाही डोळ्यांवर चश्मा का ठेवता ?'...( श्यामूला ) का ?

श्याम् : त्यामुळं स्वप्नं स्वच्छ दिसत असतील !

सतीश : वाः, श्यामराव ! शाब्बास !

[ श्याम् कपडे घेऊन आत जातो. तेवढयात घाईघाईने मानसी येते. ]

मानसी : ( सतीशला जवळ घेऊन कौतुक करीत ) काय करतो आहेस ?

सतीश : आईची वाट बघतोय्.

मानसी : श्याम् नाही आला ?

सतीश : आत आहेत...येताहेत... ( मानसी खिडकीतून बाहेर बघते. ) मावशी, त्या थडग्यावर काय कोरलेलं आहे, ते सांगू ?

मानसी : मला माहीत आहे.

सतीश : ( वैतागून ) हे, हो काय ?....मी सांगतो ना.

मानसी : बरं ! सांग...सांग—

सतीश : त्या थडग्यावर कोरलंय् :

As you are now, so once was I '
Prepare for death and follow me.

मानसी : ( त्याचे केस कुरवाळीत शाबासकी देते ) वाः वा : वा : ! हुशार आहेस !

[ तेवढयात श्याम् बाहेर येतो. ]

श्याम् : तू कधी आलीस ?

मानसी : आत्ताच ! सावू नाही आली ?

श्याम् : ( कडवटपणे ) ती कुठं एवढयात यायला ? मेडिया कोऑर्डिनेटर आहे ना ती ! कुठं कुठं....काय काय कोऑर्डिनेट करीत फिरत असेल.

मानसी : सावू असती, तर बरं झालं असतं...

श्याम् : का ?

मानसी : तुझ्याशी मला काही बोलायचं होतं...तिच्या संबंधांतच... ( ती सतीशने जावे, म्हणून वळून बघते. )

सतीश : ( ते लक्षात येऊन ) मी गॅलरीत उभा राहतो. वाट बघतो आईची.

( गॅलरीत जातो. पण लक्ष आत आहे. )

श्यामू : ( बसत ) काय म्हणतेस ?

मानसी : श्यामू, मला वाटतं....म्हणजे ती जे मला म्हणाली, त्याच्यावरून सांगते मी...आय् थिंक, यू आर् नॉट बिहेविंग ॲज यू शुड !.. तिच्याशी तू इतर चार मुर्दाड नवऱ्यांसारखं वागता नये !

श्यामू : म्हणजे कसं ! मी काय मुर्दाडपणे वागलो ? पहाटे उठून दूध मी आणतो...चहा मी करतो....आंघोळीचं पाणी मी तापवितो...साबणाच्या पाण्यात कपडे सतीश घालतो. बहुतेक वेळा भाजीपाला ...गहू...तांदूळ... साखर मी आणतो ..रांगेत मी उभा राहतो. ती इथं असते, तेव्हा सकाळचं जेवण ती करते...रात्रीचा कुकर मी लावतो···कपड्यांच्या घड्या मी करतो...

सतीश : ( गॅलरीतून ) मावशी, मी गाद्या घालतो !... आणि वाण्याकडून सामान आणतो.

[ मानसी कौतुकाने हसते. श्यामू मात्र गंभीर. ]

श्यामू : सांग ना, मी मुर्दाडपणानं वागतो, म्हणजे काय करतो ! मी आणखी काय करायला पाहिजे ?

मानसी : नोकर ठेवायला काय हरकत आहे ?

श्यामू : काय हरकत आहे ? नोकर आणून दे ! हल्ली मिळतात कुठं नोकर ? सांग... मी आणखी काय करायला पाहिजे ?

मानसी : ( जरा वैतागून ) हे नव्हे, रे ! घरातली असली कामं एकमेकानं सोयीप्रमाणं करायलाच पाहिजेत !...आपण हे करतो आणि ते करतो, हे म्हणू सुद्धा नये !

श्यामू : ( जरा चिडून ) पण तिचं म्हणणं काय आहे ?

सतीश : बाबा, मी जरा गच्चीत जाऊ का ? ( उत्तराची वाट न बघता वर जातो. )

मानसी : अरे, श्याम्या, तिचं म्हणणं काय आहे, हे तू तिला न विचारता मला विचारतो आहेस !...यावरनं तुमच्यांत दुरावा निर्माण होतोय, हे तुझ्या लक्षात येत नाही का !

श्याम् : मग तिनं सुद्धा माझ्याशी न बोलता तुला का सांगावं ?

मानसी : याचं उत्तर मी काय देणार ? तू दे !

श्याम् : पण तिचं म्हणणं काय ?

मानसी : हे बघ, श्याम्, अॅज यू नो सावू....ती हुशार आहे, स्मार्ट आहे.... पण स्वच्छ विचार करून काटेकोर निर्णय घेणं तिला जमत नसावं !... उत्साहाच्या भरात...आपली एफिशियन्सी दाखविण्याच्या नादात ती काही गोष्टी करीत असेल ! तिथं तू तिला गाइड करायला पाहिजेस....

श्याम् : पण तिला गायडन्सची गरज असली, तर ना ? या थोड्या अधिक इंटेलिजंट, सक्सेसफुल बायका असतात ना....आय् डोण्ट नो, व्हाय.. त्या उगाच अॅग्रेसिव्ह आणि डॉमिनेटिंग बनत जातात...सावूचं हल्ली तेच चाललंय् !

मानसी : ठीक आहे !....असेलही तसं ! पण बायकांना ही नवीन क्षेत्रं प्रथमच मिळताहेत....म्हणून मॅच्युरिटी थोडी कमी असेल....

श्याम् : ( चिडतो. ) हे बघ ! हे विमेन्स लिबरेशन इयर आहे, असं समजून ती सेमिनारमधली भाषणबाजी माझ्याकडे करू नकोस !

मानसी : गेल्या काही वर्षांत सावूनं आपल्या फील्डमध्ये खूप कर्तबगारी दाखवलेय्. तुला तिचं कौतुक वाटायला हवं.

श्याम् : तिचं नेमकं म्हणणं काय आहे, ते थोडक्यात सांग.

मानसी : तू तिला टाळत असतोस....आणि तिच्याबद्दल संशय घेतोस !

श्याम् : पुरावा ?

मानसी : पीएच्.डी. चं निमित्त करून तू तिला टाळलेस... तिच्याबरोबर पार्ट्यांना जात नाहीस...

शाम् : हे बघ ! तिला टाळण्यासाठी मी पीएच्.डी.ला नाव घातलेलं नाही ! मलाही करीअर आहे. मी पीएच्.डी. झालो, तरच मला हेड ऑफ द डिपार्टमेंट होता येईल...आणि पार्ट्यांबद्दल म्हणत असशील, तर...सुरुवातीला दोन–चारदा मी तिच्याबरोबर गेलो...बट् आय् जस्ट हेट दोज् पार्टीज् .. त्यांचं ते त्यांच्यांतलेच बेडूक ओरडल्यासारखे विनोद, तोंड फाकून खोटं खोटं हसणं....डोळे मारणं....इंग्रजीशिवाय आपल्याला कुठलीही भाषा येत नाही, असं दाखवणं... एकमेकांना चिमटे काढणं. आणि हे सगळं

काम तरी स्वतःच्याच खर्चानं करणं ..हे मला स्वतःला आवडत नाही ! आणि विशेष म्हणजे माझं बोट धरून बायकोनं मला हॉटेलात, पार्टीला नेणं मला आवडत नाही ! तिथं वेळ घालवण्याऐवजी आय् कॅन सिट हिअर विथ शेक्सपिअर आणि सेव्हरल अदर ऑथर्स ! हा माझ्या पर्सनॅलिटीचा भाग आहे !

मानसी : मग किमान तू तिचा संशय तरी घेऊ नकोस ! तिच्यावर पाळत ठेवल्यासारखा वागू नकोस.

श्याम् : मी तिचा काय संशय घेतला ? मी तिच्यावर काय पाळत ठेवली ? प्रदर्शनं भरविण्यासाठी ती बाहेरगावी जाते... कुठं अहमदाबाद...कुठं दिल्ली... कुठं पंजाब...आणि आम्ही शेरे पंजाब !...आलूमटर आणि नानू खात !

मानसी : तो तिच्या करीअरचा भाग नाही का, श्यामू ?

श्याम् : मी नाही म्हणत नाही, मानसी ! पण प्रत्येक टूरवर तिच्याबरोबर तिचा तो केटी का असतो ?

मानसी : समज, तुला अशी नोकरी असतो, आणि तुझी बॉस एखादी फटाकडी असती...( हसत ) माझ्यासारखी, तर तू गेला नसतास तिच्याबरोबर ? गोव्याला ती बोलवत होती ना, तुम्हांला दोघांनाही ? का नाही गेलास ? सतीशलाही पाठवलं नाहीस.

श्याम् : महागड्या हॉटेलात राहणं मला आवडत नाही ! जवळ जवळ रोज रात्री उशिरा ती मोटारीनं इथं येते...ड्रायव्हर असला, तर मोटार इथपर्यंत येते....आणि मोटार केटी चालवत असला, तर मोटार तिथं कोपऱ्यावर, इराण्याच्या हॉटेलपाशी थांबते...आणि तिथनं चालत येते....खोटं वाटत असेल, तर सतीशला विचार...तेवढ्यासाठी त्यानं त्या गॅलरीत ड्यूटी घेतलीय्...

मानसी : ड्यूटी त्यानं घेतलीय्, की तू दिलीस ? सतीशचं मन तू तिच्याविरुद्ध कलुषित करतोस, असं तिला वाटलं, तर तिची काय चूक ?... आणि केटी मोटारीत असला, तर काय बिघडतं ?

श्याम् : माझं काहीच बिघडत नाही ! पण तिला ते लपवावंसं का वाटतं ?

मानसी : ती ते लपवीत असेल, असं मला वाटत नाही. तरीही संशय घेणं,

म्हणजे तिच्यावर अविश्वास दाखवणं, नव्हे का ?

श्याम् : पण मला अविश्वास वाटणार नाही, असं तिनं वागायला नको का ?

मानसी : श्यामू, तू थोडा अधिक समंजसपणा दाखव...चिडू नकोस !

श्यामू : हे बघ, मानसी, या क्षणी मला धूर दिसतो आहे...म्हणून मला आगीचा संशय येतो आहे, एवढंच !

मानसी : संशय घेण्यामुळं रामायणाच्या काळापासून काय घडतंय, ते माहीत आहे ना तुला ?

श्यामू : हे तू मला सांगते आहेस ? तुझा पहिला नवरा—बबन्या फडणीस... त्यानं तुझ्याबद्दल संशय घेतला...तेव्हा बाहेर तुझं काय चाललं होतं ? तू काय मला रामायणातल्या गोष्टी सांगतेस ?

मानसी : ( घड्याळ बघत ) आय् थिंक्, आय् बेटर गो नाऊ....! तू चिडलेला आहेस ! चिडून हे प्रश्न सुटत नाहीत, श्यामू !...तुम्ही दोघांनी हे सगळं सामोपचारानं मिटवायला पाहिजे !

श्यामू : तू स्वतःला काय पंतप्रधान समजतेस, की काय ? सामोपचारानं मिटवा, म्हणून सांगायला ?

मानसी : ( मोठ्याने हसते ) अरे, बाप रे ! फार मोठं प्रमोशन मिळालं मला ! हे बघ...मी निघते....तू तिच्याशी जरा थंड डोक्यानं बोल ! तुमचा दोघांचा संसार पाहिला, की मला किती बरं वाटत होतं...( भावविवश होते आणि निघून जाते. )

[ श्यामू अस्वस्थ होऊन फिरतो. गॅलरीत जातो. वर गच्चीकडे बघत सतीशला हाका मारतो. ]

श्यामू : सतीश... एऽऽ सतीश ! चल, खाली ये... ( थोडा वेळ अस्वस्थ. सतीश येतो. गॅलरीत उभा राहतो....आणि हाताची नखं खाऊ लागतो. ) सतीश, नखं खाऊ नकोस ! ( अस्वस्थपणे फिरतो. पायजम्यावरच पँट चढवतो. शर्ट घालतो. बटणे लावता लावता सतीशकडे लक्ष जाते. तो नखं चावतो आहे. चिडून ) सारखी सारखी ती नखं खाऊ नकोस !

(थोड्या वेळाने) हे बघ....आज जेवण केलेलं नाही....आई किती वाजता येईल, याचा नेम नाही! आणि मला आता कुकर लावायचा कंटाळा आलाय्!...आपण बाहेर जाऊन काही तरी खाऊन येऊ.

सतीश : बाबा, मला भूक नाही लागलेली! (पुन: पटकन् नखं खातो.)

श्याम् : (थंडपणाने, लाडाने) बाळा, नखं खाऊन का पोट भरणार? (हात खाली घेतो.) हे बघ, आपण असं करू... आपण बाहेर जेवू खाणावळीत.

सतीश : नको! खरंच मला भूक नाही, बाबा! तुम्ही जेवून या! मी आईची वाट पाहतो.

श्याम् : आपण असं करू! या इराण्याकडे आम्लेट-पाव खाऊ! तुला आवडतं ना आम्लेट?... आणि आइस्क्रिम देतो तुला! चल ... (बुशशर्ट घालतो. पैशाचे पाकीट घेतो. किल्ल्या घेतो.)

सतीश : (गॅलरीतून) बाबा, आई आली! (आत-बाहेर येतो-जातो. पटापट कॉमेंटरी केल्याप्रमाणे) इराण्याच्या हॉटेलाकडून येतेय्... आज मोटार नाही थांबली.... चालत येतेय्.... बरोबर सुषमामावशी आहे!... आज मोटर नाही... !

श्याम् : मग जरा आपण थांबू! (घाईघाईने बसतो. एक पुस्तक घेतो.... आणि बराच वेळ वाचनात दंग झाल्याचा आविर्भाव करतो.)

[सतीश नखं चावत दरवाजा वाजण्याची वाट पाहतो. दरवाजा वाजताच तो उघडतो. अपर्णा येते. ती त्याला जवळ घेऊन कुरवाळते. मुका घेते अपर्णा पूर्वीपेक्षा फॅशनेबल दिसते. विशेषकरून मेकप आणि केसांची स्टाइल! तशीच उंची साडी! ती पर्स ठेवायला टेबलाकडे जाते. सतीश गरिबासारखा तिला बघत गॅलरीच्या दारात उभा राहतो. ती टेबलाकडे जाताना खिडकीच्या गजांतून तिचे बाहेर–स्मशानाकडे लक्ष जाते. क्षणभर पाहते आणि –]

अपर्णा : आज अल्मेडाबाई आलेली दिसतेय्!... किती मेणबत्त्या लावल्या आहेत, बघ! (श्याम् पुस्तकात मग्न, सतीश भेदरून नखं चावतो. चावता चावता एकदा आईकडे, एकदा बाबांकडे गडबडून बघतो.) . जेवणं

व्हायचीत का?

श्यामू : (थोडा चिडून) तेच म्हणतोय् मी! त्या अल्मेडाच्या मेणबत्त्यांपेक्षा आमच्या जेवणाची चिंता करा.

अपर्णा : जेवण करायचं आहे का?

श्यामू : हो!.... आणि मला आता कुकर लावायचा कंटाळा आलाय्.

सतीश : (नखं खात) मला जेवायचं नाही.... मला भूक नाही...

[ श्यामू आणि अपर्णा एकाच वेळी सतीशकडे बघतात. ]

अपर्णा : अशी नखं तोंडात घालायची नाहीत, बाळ! (श्यामूला).... आणि मला आता कपडे बदलून जायचंय् पार्टीला... ओकरीज् बीअरचं लाँचिंग आहे... 'ऑबेरॉय'मध्ये.

सतीश : जा ना! खुशाल जा! (त्याच्या तुटक बोलण्याने ती चमकते.)

अपर्णा : सतीश, मी येताना पाव आणि अंडी आणलीत! पटकन् तुम्हांला आम्लेटं करून देते.

श्यामू : त्यापेक्षा इराण्याकडे बसूनच आम्लेट–पाव खाल्लेला काय वाईट?... तेवढाच तुझा वेळ वाचेल! हातालाही कांद्याचा वास येणार नाही!

अपर्णा : (चिडून त्याच्याकडे क्षणभर पाहत राहते.) हल्ली तुझं, श्यामू, टीझिंग फार चाललेलं आहे हं! सकाळी रुमालावर पर्फ्यूम घालणार का, म्हणून विचारलं, तर प्रोफेसरच्या पगारात परवडणार नाही, म्हणालास...

श्यामू : नाहीच परवडणार! एवढीशी बाटली.. दोनशे पंचावन्न रुपये...फ्रेंच पर्फ्यूम! मला कसा परवडेल?

अपर्णा : (ती थोडा वेळ तशीच बघते, आणि) मला माझ्या व्यवसायाच्या दृष्टीनं हे सगळं करणं भाग आहे.

श्यामू : कर ना! मी कुठं नको म्हणतोय्! नाहीतर पुन्हा जाऊन मानसीला सांगायचीस.

अपर्णा : मानसी आली होती?

श्यामू : एके काळी तुला संगीताचीही करीअर करायची होती.... नानाकाकां-सारखा म्युझिक क्लास काढायचा होता... पण बायजीच्या घरी तंबोरा

पडलेला आहे. धूळ खात ! आताच्या करीअरपेक्षा संगीताची करीअर मला आवडली असती !

अपर्णा : हो ! कारण क्लासमध्ये केटी आला नसता ! पण मग मी अय्यासारखी तबलजीबरोबर पळून जाईन, म्हणूनही संशय घेतलाच असतास ! काहीही करत नव्हते, तेव्हा बाळारावांचा संशय ! वेळ घालवायला तुला एखादा संशय लागतोच !

श्यामू : मूर्खासारखं बोलू नकोस !

अपर्णा : ( तोडून ) आय् थिंक, श्यामू, दॅट्स माय् बिझनेस ! मी माझ्या सुखासाठी, समाधानासाठी कुठची करीअर करावी, हा माझा प्रश्न आहे !

श्यामू : हेच !.... हेच ते ! मी म्हणतो ना, ते हेच ! आज तू मला हे असं ठणकावून सांगू शकतेस !... माझ्या कल्पनेत माझी जी बायको आहे, ती मला कधीच असं उत्तर देणार नाही !.... मी तुला मागणी घालायला बायजीच्या घरी आलो होतो, तेव्हाची ती साधीसुधी सावू मला असं कधी उत्तर देईल, अशी माझी कल्पना नव्हती !

अपर्णा : तू हल्ली हल्ली बोलतोसच तसा.

श्यामू : मी काय बोललो ? काय बोललो ? तू एवढ्या उशिरा आलीस ! उशीर का झाला, म्हणून विचारलं मी ?

अपर्णा : आज सुषमाबरोबर डॉ. पावरींकडे जायचं होतं... ग्रँटरोडला !

श्यामू : कशाला ?

अपर्णा : तिला ॲबॉर्शन करून घ्यायचंय्.

श्यामू : तिलाच ना ?

अपर्णा : ( खटकावून ) श्यामू ...हे बघ, श्यामू, तू कितीही गलिच्छ वागलास, बोललास, तरी मी नोकरी सोडणार नाही.

श्यामू : मी तुझ्या नोकरीच्या विरुद्ध नाही.

अपर्णा : मग कशाच्या ? संशयाची भुतं उभी करतोस ... कारण मी नोकरी सोडावी, म्हणून !

श्यामू : हो ! लग्न झाल्यावर मीच मागं लागलो होतो. बी. ए. हो, म्हणून...

अपर्णा : हो. बी. ए. हो, आणि मास्तरीण हो म्हणालास ! एम्. ए. हो आणि प्रोफेसर हो, असं म्हणाला नाहीस.

श्यामू : तू ही नोकरी सोड ! आपण दुसरी नोकरी पाहू.

अपर्णा : दुसरी नोकरी मिळालीच, तर तिथंही कुणी ना कुणी बॉस असणारच ! त्याचाही तुला संशय येणारच !

श्यामू : संशय येईल, असं वागू नये. नाही तर नोकरी करू नये.

अपर्णा : आत्ता आलास वळणावर ! मी काय करावं ? सकाळी मुलाचं आणि नवऱ्याचं करावं. दुपारी वेळ जात नाही, म्हणून घाणेरडी मासिकं वाचावी. रेडिओ ऐकावा. शेजारणीशी बोलत बसावं किंवा पत्ते खेळावे, पैसे लावून. आणि मी हे का करावं ? तर तुझा माझ्यावर विश्वास नाही, म्हणून ! मी अय्याची मुलगी, हे विसरायला तू तयार नाहीस, म्हणून ! ( श्यामू चिडून बाहेर निघून जातो. अपर्णा ओरडते. ) मला जिथं जायचं नाही, तिथं मला ढकलू नकोस ! ( सतीशकडे लक्ष जात ) जेवतोस, रे !

सतीश : नको !

अपर्णा : तो गादीच्या कपड्याचा पायजमा कशाला घालतोस ? मी सफेद शिवून आणलेत ना ?

सतीश : मला हाच आवडतो !

[ अपर्णा क्षणभर दिवाणावर थकून बसते. तेवढ्यात घाईघाईने शांताबाई येतात. ]

शांता० : या आत्ताच येताय् वाटतं ?

अपर्णा : हो ! आज उशीर झाला !... परत आता एका पार्टीला जायचंय् !

शांता० : ( खिडकीतून बघत ) अगबाई ! अजून अल्मेडाबाई उभी आहे ! मोठ्या मनाची, हो, बाई ! बारा वर्षं नवऱ्याच्या आठवणीवर जगायचं, म्हणजे काय, नाही ?

अपर्णा : ( लक्ष नाही ) हो !

शांता० : केळीची पानं आणलीत ?

अपर्णा : हो ! मी आत्ता दिली पानं तुमच्या साहेबांकडे !... तुम्ही कुठं वर गेला होतात का ?

शांता० : जरा वर सुषमाबाईकडे गेले होते ! उद्या आमच्या सासूबाई येणारेत

वसईहून ! धाकट्या दिराकडे असतात !... त्या केळीच्या पानाशिवाय जेवायच्या नाहीत ! कारण, आमचे मामंजी केळीच्या पानावर जेवायचे ! जेवणाआधी कावळ्याला पान वाढतात... असलं प्रेम करणारं जोडपं सापडेल आता ?

अपर्णा : (काही तरी बोलायचं, म्हणून) कावळ्याला पान कशाला ?

शांता० : कावळ्याच्या रूपानं मामंजी येतात, हो !

अपर्णा : असं ! असं ! (उठत....कानांतल्या कुड्या काढत) जायचंय् मला आता.

शांता० : हो... हो ! चला तुम्ही ! आमची, मेली, बडबड नेहमीचीच ! (जायला निघते. पण जाता जाता वळून, खाजगी आवाजात) वरचीची काही गडबड आहे ?

अपर्णा : कुणाची ?

शांता० : सुषमाबाईची !

अपर्णा : कसली ?

शांता० : मला वाटतं, काहीतरी गडबड आहे ! दोन महिने असेच गेलेत — बसलेली नाही ! आता औषधं घेईल !... दर वर्षीचा कार्यक्रम ! चुकायचा नाही ! एक वेळ गौरी–गणपती चुकतील....पण आपण कशाला बोला ?... नाही ? मी जाते. (जाते)

[ अपर्णा दार बंद करून घेते. मग मेकअप् करू लागते. आरशात पाहू लागते. ]

सतीश : आरशात पाहू नकोस सारखी सारखी ! (अपर्णा गंभीर) आणि केवढी लिपस्टिक लावतेस ? शी : !

[ आपल्या मुलानेही आपल्याला असे बोलावे, हे पाहून ती खूप चमकते. वळून सतीशकडे बघत राहते. ]

काळोख

प्रकाश

[ श्यामूचे घर. संध्याकाळची वेळ. अपर्णा आणि सुषमा बोलत बसल्या आहेत. ]

अपर्णा : सुषमाबाई, मी तुम्हांला एक प्रश्न विचारू का ?

सुषमा : विचारा ना.

अपर्णा : आपल्या या संसाराचा अर्थ काय ? पतिपत्नींतल्या नात्याचं खरं स्वरूप काय ?

सुषमा : आज हे एकदम काय तुमचं ?

अपर्णा : तुम्हांला कधी आयुष्यात असं वाटलंय् का, हो ?... म्हणजे एखाद्या पुरुषाबद्दल आत्यंतिक आकर्षण...कधी असं वाटलंय् का, की त्याच्याशिवाय खरं सुख लाभणारच नाही !...त्याच्याशिवाय तुम्ही जगूच शकणार नाही ! त्याच्याशिवाय आपल्याला कुणी समजूनच घेत नाही ?

सुषमा : ( कपाळावर हात मारीत ) अहो, तसलंच काही तरी झालं, म्हणून विश्रामचा हात धरून पळाले ना मी ?

अपर्णा : ते तरुणपणचं नाही म्हणत मी....अगदी आत्ता ?

सुषमा : आत्ता काय राहिलंय् माझ्यात ? आत्ता मी विश्रामची ताबेदारीण आहे !...त्याला हवं, ते त्याच्या लहरीनं व्हायचं ! .... माझ्या तर आता सगळ्या इच्छाच मरून गेल्यात !

अपर्णा : तुम्ही, सुषमाबाई, लग्नाआधी दोन वर्षं विश्रामच्या सहवासात होता ना ? त्यावेळी तुम्हांला कल्पना नाही आली, विश्रामच्या स्वभावाची ?

सुषमा : ते सगळं खोटं असतं, हो ! लग्नाआधी तुम्ही कितीही एकमेकांच्या सहवासात या...तुम्हांला कधीच खरी ओळख होत नाही !.... मला वाटतं....माणसाची खरी पूर्ण ओळख कधी होतच नसावी ! ती अनुभवानंच थोडी थोडी जन्मभर होत असते !....आणि लग्नाआधी म्हणाल, तर आपल्या डोळ्यांत नजर असतेच कुठं ?.... असतं, ते फक्त शरीराचं... रूपाचं आकर्षण!

[ दोघीही क्षणभर शांत राहतात. अपर्णा मात्र आपल्या तंद्रीतच असते. तेवढ्यात लॅचकी उघडून श्यामू आत येतो. दोघींकडे पाहतो. पण

त्यांच्याशी ओळख नसल्यासारखा चेहरा करून पुढे जातो. तो टेबलापाशी पुस्तकं हाताळतो. दोन पुस्तकं उचलतो आणि जायला निघतो. ]

अपर्णा : श्यामू, तू चहा घेणार आहेस?

श्यामू : नको!

अपर्णा : तू कुठं जातो आहेस आता?

श्यामू : लायब्ररीत.

अपर्णा : मला वाटतं, तू यावेळी घरी राहावंस....(तो वळून तिच्याकडे बघतो) केटी यायचाय्.... त्याला तुझ्याशी काही बोलायचंय्.... परवा तुला विचारूनच वेळ ठरवली होती. (तो काही बोलत नाही. तुच्छतापूर्वक एक कटाक्ष टाकतो आणि निघून जातो.) (सुषमाला) हे असं चाललं आहे!

सुषमा : तुम्ही काही चिंता करू नका! सगळे नवरे असेच! एका माळेचे मणी! रात्री कुशीत शिरायचं असेल, तेव्हा गुळगुळ गोष्टी करतील! (उठत) मी निघते....त्या विद्या चोणकरकडे जाऊन येते...वैशाली तिथं जाते, म्हणून सांगून गेलीय्...कुठं जाईल, नेम नाही!....आणि त्या विद्येचाही एक भाऊ आहे.... मेला टारगट! (क्षणभर उभ्या उभ्या विचार करीत) काय नशिबात असतं, पाहा.... तिच्या वयात जे मी केलं, तेच नेमकं तिनं करू नये, म्हणून मला आता धडपडावं लागतंय्!.... कर्म आपलं! (दरवाज्यापर्यंत जाते.)

अपर्णा : लहान आहे ती! सांगा तिला सगळं समजावून.

सुषमा : काय समजवायचं? इथं ते काही चालत नाही, अपर्णाबाई! इथं प्रत्येकाचं वेगवेगळं! ज्याला शेवटी जो अनुभव येईल, ते त्याचं गाठोडं! त्यावेळी माझ्या आईवडिलांनी काय मला कमी समजावलं होतं? (दरवाज्यातून बाहेर बघते. तिला बाळाराव येताना दिसतात.) बाळाराव आले, अपर्णाबाई....

[ तेवढ्यात बाळाराव येतात. तोंडात चिरूट, हॅट नाही. ते रिटायर झाल्यामुळे त्यांच्या पोशाखातही थोडा बदल झाला आहे. ]

अपर्णा : या, बाळाराव ! आज क्लब नाही ? ( बाळाराव आत येताच दरवाजा लावून घेते. )

बाळा० : दरवाजा बंद करू नकोस...बायजी येतेय्...तिला आता जिने चढवत नाहीत .... !

सुषमा : ( चुळबुळत ) मी निघते आता, अपर्णाबाई.

अपर्णा : बरं....बरं...या.... ( सुषमा जाते. ) तुमची रिटायरमेंट काय म्हणते, बाळाराव ?

बाळा० : ( चिरूट ओढत ) शिक्षा ! सक्तमजुरीची शिक्षा !.... बायजीचं तोंड बघत दिवस काढायचे, म्हणजे जबरदस्त शिक्षा आहे !...कशाला काय अर्थ आहे ? कुठं उंदीर दिसला, तर सबंध दिवसभर काठी घेऊन सगळीकडे ठोकत बसते ! .... कुठं झुरळ दिसलं, तर झाडू घेऊन फिरते. कशाला काही अर्थ नाही...आली .... !

[ डुलत डुलत, पाय ओढत बायजी येते. ]

अपर्णा : दमलीस ना ? .... बैस इथं .... मी आता चहा आणते ... ( आत जायला वळते, तोच )

बायजी : ( उभीच ! रागारागाने ) थेंबभर पाणी सुद्धा घेणार नाही मी तुझ्या घरी !

अपर्णा : ( दचकून ) अग, पण झालं काय ? .... तू आधी बैस तर खरी !

बायजी : मी बसायला इथं आलेले नाही ! ... मी त्या पोराला न्यायला आलेय् .... ( बसते. )

अपर्णा : सतीश आत्ताच बाहेर गेलाय्.

बायजी : अंधार होईतोवर कसला फिरतो ? ... तुझं तोंड बघायचं नसतं त्याला, म्हणून बाहेर वेळ काढतो तो ! एवढासा पोर .... पण केवढी समज त्याला !

अपर्णा : ( निग्रहाने ) पण, बायजी, एवढं तुला चिडायला झालं काय ?

बायजी : ( एकदम तडकते ) थोबाड फोडीन तुझं, सावू ! वर तोंड करून, झालं काय, म्हणून मला विचारतेस ? लाज नाही वाटत ? जे गावाला

माहीत आहे, ते मला माहीत नाही ? ... इतके दिवस मी ऐकतेय् ... ऐकतेय् ... तुला सुद्धा मी दोन–चार वेळा विचारलं.... तर (वेडावीत) खोटं, ग, ते, बायजी !.... लोकं उठवतात, ग, बायजी !... तू काय वाट्टेल ते कर ! मला पूर्वीच माहीत होतं ... म्हणूनच मी कॉलेजात घातली नव्हती तुला ... तू त्या सटवीच्या .... तुझ्या आयशीच्याच वळणावर जाणार !... त्या हडळीचंच रक्त तुझं ! माझ्यावर तुझी जिम्मेदारी होती, तोवर जपली तुला ! .... आता तू आणि तुझं नशीब ! (जरा थांबून) हा तुझा कोण तो केटी का फेटी आहे, तोही तबलजीच का ? (सावू उत्तर न देता बघत राहते...) ऐक, सावू, सांगते, ते ऐक...श्यामरावासारख्या सज्जन, चांगल्या नवऱ्याला तू सोडते आहेस, हे बरं नाही.

अपर्णा : मी श्यामूला सोडतेय्, हे खोटं आहे ! तुला कुणी सांगितलं हे ?

बायजी : श्यामरावांनीच सांगितलं ! श्यामराव का खोटं सांगतील ?

अपर्णा : पण ते खोटं आहे ! उलट, तोच मला हल्ली हल्ली मी त्याची बायको नसल्यासारखा वागवतोय्.

बायजी : तू मला काही सांगू नकोस ! तुझ्यावर माझा मुळीच विश्वास नाही.

अपर्णा : (थोडी वैतागून....) मग, बायजी, तुला सांगायचंय् तरी काय ?

बायजी : (रडवेल्या आवाजात) मी काय सांगणार ? मला काही सांगता येत नाही, हेच तर माझं दुःख आहे !.... तू जे करते आहेस ना, त्यातून तू शेवटी दुःख पदरी घेणार आहेस, असं मी तुला म्हटलं; तर तू म्हणणार, तू काय, बायजी, मोठं सुख पदरात घेतलं आहेस ? (ती डोळे टिपते. अपर्णा तिला बघत गप्प राहते.) उद्या सकाळला सतीशला माझ्याकडे पाठव ! यात त्याचे हाल नकोत...आत्ता तुला कळायचं नाही ! उद्या शरीर थकलं, की जागी होशील ! .... मी जाते !

[ती जाण्यापूर्वी आणखी काही बोलणार, तोच दारावर टक् टक् करीत केटी आत येतो. केटीला बघताच अपर्णा एकदम अवघडून गडबडल्या-सारखी होते. तरीही सावरून त्याचे स्वागत करते. बायजी त्याच्याकडे संशयी नजरेने वळून बघते. बाळारावही त्याला भेटण्यासाठी उठून उभे राहतात.

केटी हा उत्साही माणूस आहे. तो येतो, तोच मुळी टण् टण उड्या मारीत आल्यासारखा. वयाने चाळिशीकडचा. देखणा, उमदा! चटपटीत चालणारा. कपाळावर रुळणारे भुरभुरीत केस. ते मागे सारण्याची विशिष्ट लकब! मध्येच शीळ घालणे, बोलता बोलता डोळा मारल्यासारखा डोळा मिचकावणे, किल्ली गरगर फिरवणे हे चालूच !
आत आल्याबरोबर सर्वांना 'हॅलो...हॅलो' करीत, मान, वाकवीत आसपास किल्ली फिरवीत फिरतो. मग अपर्णा ओळखी करून देते —]

अपर्णा : ही माझी आत्या...बायजी...हिच्याकडेच मी वाढले..
केटी० : आय् नो! तू सांगितलं होतंस मला! हॅलोऽ ऽ नमस्कार!

[हात जोडून बायजीला वाकून नमस्कार करतो. पण बायजी नमस्कार करीत नाही. उलट मारक्या म्हशीसारखी त्याच्याकडे पाहते. तो खोलीत जसजसा फिरतो, तसतशी बायजी त्याला पाहत राहते.]

अपर्णा : आणि हे आमचे बाळाराव...(दोघेही 'हॅलो ऽ ऽ हॅलो...हाऊ आर यू?' म्हणत हस्तांदोलन करतात.) बायजीचे यजमान.
केटी० : येस्, आय् नो — सावू तुमच्याबद्दल वारंवार बोलते.
बाळा० : (अपर्णाला खाजगी आवाजात) ...सावू...हे कोण?
अपर्णा : इश्श! विसरलेच मी! हे केटी...कृष्णकांत ठोसर...माय् बॉस...!
केटी० : बेटर से ए फ्रेंड! ए गुड फ्रेंड!
बायजी : (केटीचं अस्तित्व विसरून निग्रही आवाजात...) आणि, सावू, तुला एक सांगून ठेवते.. मी यापुढं इथं...तुझ्या घरात पाय ठेवणार नाही! (केटी चक्रावतो.) आणि तूही आमच्या घरी यायचं नाहीस! तुझ्या पायी आम्हांला लाज नको! (बाळाराव अवघडतात. आणि 'डोण्ट टेक इट सीरियसली....' असे काही तरी केटीला सांगण्याचा प्रयत्न करीत असतानाच) चला, हो... (बाळाराव पटापट चिरूट फुंकत धूर सोडतात आणि तिच्या मागून चालतात. जाता जाता ती त्यांनाही बजावते) आणि तुम्हीही इथं पाय ठेवायचा नाही! सांगून ठेवते !

[ ती निघते. तिच्या मागून जाता जाता बाळाराव हाताने खूण करीत 'तू शांत राहा—' असे अपर्णाला सांगतात आणि जातात. अपर्णा दार लावते. ]

अपर्णा : बसा ना... ( ती व केटी बसतात. )

केटी० : तुझ्या बायजी फारच भडकलेल्या दिसतात.

अपर्णा : मला कुणी समजूनच घेत नाही! श्यामू माझ्याशी कसा वागतो, याचा कुणी विचारच करीत नाही! प्रत्येकाच्या दृष्टीनं मीच चुकते आहे... बायजी म्हणते... माझंच चुकतं आहे....श्यामू म्हणतो, माझंच चुकतं आहे!...का? मी बाई, म्हणून?

केटी० : श्यामराव कुठं गेले?

अपर्णा : बाहेर गेलाय्.

केटी० : मी भेटायला येणार, हे सांगितलं नव्हतंस?

अपर्णा : सांगितलं होतं!

केटी० : ओ! आय् सी! कदाचित येतील! मी थांबतो थोडा वेळ!

अपर्णा : तुम्ही, केटी, काय घेणार? चहा, की सरबत?

केटी० : काही नको! इथनं मला आत्ता जायचंय् माझ्या स्टूडिओत...तिथं कुंटे यायचाय् — युनियनचा! मागण्या....धमक्या...संप...नासधूस....ही माणसं आपणही धड काम करीत नाहीत आणि दुसऱ्यांनाही करू देत नाहीत!

अपर्णा : टेप लावू गाण्याची?

केटी० . नको आत्ता! मी थांबणार नाही फार वेळ! ( घड्याळ बघतो. मग तो अस्वस्थपणे फिरतो. )

अपर्णा तुम्ही श्यामूशी काय बोलणार होता?

केटी० : खरं म्हणजे हे बोलणं अवघड असतं....तरी सुद्धा मला धीर करून श्यामरावांना सांगितलंच पाहिजे!....की तुमच्या बायकोवर एकसारखा अन्याय करून तिला नको तिथं ढकलू नका! गेले कित्येक दिवस मी पाहतोय्... तुमची बायको लुक्स वरीड्! पूर्वी ती नेहमी चीअरफुल, आनंदी असायची...आता ती ओढून ताणून हसते...बरेचदा तिचे डोळे

लाल दिसतात...यामुळं तिच्या मनावर....आणि कामावरही वाईट परिणाम होणार आहे... तिचा मित्र, चाहता, वेलविशर म्हणून मी हे तुमच्या निदर्शनास आणू इच्छितो....तुम्ही या गोष्टीचा विचार केला पाहिजे. विशेषत:, तिच्याबद्दल गंभीरपणे एकसारखा संशय न घेता विचार केला पाहिजे.

अपर्णा : श्यामू एककल्ली आहे....तो ऐकायचा नाही ! मी नोकरी सोडून बायजीप्रमाणे घरी बसल्याशिवाय तो शांत व्हायचा नाही....

केटी० : त्यांना हे सर्व समजावून तर बघू.

अपर्णा : तो तुम्हांला भेटायचासुद्धा नाही !...नाहीतर आजच थांबला असता....

केटी० : (थोडे थांबून) श्यामरावांना संशयानं ग्रासलंय् ! ऑफिसच्या कामानिमित्त आणि एकमेकांची पर्सनॅलिटी आवडते, म्हणून आम्ही कुठं एकत्र फिरलो, भेटलो, तर ते कुणाला सहन होत नाही !...माझी बायकोसुद्धा घरी जळफळत असते !...या सारख्या सारख्या चिडणाऱ्या, जळफळाट करणाऱ्या बायका... मग वेगळ्या दिसू लागतात, माहीत आहे ? त्यांचं मुळचं सौंदर्य नाहीसं होतं...आणि मग त्या चक्क कंटाळवाण्या दिसू लागतात...

अपर्णा : कधी कधी वाटतं....नोकरी सोडावी....आणि घरकामात गाडून घ्यावं !

केटी० : पण तू, सावू, मला सांग....या घटकेपर्यंत आपण कधी वावगं वागलोय् का ? मी रागिणीलासुद्धा हेच विचारतो ! तिचं म्हणणं, ताडाच्या झाडाखाली बसून ताक नाही प्यायचं !

अपर्णा : मीही श्यामूला म्हटलं, मी दुसरी नोकरी धरली, तर तिथं केटी नसतील; पण दुसरा कुणी तरी बॉस....पुरुष असणारच की !

केटी० : आणि तोही माझ्यासारखा नसेल ! आय् हॅव ऑल्वेज रिस्पेक्टेड् यू ! एक गोष्ट खरी आहे, सावू, तू मला आवडतेस...खूप आवडतेस... का, ते मला निश्चित शब्दांत सांगता येणार नाही ! पण तुझ्या सहवासात मी सुखी असतो...धुंद असतो ! ते सुख...ती धुंदी रागिणीच्या सहवासात मिळत नाही ! रागिणी बदलून गेली आहे....या बिझनेसमुळं...माझं

थोडंसं सोशल लाइफ वाढल्यापासून ती संशयानं...संशयानं पिचत चाल-लीय्....म्हणूनही असेल कदाचित...मला तुझा सहवास हवाहवासा वाटतो. ....हे मी लपवीत नाही...तुझ्या सहवासात मला खूप एक्साइटमेंट मिळते.

अपर्णा : मी या दृष्टीनं कधी विचारच करीत नाही! कारण माझ्या मनात सारखा विचार असतो माझ्या घराचा....घराचा...श्यामूचा...सतीशचा! तरीसुद्धा सर्वजण मला कोपऱ्यात ढकलत असतात....तो एवढासा सतीश-सुद्धा...दूर दूर पळतो.

केटी० : ( घड्याळ बघत ) मला आता स्टूडिओत जायला हवं! युनियनचा कुंटे आला असणार? ..पण, सावू, एक मी तुला निश्चित सांगतो... कितीही गंभीर प्रसंग ओढवला....तुझ्या घरी....किंवा माझ्या घरी...तरीही मी पहाडासारखा तुझ्या पाठीशी राहीन!...डोण्ट वरी अबाऊट दॅट!

अपर्णा : ( थोडी थांबून– स्तिमित होऊन ) म्हणजे तुम्ही, केटी, काय सुचवताय्?

केटी० : ( थोडा विचार करून, हसत ) काही नाही! ( कॉलर सोडत ) ही गळ्यावरची जखम पाहिलीस ना? रागिणीशी लग्न करायला घरी विरोध झाला, म्हणून गळा कापून मी आत्महत्या करीत होतो...वीस वर्षांचा होतो तेव्हा– एक स्वप्नाळू पोरगा! आणि आता? व्हेअर ॲम आय्?

अपर्णा : तुम्ही सांगितलंय् मला हे सर्व.

केटी० : शिवाय आता दोन मोठी मुलं आहेत...तरी सुद्धा मी तुम्हांला वाऱ्यावर सोडणार नाही – तशीच परिस्थिती आली, तर! शेवटी लग्न, लग्न म्हणजे काय? एक सोपस्कार आहे....जस्ट ए हॉपलेस् फॉर्मॅलिटी! लग्नामुळं काय नातीगोती मोठी घट्ट होतात? प्रेम वाढतं? तुझ्या आई–वडिलांचं लग्न झालं होतं... बायजी–बाळारावांचं लग्न झालंय्.... तुझं–श्यामरावांचं लग्न झालंय्... माझंही रागिणीशी लग्न झालंय्! तरीही आपण कुठं आहोत?

अपर्णा : ( हताश होत ) मला हे काही...म्हणजे काही समजत नाही! मी खूप गोंधळून गेलेय्.

[ केटी निघून जातो. ]

[ अपर्णा थोडा वेळ अस्वस्थ होऊन बसते. दोन्ही हातांत कपाळ धरते. मन अस्वस्थ करणारे शोकाकुल संगीत. तेवढ्यात उघड्या दारातून श्यामू येतो. त्याच्यामागून सतीश. ]

अपर्णा : चला, जेवणार ना ?
श्यामू : नको ! मी जेवून आलोय्.
अपर्णा : सतीश, तू ?
सतीश : नको ! मीही जेवलोय् !
अपर्णा : ( सतीशला ) तुला कुठं भेटला श्यामू ?
सतीश : मी बाबांच्या लायब्ररीत गेलो होतो. ( तो आतल्या खोलीत जातो. )
अपर्णा : बायजी आणि बाळाराव आले होते.
श्यामू : आणखी कोण ?
अपर्णा : केटी आले होते...बायजी असतानाच आले होते...( श्यामू क्षणभर तिच्याकडे संशयाने बघत राहतो. ) ते तुला भेटायला आले होते....तू त्यांना भेटायला हवं होतंस...
श्यामू : मी त्याला भेटणार नाही ! तुमच्या दोघांबद्दल मी काहीही बोलणार नाही ! माझ्या बोलण्याचा आता काही उपयोगही नाही !

[ सतीश गादी आणून गॅलरीत पसरतो. ]

अपर्णा : ( क्षणभर त्याच्याकडे रोखून पाहत ) तुझ्या अशा वागण्यानं तू मला नको तो निर्णय घ्यायला लावशील, श्यामू ! ( सतीश झोपतो. डोळ्यां-वर उशी घेतो. ) डोकं दुखतंय्, रे ?
सतीश : नाही !

[ ती सतीशच्या जवळ जाऊन त्याला हात लावून ताप आहे का, पाहते. तिथला दिवा घालवते आणि आत जाऊ लागते. ]

श्यामू : जरा थांब ! मला थोडं बोलायचंय्... ( ती बसते. ) तुझं मन वळवावं, म्हणून नव्हे, बट ए सॉर्ट ऑफ लाऊड थिंकिंग ! तुझा कदाचित असा समज

असेल, की करीअर...व्यवसाय...स्त्री–स्वातंत्र्य यांसाठी तू केटीच्या मागून चालली आहेस...पण ते तेवढंसं खरं नाही ! करीअरसाठी या गोष्टी आवश्यक नसतात ! होतंय् काय, माहीत आहे ? करीअर...नोकरी...व्यवसाय या निमित्तानं स्त्री–पुरुष एकत्र येतात....तसे ते यावेत....त्यात वाईट काही नाही ! पण त्यात धोका असेल, तो लैंगिक आकर्षणाचा !...शेवटी त्या आकर्षणामुळं करीअर...नोकरी...व्यवसाय... स्त्री–स्वातंत्र्य यांवरची खोटी खोटी आर्ग्युमेंटस् सुरू होतात ! शारीरिक मोहामुळं संसार फुटतात... यापुढे मोठ्या प्रमाणावर फुटतील ! विचार करून ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे !

अपर्णा : श्यामू, मी तुला एक सांगते, त्यावर तू विश्वास ठेव ! मी विचार करून करून माझा तोल सावरलेला आहे ! मला माहीत आहे, केटीला माझ्याबद्दल आकर्षण आहे ! पण मी त्याला कधी उत्तेजन दिलेलं नाही. अँड परहॅप्स् दॅटस् व्हाय्...ही रिस्पेक्टस् मी !

श्यामू : पण अशा धोक्याच्या रेषेवर आपण वावराच कशाला ?

अपर्णा : म्हणजे काय करायचं ? नोकरी सोडायची, एवढंच ना ? (श्यामू संमतिदर्शक गप्प राहतो आणि तिच्याकडे बघतो. ती ठामपणे सांगते) मी नोकरी सोडणार नाही ! मी तुझ्याशी एकनिष्ठ राहीन ! मला ते जड जाणार नाही....बिकॉज आय् लव्ह् यू...आय् लव्ह माय् सन्...आय् लव्ह् माय होम !...पण नोकरी सोडून...माझी करीअर सोडून चारचौघींसारखी नवऱ्याच्या सेवेत मी मरणार नाही !...आय् शॅल नेव्हर बी ए ट्रॅडिशनल हाऊसवाइफ !

श्यामू : (थोडा वेळ अस्वस्थपणे विचार करीत राहतो...आणि) आपलं दोघांचंही नेमकं काय चुकलं, कळत नाही...कदाचित आपण एकमेकांना पुरेसं जाणून घेतलं नसेल... पुरेशा उत्कटतेनं वागलो नसू... एनी वे, इट् इज़् टू लेट नाऊ ! तसा तुझ्या दृष्टीनं मी थोडासा नालायकच !... कारण तुझ्या या नवीन जीवनात जे सोशल क्लाइंबिंग चालतं, ते मला झेपणारं नव्हतं ! मी सोशल क्लाइंबर नाही ! समाजाच्या ज्या वरच्या थरात हे चालतं, तो थर माझा नाही. त्या सामाजिक थराचं मला आकर्षणही नाही; पण माझ्या या खालच्या थरातही सुखानं राहता येतं, हे मी तुला

पटवून देऊ शकलो नाही! मे बी...आय् फेल्ड्! इटस् ऑल राइट! ( उठत. किंचित हसत ) मला वाटते, मी आज खूप बोललो.

[ तो थोडा वेळ खिडकीचे गज धरून स्मशानाकडे पाहत उभा राहतो. ती उठते आणि बेडरूममध्ये जाते. तो वळतो आणि कपडे उतरवतो. त्याचे उघडी झोपलेल्या सतीशकडे लक्ष जाते. तो सतीशच्या अंगावर चादर घालतो. कोपऱ्यातली चटई उचलतो. सर्व दिवे घालवतो. गॅलरीत चटई टाकून तिथेच उघडा झोपतो.
क्षणभर विषण्ण संगीत. मग तो झोप येत नाही, म्हणून उठून बसतो. मग उठतो आणि एक पुस्तक उघडून वाचत बसतो. हे करताना त्याला लग्नाआधी चौपाटीवर सावूबरोबर बसला असतानाचे काही संवाद आठवतात... ]

श्यामू : सावू, मी बायजीच्या घरी येऊन तुला मागणी घातली, म्हणून तू हो म्हणायला पाहिजेस, असं नाही! तुला मी आवडलो, तरच .

सावू : मला तुम्ही फार फार आवडलात...खरं म्हणजे, मी एक सामान्य.... साधी मुलगी! नुसती मॅट्रिक! तुम्ही एवढे शिकलेले! प्रोफेसर! एवढ पगार...दिसायला देखणे... ( खुदकन् हसते ) एक विचारू?

श्यामू : विचार ना...

अपर्णा : तुम्ही मलाच का मागणी घातलीत?

श्यामू : आपली बायको कशी असावी, याची एक प्रतिमा होती माझ्या मनात!...ती म्हणजे तू! मी अगदी प्रथम तुला पाहिलं ना? तेव्हाच मी वेडा....वेडा झालो...तुझ्यासाठी.

अपर्णा : तुम्ही सुद्धा वेड लावणारेच आहात! मला कधीसुद्धा वाटलं नव्हतं मला तुमच्यासारखा नवरा मिळेल....किती भाग्यवान मी!...मला हवेत तरंगल्यासारखं वाटतंय्....

श्यामू : हे एवढे गोड गोड संवाद तुला बायजींनी लिहून दिलेत, की बाळा-रावांनी?

[ दोघेही मनसुराद हसतात आणि टेप बंद होतो. तो उठतो.

चटई वळकटून कोपऱ्यात ठेवतो, कपडे चढवतो. एका बॅगमध्ये पटापट पुस्तके व कपडे भरतो. बॅग बंद करून तो टेबलाकडे बसतो. एका कागदावर चिठ्ठी लिहून ठेवतो. तो लिहीत असताना चिठ्ठी टेपवर ऐकू येते :

' रात्रभर इथं राहणं कठीण झालं, म्हणून मी आणि सतीश ताबडतोब निघत आहोत. '

कागदावर घराच्या किल्ल्या ठेवतो आणि उठतो, सतीशकडे बघतो. ]

श्यामू : ( हलक्या आवाजात ) सतीश...

सतीश : मी जागाच आहे...( पटकन् उठून बसतो. )

श्यामू : आपल्याला निघायला हवं...( सतीश उभा राहतो. कपडे नीट करतो. ) आईला सांगणार ?

[ तो मानेने ' नाही ' म्हणतो. श्यामू सतीशच्या खांद्यावर हात ठेवून बॅग उचलतो आणि चालत राहतो. दरवाजा उघडतो. ते दोघे पाठमोरे बाहेर पडणार, तोच टेबलावरच्या जुन्या घड्याळाचा गजर होतो. श्यामू एकदम थबकतो. टेबलाकडे क्षणभर पाहतो. सतीश पटकन् धावून घड्याळ घेतो. गजर बंद करतो. दोघे बाहेर पडतात. दार ओढून घेतात. बाहेर पडता पडता खिन्न सुरावटीचे संगीत सुरू होते....आणि त्याच संगीतात त्या जुन्या इंग्रजी कवितेच्या ओळी ऐकू येतात... अस्पष्टशा.... !

They are all gone away !
The House is shut and still
There is nothing more to say
Through broken walls and gray
The winds blow bleak and shrill
They are all gone away ! .... ]

पडदा

# अंक तिसरा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १८७१६ दा. दि. ७।५।८३
वि. आटक क्र.

[ श्यामूचे घर. पण त्या घरात आता– म्हणजे जवळ जवळ गेली दहा वर्षे--अपर्णाबरोबर केटी राहतो आहे. त्यामुळे घर तेच असले, तरी केटी राहत असल्यामुळे घर वरिष्ठ मध्यमवर्गीयाचे दिसते. थोडे चांगले फर्निचर...टेबल–लॅंप...उत्तम पडदे. भिंतींना चांगली आकर्षक रंग-संगती ! भिंतीवर निवडक पेंटिंग्ज् ! टेप–रेकॉर्डर. टेबलावर उत्तमोत्तम पर्फ्यूम्स्च्या बाटल्या !

मध्यंतरी दहा वर्षांचा काळ लोटला आहे. त्या काळाचे अपरिहार्य, असे किरकोळ स्वरूपाचे रंगभूषेतील बदल.

वेळ सकाळची आहे. साधारण सकाळचे आठ. दिवस वटपौर्णिमेचा आहे. केटी कोचावर सकाळचा पेपर वाचत बसला आहे. समोर किटली....कप असलेला ट्रे आहे. त्याचा चहा पिऊन संपलेला आहे. पाठीमागे एखादी रेकॉर्ड चालू आहे. तिचा आवाज इतका मंद आहे, की संवाद ऐकण्यामध्ये अडचण येणार नाही ! केटी बाहेर जाण्याच्या तयारीने बसलेला आहे. पेपर वाचता वाचता तो सिगारेटही ओढतो आहे. त्याच्या पुढ्यात ढंगदार आकाराचा काचेचा ॲश–ट्रे आहे. तो एकदम काही तरी आठवावे, अशा पद्धतीने वर्तमानपत्र एकदम बाजूला करतो. ॲश–ट्रेमध्ये सिगरेट विझवतो. आणि.... ]

केटी० : सावू....

[ सावू बाहेर येते. ती घरच्याच वेशात असली, तरी नीटनेटकी आणि

आकर्षक दिसते आहे. तिला काही तरी बोलायचं आहे. केटी बाहेर जाण्याची तयारी करतो आहे, हे पाहून– ]

अपर्णा : आता तू कुठं निघालास ?
केटी० : आधी स्टूडिओवर जातो...संपवाल्यांची काय निदर्शनं चाललीत, ती पाहतो.
अपर्णा : दर दोन वर्षांनी कसले यांचे संप ? मी येऊ का बरोबर ?
केटी० : नको ! तू कशाला ? तू येऊन काय करणारेस ?
अपर्णा : पण लांबून पाहा !....नाही तर दगडफेक वगैरे करतील !
केटी० : ( उठत ) मला तर कामगारांची नेहमी गंमत वाटते...एरव्ही ते इतके चांगले असतात...पण मागण्या, निदर्शनं आति संप...हे झालं, की, साले, एकदम वेगळे आणि अन्नाडी होतात !
अपर्णा : तो युनियनचा कुंटे आहे ना ? ...तो मुद्दाम चिथावणी देत असल पाहिजे !
केटी० : कुंटेलाही आपल्या पोटाचं बघावं लागतं ! संप केला नाही, तर युनियन टिकत नाही...युनियन टिकली नाही, तर कुंटेचं पोट भरत नाही ! ट्रेड-युनियन हा एक मोठा धंदा आहे !...आपला जमन नेहमी म्हणतो : सध्या कारखानदारी आणि कामगारदारी ही दोन पैसा कमावण्याची मोठी साधनं आहेत !
अपर्णा : घाणेरडा माणूस आहे हा कुंटे ! अब्रुनुकसानीची फिर्याद लावायला पाहिजे !
केटी० : हो ! म्हणजे आमची आणखी जाहीर बदनामी....
अपर्णा : तू दुपारी जेवायला येणारेस ना ?...ये हं...आलंच पाहिजे ! ( तो विचार करीत उभा राहतो. ) तू कसला विचार करतो आहेस ?
केटी० : ( एकदम भानावर येऊन ) कुठं ? छे ? दुपारच्या जेवणाचं...आय् अॅम नॉट शुअर !
अपर्णा : ते काही चालायचं नाही...आज सुट्टीचा दिवस आहे.. शिवाय तुझ्याशी मला काही बोलायचंय्... ( तेवढ्यात फोन वाजतो. सावू पटकन् फोन घेते. ) हो... हो ! आपण कोण ? कुंटे ? अहो, कुंटे, मी सावू

बोलतेय्...( चिडून ) कुंटे, मी तुम्हांला कधी अशी बोललेली नाही... पण आज बोलायची पाळी आली आहे... तुम्ही आमच्याकडे येता... जेवता! गुदस्ता महिनाभर आम्ही तुमच्या फॅमिलीसाठी महाबळेश्वरला आमच्या खर्चानं बंगला बुक करून दिला...गोदरेजचा फरीज दिला... ( केटी हातवारे करीत तिला आवरण्याचा प्रयत्न करतो. ) एवढं करून शेवटी आमच्यावर तुम्ही उलटता?...मी संपाचं म्हणत नाही. संपाचं काय, ते केटी बघेल! मी त्या वर्तमानपत्रात तुम्ही छापून आणलेल्या फोटोसंबंधी ....ते काही मला तुम्ही सांगू नका. तो फोटो तुम्हीच मुद्दाम वर्तमानपत्रांत छापून आणलाय्....त्याच फोटोचं तुम्ही पोस्टरही छापलंय् – नाही... नाही. तुम्ही कुंटे, उगाच ही मखलाशी माझ्याकडे करू नका – त्या फोटोत आमच्याबरोबर तुम्हीही होतात महाबळेश्वरला – हो, की नाही? मग तुमचाच फोटो वगळून आम्हां दोघांचाच फोटो कसा आला? वाईला येताना आमच्या गाडीला ॲक्सिडेंट झाला, ही बातमी वर्तमानपत्रांत कुणी दिली? आम्ही दारू पिऊन झिंगलेले होतो काय? मी केटीची मार्लिन मॅन्रो काय? आणि हे सगळं संप सुरू होता होता? मला मूर्ख समजू नका...मी तुमच्यावर चिडलेली आहे, एवढं लक्षात ठेवा...वीस नाही... पंचवीस वर्षं...तुम्ही ट्रेड-युनियनच्या धंद्यात असाल...आपल्या खाजगी जीवनाचा असा गैरवापर....

[ तेवढ्यात केटी 'तू दे बघू माझ्याकडे–' असे म्हणत अपर्णाच्या हातून फोन घेतो. ]

अपर्णा : ( फोन देत, चिडून ) चांगला खडसाव त्याला! मेला, हवा तसा येऊन आमच्याकडे जेवतो .... मटण करा ....कोंबडी करा....

केटी० : ( सावूला गप्प करीत ) अग, त्याला असं डाफरून चालणार नाही! तू उगाच डोक्यात राख घालून घेऊ नकोस .... अहो, कुंटे... ( कुंटेचे ऐकून ) मी काही चिडलेलो नाही! पण ही बातमी छापून आणणं... तिचा पोस्टरमध्ये वापर करणं आणि पद्धतशीरपणे पोस्टर वाटणं... हे मला आवडलेलं नाही! सध्या 'ब्ल्यूबर्ड ॲडव्हर्टायझिंग'चा मी डायरेक्टर आहे...

'सनराइझ ॲड्स'मध्ये ही कंपनी मर्ज करण्याच्या वाटाघाटी चालल्यात.... यावेळी ही बातमी छापून आणणं ... धिस इज् इन रिअल बॅड टेस्ट! आमच्या घरची मंडळी संतापली आहेत. आम्ही गेली काही वर्षं एकत्र राहतो .... पण त्याचं असं पब्लिक स्कॅण्डल करण्याची गरज होती का? ती बातमी वाचून माझ्या मुलांना काय वाटेल? .... जाऊ दे! मग आत म्हणणं काय तुमचं? .... पण तुमची निदर्शनं चालतीत ना?...आज काय परिस्थिती आहे?...साखळी उपोषण? .... मग काय, बटाटेवड्यांची सोय करायची? (हसतो.) असं.. असं.. ते आपापलं खाऊन येतात, आणि उपोषणाला बसतात ....? पण मी आलो, की 'मुर्दाबाद'च्या घोषणा होणार!... मग मी येतो पंधरा मिनिटांत .... (फोन खाली ठेवतो.)

अपर्णा : योगेशला आणि योगिताला भेटला होतास?

केटी० : हो! ती दोघंही बातमी वाचून नर्व्हस झालीत! या चोरांनी ते पोस्टरही घरी पाठवलं!

अपर्णा : मला नाही सांगितलंस...त्यांना भेटलास, ते!

केटी० : सांगायचं काय त्यात?

अपर्णा : कुठं भेटलास?

केटी० : घरी.

अपर्णा : रागिणी होती?

केटी० : हो! तीही फार अपसेट् झालीय्.

अपर्णा : केटी, दुपारला जेवायला येणार आहेस ना? (केटी विचारात गर्क. तेवढ्यात तो सिगारेट पेटवतो. तिला एकदम राग येतो...ती त्याच्य ओठांतली सिगरेट खेचून काढते आणि ॲश-ट्रेमध्ये चुरून टाकते.) किती त्या सिगारेटी ओढतोहेस तू, केटी, परत परत?

केटी० : कुठं, सावू, परत परत? ही सकाळपासून तिसरी असेल....

अपर्णा : नाही ओढायच्या सिगारेटी!

केटी० : का?

अपर्णा : का, म्हणजे काय! मला नाही आवडत? घाण येते तुझ्या तोंडाला मग!

केटी० : (किंचित हसत) तरी बरं, मी चिरूट ओढत नाही तुझ्या बाळारावां-

सारखा! (ती एकदम खुदकन् हसते.) हसलीस का? ...बाळारावांचे ओठ आणि बायजीचं चुंबन, म्हणून? (हसतो.)

अपर्णा : (लटक्या रागाने) असू दे हं! बाळाराव—बायजी नसतील तुझ्या-सारखे रसिक! पण बायजी माझी आत्या आहे! (केटी विचारात थोड्या वैतागाने) तुझं हल्ली हल्ली, केटी, काय बिघडलंय्?

केटी० : छे! कुठं काय?

अपर्णा : हल्ली तू पूर्वीसारखा दिसत नाहीस.

केटी० : म्हणजे कसा?

अपर्णा : सारखा सारखा आपल्याच विचारात असतोस.

[ तेवढ्यात बाहेर जिन्याकडे एकदम पाच-सहा बायकांचा हसण्याचा आणि बडबडण्याचा आवाज ऐकू येतो. केटी क्षणभर कान देऊन ऐकतो. मग तो गॅलरीतून पाहतो आणि....]

केटी० : (सहजपणे) बायका पूजेला जाताहेत. (एकदम त्याला आठव होते.) ओ ऽऽ माय् गुडनेस्! (कपाळावर हाताच्या मुठी आपटत) श्शी: शी: शी:! छे ... छे! आज वटपौर्णिमा! या बायका वटपूजेला चालल्यात...सावू, तुझा आज वाढदिवस! आय् ॲम ऑफुली सॉरी! मी साफ विसरूनच गेलो...सावू, क्षमा कर मला.... (तिचा हात हातात घेतो.

अपर्णा : (किंचित खिन्नपणे) असू दे! माझे गेले दहा वाढदिवस तू इतके छान साजरे केले आहेस, की तो आनंद आठवून मी आयुष्य काढीन!

केटी० : इव्हन् देन्...मला कळत नाही...माझ्या जीवनातला एवढा मोठा इव्हेण्ट मी विसरलोच कसा?

अपर्णा : मी तुला म्हणत होते, ते तेच! तुझ्यात अलीकडे काही तरी बदल होतोय्...

केटी० : आता दरवर्षीप्रमाणे मोठी पार्टी एवढ्या शॉर्ट नोटिसने करता येणार नाही! पण थोडी माणसं जमवू...मानसी...जमन...बाळाराव .... राजेबाई ॲंड फ्यू अदर्स--व्हेरी इझी! चॉप सुईला ऑर्डर देतो.

अपर्णा : (आतून सुखावते... तरीही विषादपूर्वक) नको .... नको...
केटी० : का नको?
अपर्णा : नको आज! मलाही तेवढंसं बरं वाटत नाहीए.
केटी० : का?
अपर्णा : आज सतीश येणार आहे मला भेटायला!
केटी० : तुझा सतीश? गुड हेवन्स!
अपर्णा : घर सोडल्यापासून पहिल्यांदाच येतोय्. मला तर भीतीच वाटतेय्! त्याला पाहिल्यावर माझी काय अवस्था होईल, देव जाणे!
केटी० : मी थांबू का संध्याकाळी?
अपर्णा : नको! तू नसतानाच भेटायचंय्, म्हणाला.
केटी० : ठीक आहे! पण तुला आनंद व्हायला हवा, सावू....घाबरतेस कसली?
अपर्णा : इतक्या वर्षांनी दिसणार म्हणून, रे....गेल्या आठवड्यात तीनशे रुपये पाठविले होते मी त्याला...बीएला फर्स्ट क्लास मिळाला, म्हणून!
केटी० : (त्याला मनापासून बरं वाटतं.) गुड् गुड्! आय् ॲम व्हेरी हॅपी फॉर यू, सावू....आज तुझा वाढदिवस ना? विश् करायला येत असेल तो नक्की! (सावूच्या चेहऱ्यावरही आनंद) हीच महत्त्वाची बातमी सांगणार होतीस तू?
अपर्णा : नाही. तू जेवायला येशील, तेव्हा सांगेन.
केटी० : आत्ताच का नाही सांगत?
अपर्णा : तुझी काय प्रतिक्रिया होईल, कोण जाणे!
केटी० : बस पाहू! हं सांग. व्हॉट इज इट, सावू? सावू, काय एवढं सांगणारेस?
अपर्णा : तू ओळख.
केटी० : मी कसं ओळखणार?
अपर्णा : तू अगदीच हा आहेस, केटी!...
केटी० : काय?

[अपर्णा त्याच्या कानात सांगते.]

केटी० : ( अगदी कठोर थंडपणे ) ते कसं शक्य आहे ?

अपर्णा : का ? का नाही ?

केटी० : ( शांतपणे ) मी तुला पूर्वीच सांगितलं होतं, सावू ! माझं ऑपरेशन झालंय्, म्हणून !

अपर्णा : ( रडवेली होत ) पण फेल होतं एखादं ऑपरेशन, केटी !

केटी० : हल्ली कधी गेली होतीस ?

अपर्णा : कुठं ?

केटी० : श्यामूकडे ?

अपर्णा : मी त्याच्याकडे कधीही गेलेले नाही ! यू नो इट व्हेरी वेल् ! फक्त चार वर्षांपूर्वी...सतीश एसेस्सीत अठ्ठाविसावा आला, तेव्हा एकदा...त्याला ...सतीशला म्हणून भेटायला गेले होते.

केटी० : पण हे मला, सावू आज प्रथमच कळतंय्.

अपर्णा : त्यात सांगण्यासारखं काय आहे ? ( ती रडू लागते. )

केटी० : ओके...ओके ! दॅटस् ऑल राइट, सावू ! त्यात एवढं रडण्यासारखं काहीही नाही ! अपर्णा, आय् अॅम् सॉरी ! मी जरा मूर्खासारखं बोललो ! आय् डिटण्ट मीन टु ! पण हे ऐकून मलाही एकदम शॉक बसला ( तिला जवळ घेत ) एनी वे.... डू नॉट वरी ! इट् कॅन् बी अटेण्डेड् टु ईझिली...

अपर्णा : मी गर्भपात करून घेणार नाही !

केटी० : यू विल् हॅव टु ' . आपल्याला ते नकोय्, सावू !

अपर्णा : मला ते हवंय्.... !

केटी० : डोण्ट बी रिडिक्युलस् !

[ तो खूप अस्वस्थ होतो. निघून जातो.
अपर्णाला एकटेपणा असह्य होतो. संगीत. तेवढ्यात सुषमा येते. ]

अपर्णा : या, सुषमाबाई...तुम्ही त्या शांताबाईंच्या मोर्च्यातून वटपूजेला नाही गेलात ? हाच नवरा जन्मोजन्मी....

सुषमा : छे ! मी नाही हल्ली जात !.... ( थांबून ) तुम्हांला शुभेच्छा

देते....वाढदिवसाच्या...आज तुमचा वाढदिवस...! ( सावूचा हात हातात घेते आणि शुभेच्छा देते. तिला जवळून न्याहाळते. )

अपर्णा : एवढं काय बघताय् निरखून ?

सुषमा : काही गडबड आहे ?

अपर्णा : कसली ? ( अतिशय संयमाने ) छे, हो !

सुषमा : शांताबाईसुद्धा मला विचारत होत्या.

अपर्णा : त्या आता इथं तर हल्ली येतसुद्धा नाहीत !....त्यांना का चौकशा ? पाहून न पाहिल्यासारखं करतात रस्त्यावर भेटल्या, तरी !

सुषमा : पण मला, अपर्णाबाई, संशय येतोय् !

अपर्णा : छे, हो !... ते जाऊ दे !...सुषमाबाई, तुमचा कधी वाढदिवस ?

सुषमा : ( वैतागून ) आमचा कसला वाढदिवस ?....आमचा आता काढ-दिवस ! तुमच्यासारखं आमचं कुठाय् ?

अपर्णा : पुरे ! एवढं काही तुमचं वय झालेलं नाही !

सुषमा : वयाचं नाही ! पण काळज्या करून करून एकदम म्हातारपण येतंय्....आता डोळ्यांत तेल घालून एवढी जप जप जपली....पण शेवटी कार्टी गेलीच न पळून ! ऊठसूट त्या विद्या चोणकरकडे जायची....मी तिथं पाळत ठेवीत होते...तर ही दुसऱ्याचबरोबर पळाली !

अपर्णा : पण हा सुभाष देशमुख, मुलगा बरा आहे ना ?

सुषमा : तेवढंच आपलं नशीब म्हणायचं ! आहे चांगला इंजीनियर ! चांगलं सोकेरी घराणं आहे...चौकशी केली मी ! पण मी म्हणते, पळून जायची गरज काय ? मी काय मोठा विरोध केला असता ?

अपर्णा : तिला वाटलं असेल...तुम्ही विरोध कराल, म्हणून !

सुषमा : आणि केला असता विरोध; पण हल्ली आईबापांच्या विरोधाला विचारतं कोण ?

अपर्णा : पत्र वगैरे नाही ? नागपूरला असते ना ? • • • ३

सुषमा : दोन ओळींचं पत्र नाही ! कशा या पोरी एकदम संबंध तोडतात ? ( विकटपणे हसत ) मी हे विचारणं चूकच म्हणा !....मी अठराव्या वर्षी तेच केलं !....

सुषमा : जाऊ दे ! जावई बरा आहे, तेवढंच सुख ! नाही तर नाटकवाला,

सिनेमावाला पकडला असता, म्हणजे ? आमच्या ऑफिसातल्या एकीच्या मुलीनं मोटार गॅरेजमधला मुलगा गाठलाय् ! दीडशे रुपये पगार, आपण काय खाणार आणि बायकोला काय घालणार ? आख्खा दिवस निळे कपडे... आणि अंगाला पेट्रोल आणि ग्रीजची चिकट घाण !...त्यापेक्षा हा देशमुख बरा ! इंजीनिअर आहे...

अपर्णा : इंजीनियर लोकांना पगार बरे असतात...

सुषमा : पण ती नाही, तर घर इतकं खायला येतं....काही विचारू नका.... आता एकटी झाले ना मी ?

[ तेवढ्यात फोन वाजतो. सावू फोन उचलते. फोनवर पलीकडे सतीश. ]

अपर्णा : ( फोनवर ) हॅलो...कोण ? ( आनंदाने ) काय, रे, सतीश ? ये ना ये...ये....नाही, केटी नाही. ( फोन ठेवते. ) सतीश येतोय्, संध्याकाळी यायचा होता; पण, आत्ताच येतो, म्हणाला.

[ सावू पसारा आवरायला लागते. तिची धावपळ सुषमा पाहते आहे. ]

सुषमा : पहिल्यांदाच येतोय् ना ? बरं झालं, बाई ! दोन-तीनदा रस्त्यात भेटला होता. सांगितलं होतं मी माझ्याकडून – आईच आहे तुझी ती ! येत जा भेटायला अधूनमधून ! पण न ऐकल्यासारखं केलं...

अपर्णा : ( एकदम रडवेली होते ) खरं तर तेव्हा त्यानं माझा अपमान केलाय्. त्याच्या मनात माझ्याबद्दल आई म्हणून कसलीही भावना नाही....आज येतोय्... ( तिला रडू फुटते. )

सुषमा : ( तिचे सांत्वन करीत ) रडू नका ! हल्लीची पोरंच ही असली !... त्यांना आईबापांबद्दल काडीमात्र प्रेम नाही ! ही आमची कार्टी बघा ! न सांगता, न सवरता त्याचा पटकन् हात धरून नागपूरला पळाली ! काय आहे तिला आपल्या आईबापाचं ?

[ सावू रडू लागते व थोड्याच वेळात रडू आवरते. ]

अपर्णा : ( रडक्या आवाजात ) बी. ए. झाला ! कळवलंय् त्यानं मला ! एसेस्सीत अठ्ठाविसावा आला...काय मला आनंद झाला नसता ? कळवलं मला ? ( रडते ) इथं तुम्हांला, शांताबाईंना.... सगळ्या बिऱ्हाडांत पेढे देऊन गेला...पण इथं आला नाही ! मला तुमच्याकडनं आणि बाळारावाकडनं कळलं ! तरी अपमान गिळून मी श्यामूच्या खोलीवर गेले !...श्यामूनं दारातच मला उभी करून सतीश पुण्याला ट्रिपला गेलाय्, म्हणून सांगितलं! आल्यावर पाठवतो, म्हणाला.... आला नाही ! आता बी. ए. झाला, म्हणून कळवलं, पारितोषिक म्हणून मी तीनशे रुपयांची मनीऑर्डर केली... गेल्या आठवड्यात...( वेगळ्या आवाजात ) आज इतक्या वर्षांनी येतोय्...आपण-हून ! स्वतःचा मुलगा आपणहून भेटायला येतोय्, या कल्पनेनंच मला इतकं गलबलल्यासारखं होतंय्. काय, हो, ही माझी स्थिती !

[ सुषमा तिच्या या स्थितीकडे पाहत राहते आणि एकदम विचारते. ]

सुषमा : काय झालंय् आज, अपर्णाबाई ? सतीश येणार, हेच फक्त कारण नसावं....

अपर्णा : ( थोडी थांबून ) तुम्हांला संशय आला, तो खरा आहे, सुषमाबाई... पण केटीला मूल नको आहे. ' डोण्ट बी रिडिक्युलस.... ' असं म्हणाला तो....

सुषमा : त्यात त्यांचं काय चुकलं ? नाव कुणाचं लावणार तो ? नाही म्हटलं, तरी बरीच फरफट झालेय् सगळ्यांची... आणखी लहानगा जीव त्यात कशाला गोवायचा ?

अपर्णा : यातही सगळा दोष माझाच ? मी पळून जाणार आईसारखी, म्हणून लहानपणापासून सगळ्यांनी बोटं दाखवली— शेवटी श्यामूच मला सोडून गेला. तो हटवादीपणानं नाही का वागला ? पण बायजी त्याच्या घरी जाणार— माझ्याकडे फिरकणारसुद्धा नाही. सतीशही त्याचाच ! केटीला त्याचा संसार सोडायला मी लावलं का ? पण तो घरी जाणार, आपल्या बायकोमुलांना भेटणार....त्याची मुलं मात्र माझ्याकडे येणार नाहीत.

सुषमा : बायकांचा जन्म— दुसरं काय ?

अपर्णा : अखेर या संसाराचा अर्थ काय ? पति–पत्नीतल्या नात्याचं खरं रहस्य काय ?

सुषमा : शांत व्हा तुम्ही, अपर्णाताई. सतीश येईल आत्ता. जा, तोंड धुवा. त्याच्याशी बोला मोकळ्या मनानं. संसार–सुख निखळपणे कोणाला मिळतंय् हो ? जा. ( सावू आत जाते. बेल वाजते. आत गेलेल्या सावूला ) मी उघडते दार.

[ सतीश येतो. सुषमाला पाहून चमकतो. ]

सुषमा : ये, सतीश, बैस ना.

[ तो उभाच. सतीश आल्याचं सावूला सांगते. ]

सुषमा : मग आता पुढं काय करायचं ठरवलंयस् ?

सतीश : अजून नक्की काही नाही ! पण आय्‌एएस्‌ला जायचा विचार आहे !

सुषमा : माझ्या मुलीचं– वैशालीचं लग्न झालं, कळलं ना तुला ?

सतीश : हो ! शांताबाई म्हणत होत्या काही तरी बायजीला.... ( त्याचे बोलण्याकडे लक्ष नाही. )

सुषमा : ( आपल्याशी बोलण्यात त्याला इंटरेस्ट नाही, हे लक्षात येऊन ) मी निघते आता. येते, हो, मी, अपर्णाबाई ! ( जाता जाता थांबून ) आईशी नीट बोल ! मनःस्थिती ठीक नाही तिची.

[ सतीश न ऐकल्यासारखं करतो. ती जाते. थोड्या वेळानं सावू येते. ]

अपर्णा : बस, रे, सतीश ? खाणार का काही ? पटकन् करून देते.

सतीश : नको. ( तिच्या हातात पाकीट देतो. तिला वाटते, वाढदिवसाची भेट असावी. ) मोजून घे, तिनशे आहेत.. परत मला पैसे पाठवू नकोस... आणखी एक गोष्ट....परवाची सनसनाटी बातमी वाचली.

अपर्णा : केटीच्या स्टुडिओत सध्या संप चालू आहे. त्या कामगारांनी तो फजीलपणा केलाय्.

सतीश : बाबा म्हणाले तसं– फाजीलपणा तुम्ही केलाय्. कामगारांनी फक्त आगाऊपणा केलाय्.

अपर्णा : अरे, काय बोलतोहेस ?

सतीश : तुझ्या फोटोखाली सौ. अपर्णा श्यामसुंदर खांडेकर असं नाव छापलं.य तू माझ्या बाबांचं नाव लावून आमची बेअब्रू का करतेस ? तू त्या केटीचं नाव का नाही लावत ? तसंच ते पोस्टर....नाव लावतेस बाबांचं आणि त्य केटीची मार्लिन मन्रो....(अपर्णा सावध) मी काय सांगतोय्, ते नीट ऐक... यापुढे कधीही दुवा सांधायचे प्रयत्न करू नकोस....कधीही आमच्याकडे येऊ नकोस !

[सतीश निघून जातो. त्याला पाठमोरा बघता बघता तिला तिने आईला घालवून दिले होते, तो प्रसंग आठवून ते टेपवर ऐकू येते. ते ऐकू येता येता हळू हळू काळोख.]

(काळोख)

(प्रकाश)

[अपर्णाचे घर. वेळ संध्याकाळची. खोलीत या क्षणी कुणी नाही. दुसऱ्या क्षणी आतून बाळाराव तांब्या आणि फुलपात्र घेऊन येतात. एका खुर्चीत किंवा कोचावर बसतात. पुढ्यात तांब्या–फुलपात्र ठेवतात. कोटाच्या आतल्या खिशातून ब्रँडीची चपटी बाटली काढतात. फुल-पात्रात ब्रँडी ओततात. पाणी ओततात. आणि स्वतःशीच 'चीअर्स' असे म्हणत घोट घेतात. मग उठतात. आणि मेजावरच्या टेप–रेकॉर्डरचे बटण दाबतात. एक सुंदर गीत सुरू होते. चांगल्या मोठ्या आवाजात. ते ऐकत, मान डोलावीत, बाळाराव चिरूट पेटवतात. क्षण, दोन क्षण असे जातात. दारात एकदम सुषमा येते. ती ऑफिसातून आलेली आहे. मनीपर्सला झोके देत ती दारात उभी राहते.]

सुषमा : आहेत का अपर्णाबाई ?

[ तिचा प्रश्न टेप-रेकॉर्डरच्या आवाजामुळे बाळारावांना ऐकू येत नाही. म्हणून बाळाराव उठतात आणि टेप बंद करतात. ]

बाळा० : ओ ऽऽ हो ऽ हो ! या.... या, सुषमाबाई....( तिच्याशी शेक हॅंड करीत राहतात. )

सुषमा : अपर्णाबाई आहेत ? ( ती हात सोडवून घेते. )

बाळा० : नाही ! पण येईल ती एवढ्यात ! बसा....बसा ! ( स्वत: बसतात. )

सुषमा : ( आत येत ) त्या येऊन गेल्या का ?

बाळा० : सावूची वाट बघत मी खाली उभा होतो.... ती आली.... तिनं किल्ली माझ्याकडे दिली आणि म्हणाली, ' वर बसा... दोन भाज्या घेऊन येते... ' इथंच नाक्यावर गेलीय्. येईल... बसा !

सुषमा : वायजी यायच्यात ?

बाळा० : छे ! ती इथं येत नाही !

सुषमा : आत्ता भेटल्या होत्या... दत्तमंदिराकडे !

बाळा० : काही विचारीत होती ?

सुषमा : अपर्णाबाईंबद्दल ? नाही ! तुम्ही इथं येता का, म्हणून विचारीत होत्या...

बाळा० : अरे, बाप, रे ! तुम्ही काय सांगितलंत ?

सुषमा : म्हटलं, कधी दिसले नाहीत !

बाळा० : ( सुटकेचा सुस्कारा सोडून ) वा ! व्हेरी गुड ! शाब्बास ! ...फार संशयी आहे ती ! बसा ना !

[ ती बसत नाही. ]

सुषमा : तुम्ही पिताय् का ?

बाळा० : हो ! का ?

सुषमा : एकदम उग्र वास आला ! ( थांबून ) एक विचारू का, बाळाराव ?

बाळा० : विचारा ना !

सुषमा : ही पिऊन काय मिळतं ?

बाळा० : पिऊन काय मिळतं? (कोग्या चेहऱ्याने) काही मिळत नाही!
सुषमा : मग माणसं का पितात?
बाळा० : त्यांना काही मिळवायचं नसतं, म्हणून! (स्वतःशीच हसत) मी पितो, म्हणजे... जरा किक् येते... आणि रात्री पडलो, की झोप येते.
सुषमा : (आनंदाने) आमच्या विश्रामनं दारू सोडली.
बाळा० : म्हणता काय, सुषमाताई? दारू सोडली? (उठतात आणि शेकहँड करतात. बराच वेळ तिचा हात हालवतात) कॉंग्रॅच्युलेशन्स्, कॉंग्रॅच्युलेशन्स्!
सुषमा : (हात सोडवीत) मी त्याला सांगितलं...

[ तेवढ्यात अपर्णा येते. हातात पिशवी आहे. ]

अपर्णा : कुणाला सांगितलं? (थकलेली आहे. चेहरा हताश)
सुषमा : विश्रामला, हो... म्हटलं, यापुढं दारूला स्पर्श केलास, तर मी गच्चीवर जाऊन मागं स्मशानात उडी टाकीन आणि जीव देईन!... (सावू थंड, थिजलेल्या नजरेने सुषमाकडे पाहते.) हल्ली.... वैशाली पळून गेल्यापास्नं तो एकदम हळवा झालाय्! (हसत) त्या दिवसापास्नं त्यानं दारूला स्पर्श केलेला नाही!
बाळा० : त्यांनी पुन्हा दारूला स्पर्श केला असता, तर तुम्ही खरीच मागं स्मशानात उडी मारली असतीत?

[ सावू आत जाते. ]

सुषमा : या स्मशानात उडी टाकली नसती...क्रिस्तावांच्या स्मशानात आपण कशाला मरा? पण झोपेच्या गोळ्या खाऊन जीव दिला असता! ...पोर पळाली.... नवरा झिंगून पडणार.. जगायचं कशाला? (बाळाराव तिच्या तोंडाकडे बघत राहतात) बघताय् काय?
बाळा० : (भारावून) असं तुमचं एकमेकांवर प्रेम! असंही प्रेम असू शकतं, यावर विश्वास नाही बसत! बायजानं मला अशी धमकी दिली असती,

तर मी सोडली असती का? अर्थात ती तशी धमकी द्यायचीच नाही' म्हणा!

[ सावू बाहेर येते. ती अतिशय गंभीर आणि विचारमग्न आहे. ]

अपर्णा : ( सुषमाला ) तुम्ही कधी आलात?

सुषमा : ही आत्ताच! बसले सुद्धा नाही...म्हटलं, तुम्हांला एक आनंदाची बातमी सांगावी...तुम्हांला खूप आनंद होईल...

अपर्णा : कसली? ( तिच्या चेहऱ्यावर कसलेही भाव नाहीत. )

सुषमा : ( ती भयंकर प्रफुल्लित होते ) अहो, आज त्या कार्टीचा...वैशालीचा, हो...ऑफिसमध्ये फोन आला होता मला...नागपूरहून.... ( दोन्ही हातांनी स्वतःलाच मिठी मारल्यासारखे करीत ) इतकी अगदी मला आनंदानं मिठी मारल्यासारखी बोलत होती....मला खूप खूप बरं वाटलं, बघा! अगदी सुखात आहे पोर! सुभाषराव सुद्धा बोलले माझ्याशी....आम्हांला बोलावलंय् त्यांनी नागपूरला! ... चार खोल्यांचा फ्लॅट आहे....ओनरशिपचा ... इंजीनिअर आहेत ते...! असे तसे नाहीत...

[ सावू थंड आहे. ]

बाळा० : ( शांतपणे चिरूट ओढत ) मग पळून का गेले?

सुषमा : मीही तिला तेच विचारलं! अग, कार्टे, मग एवढं पळून जायचं काय कारण होतं? आम्ही नसत्या का आनंदानं अक्षता टाकल्या?...असं म्हटल्यावर मग तीही चुटपुटली!

बाळा० : चुटपुटणारच!

सुषमा : अहो, चुटपुटली, म्हणजे काय? लवकर पळायचं, म्हणून दोघं विमानानं पळाली! मी म्हटलं, अग, एवढा खर्च विमानाचा करून असं पळणं बरं दिसतं का?...आगगाडीनं नसतं का पळता आलं? फार फार तर फर्स्ट क्लासचं तिकीट काढून पळा...तेवढीच घाई असेल, तर! खुळी पोरं!

बाळा० : असू दे ! ( पीत ) त्यात सुद्धा गंमत आहे, सुषमाबाई ! (भारावून) पुढल्या आयुष्यात कधी आठवण झाली, म्हणजे त्यांच्या मनाला पंख फुटतील !...पंख... !

सुषमा : बाकी एक बरं झालं ! माझी पोर चांगल्या घरी पडली ! शाळूला कळलं, म्हणजे तिची घमेंड उतरेल...तिच्या थोरल्या पोरीचं कुठं जमत नाहीए ! आणि चार पोरी पदरात आहेत !...फीर...फीर, म्हणावं, मोटरीनं नाक उडवीत !

[ कारंजी उडाल्याप्रमाणे तिचा आनंद उसळत असताना ती एकदम थिजल्यासारखी होते. कारण सावू एकदम थंडपणाने, काही ऐकूच न आल्यासारखी ऐकते आहे, हे सुषमाच्या लक्षात येते. ]

सुषमा : ( एकदम गंभीर होत ) तुम्हांला आज बरं वाटत नाहीए का, अपर्णाबाई ?

अपर्णा : छे ! काही नाही !....थोडा थकवा !

सुषमा : केटीसाहेब ऑफिसात तरी भेटले, की नाहीत ?

अपर्णा : आला नव्हता !... येईल... !

बाळा० : तू बस ना, सावू, शांतशी...

सुषमा : मी येते. स्वैपाक व्हायचाय् ! विश्रामला हल्ली लवकर जेवण लागतंय् ( जाते. )

बाळा० : ( सावूला ) हा एक आनंद असतो, नाही ? हा आनंद विलक्षण आहे ! ( स्वतःशीच, फुलपात्र उचलून ) हा आमच्या नशिबी नाही ! ( पितात. सावूकडे निरखून पाहिल्यासारखे पाहतात. सावू बसून राहते.... थिजून गेल्यासारखी. ) सावू, तू आज अशी गप्प गप्प का ?....

अपर्णा : ( शांतपणे ) माझ्या आयुष्यात...बाळाराव...उलथापालथीचा काळ आलाय् .

बाळा० : काय झालं, सावू ? ( चिंताग्रस्त होतात. )

अपर्णा : आजचा दिवस माझ्या ऑफिसातला शेवटचा....

ळा० : का ?

अपर्णा : 'ब्ल्यू बर्ड,' 'सनराइझ'मध्ये मर्ज होतेय्. निश्चित झालं ! 'सनराइझ'चा पटेल येतोय्....केटीला घालवलंय् त्यानं...मी केटीची, म्हणून तो आज ना उद्या मला घालवणारच...म्हणून मी राजिनामा देऊन टाकला.

बाळा० : तू केटीची, म्हणून...

अपर्णा : आता मी केटीची किती ?... आणि किती दिवस, हाही प्रश्नच आहे.

बाळा० : (दचकून) का ?... काय झालं ? सावू, काय झालं ?

अपर्णा : तसं झालं काहीच नाही ! पण नकळत काही तरी होत राहतं... बाळाराव ! काय, ते कळत नाही.. हल्ली अधून मधून चार चार दिवस तो इथं येत नाही. गेले आठ दिवस तो इथं आलेला नाही...बाहेरगावी जाणार, म्हणाला...पण तो इथंच आहे !...त्याच्या मुलीचं लग्न ठरलंय्...ते निमित्त करून मला वाटतं...

बाळा० : स्वगृही जातोय् ?

अपर्णा : जाऊ दे !...प्रेमाचे संबंध जबरदस्तीनं टिकवता येत नाहीत– तो जातो, म्हणाला...तर जाऊ दे ! (थोडा वेळ थांबून) अलीकडे मला वाटायला लागलंय्...माझं सुरुवातीपासूनच काही तरी चुकत गेलं. मी जे काही केलं, ते कुणाच्या सांगण्यावरून नाही केलं. आपणहून केलं. तरी सुद्धा कित्येकदा वाटतं, कुणा तरी अज्ञात हातांनी मला ओढत ओढत इथवर आणलंय् ! सतत मग मला भीती वाटायला लागते...बेचैन वाटतं...आता आपलं पुढं काय होणार, असं वाटायला लागतं !

बाळा० : (फुलपात्रात मद्य आणि पाणी ओतत) हे बघ, सावू ! मी तुझ्यापेक्षा बरेच पावसाळे जास्त पाहिलेत ! (पितो) तुला एक सांगतो.... आपलं काही तरी चुकत गेलं, हा निष्कर्ष शेवटी वय होत आलं, की सगळ्यांच्याच प्राक्तनात असतो. तू श्यामूबरोबर राहिली असतीस, तर लोकांनी तुला सुखी समजलं असतं...तू सुखी झाली असतीस किंवा झाली नसतीसही !...केटीबरोबर सुद्धा तू सुखी होऊ शकली असतीस... किंवा नसतीसही ! ठरवून, शोधून सुखाच्या वाटा सापडतातच, असं नाही.... आणि नाही म्हणावं, तर काही जण आपसूक त्या वाटेवर येतात !...सो .. सावू....(पिनात) डू नॉट गेट् डिसहार्टण्ड् ! फेस इट् अ‍ॅज इट कम्स् !

(एकदम पिऊन) अर्थात हे सगळं सांगणं सोपं असतं.... आणि म्हणूनच मी ते सांगतोय्...

[फोन वाजतो. सावू उठते. आणि फोन घेते. पलीकडे फोनवर केटीचा मुलगा.]

अपर्णा : (फोनवर) हॅलो ऽऽ आपण कोण?... अरे, केटींचा योगेश का, रे, तू? आवाज किती सारखा आहे!... तुझ्या वहिणीचं... योगिताचं लग्न ठरलंय, ना, रे?...कुणाशी? (काहीही वैतागून) तुझे बाबा इथं नाहीत...तुमच्या घरी आले होते?...रागिणीबाईंना भेटायला? नाही, रे ....ते इथं नाहीत?...गेले आठ दिवस त्यांचा पत्ता नाहीए... (सावू 'हॅलो....हॅलो' करीत असतानाच तो पटकन् फोन बंद करतो. बसता बसता) योगिताचं लग्न ठरलंय्...तर कुणाशी, ते सांगायला तो तयार नाही!

बाळा० : (मद्य चढल्यामुळे डोके खाली झुकते) तुला, सावू, आनंदाची एक बातमी...एक का? आनंदाच्या दोन बातम्या कळल्या, की नाहीत?

अपर्णा : कुठल्या?

बाळा० : तुझा सतीश आय्.ए.एस्. झाला! (ती शांतपणे ऐकते) आणि त्याचं लग्न ठरलंय्.

अपर्णा : (थोडा वेळ शांत राहते...आणि) मला वाटलंच होतं....त्यानं ठरवलं असावं, म्हणून.

बाळा० : भेटला होता?

अपर्णा : दोन दिवसांपूर्वी दोघं चर्चगेटला दिसली होती. न पाहिल्यासारखं करून निघून गेला...अंगावरून....

बाळा० : पाहिलं नसेल त्यानं.

अपर्णा : पाहिलं होतं. त्यानं तिला काही तरी सांगितलं....कारण ती वळून वळून मला पाहत होती.

बाळा० : मूर्ख आहे! हा मॅड पोर उद्या कलेक्टर होणार....काय ॲडमिनिस्ट्रेशन बघणार परमेश्वर जाणे! एनी वे...तू मनाला लावून घेऊ नकोस!

[ ती तोंड पुसण्याचे निमित्त करून डोळे, नाक पुसते. काही क्षण शांतता. ]

अपर्णा : मुलगी कुठली ?

बाळा० : गौरी टिळक !... चांगली आहे मुलगी !... तिचे वडील डॉ. टिळक... प्रख्यात सर्जन आहेत !...परवा आला होता.

अपर्णा : कोण ?

बाळा० : सतीश....! तेव्हा सासऱ्याची स्तुती करीत होता ! नेहमीच जावयाला सासऱ्याचं आणि सासूला जावयाचं भारी प्रेम ! सारखं आपलं 'ते टिळक प्रख्यात आहेत....हे टिळक प्रख्यात आहेत....' म्हटलं, लोकमान्य टिळक का ? ( हसतात. ) तसा गप्प राहिला !

[ सावू सहज गॅलरीत जाते .... बाहेर बघते. तिला केटी येताना दिसतो. ]

अपर्णा : केटी येतोय्...

बाळा० : मी आत बसू का ?

अपर्णा : नको ! मला वाटतं....तुम्ही आता गेलेलं बरं ! रागावू नका !

बाळा० : ( उठत ) नो...नो.... मी उद्या—परवा येईन.... ( तिच्याशी हस्तांदोलन करीत ) फेस इट् ॲज इट् कम्स् ! ( हात सोडतात. जायला वळतात. केटी येतो. )

केटी० : ( कृत्रिम आनंदाने ) ओऽऽ होऽऽ ! बाळाराव ! किती दिवसांनी भेटताय् ?

बाळा० : मी मधून मधून येत असतोच ! तुम्हीच इथं नसता ! अहो, आम्ही काय ? रिटायर्ड ! टायर्ड...ॲंड रिस्टायर्ड !

केटी० : ( हसत ) फुलपात्रातून तीर्थ वगैरे...झालेलं दिसतंय् ?

बाळा० : आमचं आपलं देशी तीर्थ... राजापूरची गंगा !... तुमचं ते साहेबी तीर्थ... तुमच्याबरोबर बैठक होते, तेव्हा... यावेळची वटपौर्णिमा तुम्ही चुकवली !

केटी० : सगळीच गडबड ! त्यात ती वटपौर्णिमेची पार्टी राहूनच गेली !
बाळा० : डोण्ट वरी ! नेक्स्ट इयर... बरं, सावू, मी उद्या–परवा येईन. फेस इट् अॅज्...
केटी० : ( बाळारावांना कपाट उघडून बाटली देतो. ) टेक् धिस...घेऊन जा !
बाळा० : ( कागद काढून बघतात ) 'व्हाइट हॉर्स !' ( कागद गुंडाळत ) हॉर्स पॉवर ! ( हसतात ) थँक्यू...थँक्यू. केटी...बाय्...बाय्...( जातात. )
केटी० : ( त्यांना पाठमोरे बघत ) खरा सुखी माणूस आहे ! ( दार बंद करतो. ) सो ऽ ऽ, सावू ? माय डिअर... हाऊ आर् यू ?
अपर्णा : फाइन्... ( ती बाजूला बसते. )
केटी० : गुड् !... ( सुस्कारा सोडतो. )
अपर्णा : योगेशचा फोन आला होता....तू इथं आहेस का, ते विचारायला....
केटी० : कधी ?
अपर्णा : दहा–पंधरा मिनिटं झाली असतील.

[ केटी उठतो व फोन करतो. ]

केटी० : ( फोनवर ) हॅलोऽ योगेश... काय, रे... असं का ? मी दहा वाजेपर्यंत येतोच घरी ! नाही नाही, मम्मीला म्हणावं, उगीच धावपळ करू नकोस. मीच जाईन एअरपोर्टवर... ( फोन ठेवतो. )

[ सावू हे सगळे पाहते आहे. ]

केटी० : पटेलकडे गेलो होतो. माझ्या सगळ्या सेटलमेंटसाठी ! तुझा राजिनामा स्वीकारल्याचं त्यानंच मला सांगितलं. यु हॅव् डन् ए वाईज थिंग ! मी तिथं नाही, म्हणजे तुला त्रासच झाला असता. डोण्ट गेट डिस्हार्टण्ड् ! आय् विल फाइण्ड आऊट समथिंग फॉर यू !... तुला स्वतंत्रपणे राहता येईल, एवढ्या इन्कमचा जॉब, आय् विल फाइण्ड आऊट फॉर यू ! ( ती शांतपणे त्याला बघत राहते. ) पण मी येइस्तोवर थांबली का नाहीस ? मी ड्राफ्ट

करून दिलं असतं तुझ्या राजिनाम्याचं पत्र ! गेले आठ दिवस मी...

अपर्णा : (पटकन् छद्मीपणे) बाहेरगावी गेला होतास, म्हणून सांगू नकोस...

केटी० : का ?

अपर्णा : तू कुठं होतास, हे मला माहीत आहे.

केटी० : कुठं ?

अपर्णा : स्वगृही ! रागिणीकडे !

केटी० : कुणी सांगितलं ?

अपर्णा : राहवलं नाही, म्हणून फोन केला होता. काळजी करू नकोस... माझं नाव नाही सांगितलं रागिणीला...

[ तो मनातून काहीसा प्रक्षुब्ध होतो, पण बाहेरून दाखवीत नाही. तो राग गिळता यावा, म्हणून तो काही क्षण गप्प राहतो– सिगारेट काढून पेटवतो. दोन झुरके घेतो. ]

अपर्णा : आता परत जाणार आहेस ?

केटी० : हो ! योगिताचा होणारा एक दीर आणि जाऊ अमेरिकेत असतात. ते उद्या पहाटे विमानानं येताहेत. त्यांना रिसीव्ह करायला हवं.

अपर्णा : योगिताचं लग्नं ठरलं ?

केटी : म्हणजे काय ? सांगितलं नाही मी तुला ?

अपर्णा : नाही !

केटी० : आय् अॅम सॉरी ! सुभाष नार्वेकर. पुण्याची फॅमिली आहे. टेल्को-मध्ये असिस्टंट इंजीनिअर आहे.

अपर्णा : उद्या त्या अमेरिकेतल्या नार्वेकरांना घ्यायला एअरपोर्टवर जायचं नसतं, तर राहिला असतास ?

केटी० : अर्थात !

अपर्णा : किती दिवस ? ( केटी काहीच बोलत नाही. ) आठ दिवसांपूर्वी बाहेरगावी जातो, म्हणून दोन बॅगा भरून कपडे नेलेस, ते परत आणले नाहीस, म्हणून विचारलं. ( केटी सिगारेट पेटवतो. ) तू इथं असणार

यावेळी, हे योगेशला कसं कळलं ? की रागिणीच्या परवानगीनं वेळापत्रका-प्रमाणं आलास ?

केटी० : ( चिडतो ) लुक....सावू , यू नीड् नॉट बी जेलस अबाऊट इट् !

अपर्णा : ( निग्रहाने ) हू टोल्ड यू , आय् ॲम जेलस ?

केटी० : ( तिला शांत करीत ) ओके.... ओके ! रिलॅक्स ! या क्षणी तुला माझ्यावर रागवायचं असेल, तर रागाव... माझा कठोर शब्दांत धिक्कार करायचा असेल, तर कर ! आय् वुड रादर वेलकम् इट् ! पण असे पोलिसी प्रश्न विचारू नकोस ! ( ती गप्प बसते. थोड्या वेळाने ) रागिणीनं योगिताचं लग्न ठरवलंय् !.... त्या नवीन घराशी आमचे संबंध जुळणार. योगेशलाही माझ्याबरोबर स्टूडिओमध्ये काम करायचंय् ! उद्या त्याचंही लग्न होईल... सून घरात येईल.... त्या घराशी संबंध येणार.... मग ही आपली रिलेशन्स् सर्वांनाच त्रासदायक होतील... ( थांबून ) व्हॉट् डु यू से ?

अपर्णा : ( शांतपणं ) आय् हॅव नथिंग टु से !

केटी० : पण तुला काय वाटतं ?

अपर्णा : माझा प्रश्न येतोच कुठं, केटी ? यू आर् फॉरच्युनेट ! तू पुरुष आहेस ! म्हणून स्वतःचा उधळलेला संसार तू पुन्हा उभा करू शकतोस ! ....ते भाग्य मला नाही...कारण मी स्त्री आहे !

केटी० : संसार उभा करतोय् , की काय, माहीत नाही. रागिणीचे आणि माझे संबंध दुरावलेलेच राहणार आहेत. आम्हांला दोघांनाही ते ठाऊक आहे... पण योगिता आणि योगेशचा विचार नको का करायला ? सतीश तुझ्याशी नीट वागत नाही, म्हणून....नाहीतर तू त्याच्यासाठी केलं नसतं का धावून धावून ! मी तुला अडवलं असतं का ?

अपर्णा : खोटी कारणं सांगून श्यामूकडे आठवडाभर जाऊन राहिले असते, तर चाललं असतं ?

केटी० : तुला खोटी कारणं सांगावी लागतील, अशी परिस्थितीच मी निर्माण होऊ दिली नसती. मला वाईट निश्चित वाटलं असतं; पण तुझी ओढ मी नाकारली नसती.

अपर्णा : हे म्हणणं सोपं आहे, केटी ! ते दोघंही मला आजूबाजूला फिरकूही

देणार नाहीत, हे तुला पक्कं ठाऊक आहे !

केटी० : गेलं वर्षभर याच विषयावर या ना त्या कारणांनी आपण शंभरदा तरी बोललोय् ! जे काही झालं, त्याचा दोष कुणाही एकाच्या माथी मारता यायचा नाही. तो सगळ्यांचाच थोड्याबहुत प्रमाणात असणार ! तुला बरं वाटणार असेल, तर मी म्हणतो, या सर्वाला सर्वस्वी जबाबदार मी आहे; पण त्यामुळे प्रश्न सुटणार आहे का ?

अपर्णा : तुला काय म्हणायचंय् ?

केटी० : सुषमा एकदा म्हणाली होती... ते मला नेहमी आठवतं... तरुण वयात आपण शरीरानं विचार करतो.... उतारवयात मनानं विचार करतो ...दरम्यान बरंचसं हातांतनं निसटलेलं असतं !.... ( सुस्कारा सोडून ) एनी वे.... !

अपर्णा : आता शेवटी तुला सांगायचंय् काय ?

केटी० : सावू, आयू होप, यू विल् टेक् इट् ईझी !.... ( थांबून ) सावू, सर्व चांगल्या गोष्टींना शेवट असतो ! तो शेवट आता जवळ आलाय्...

अपर्णा : म्हणजे ?

केटी० : मला वाटतं, आपले हे प्रेमाचे संबंध होते....आहेत....त्यांचा आपण खोलवर विचार करावा !....म्हणजे मनात....हृदयात प्रेम राहील ! मैत्री राहील ! अधनंमधनं आपण भेटूही, इथं किंवा कुठं तरी !....इफ् यू सो डिझायर...! आयू नो, सावू, वी वेअर हॅपी टुगेदर...पण ते सुख आता कुठं तरी निसटतंय् ! ( त्याला पुढे नीट बोलता येत नाही. तो सिगारेट पेटवतो. दोन झुरके घेतो... आणि विचारतो ) तुला, सावू, काही सांगायचंय् ?

[ ती मानेने 'नाही' म्हणते. त्याच्याकडे बघत राहते. तो उठतो. टेबलावरचा सावूचा फोटो उचलतो आणि कागदात बांधतो. ]

अपर्णा : तो कुठं नेतोहेस ?

केटी० : घरी !

अपर्णा : का ?

[ तो काही बोलत नाही. तिच्याकडे फक्त बघत राहतो. तो जाण्याच्या तयारीने उभा असतानाच गदगदल्यासारखा होतो. ती बसूनच राहते; पण आतून हालते. ' झुलना झुलाव 'चे धूसर स्वर ऐकू येत असतानाच काळोख होत जातो. ]

( काळोख )

( प्रकाश )

[ अपर्णाचे घर. सकाळची वेळ. केटी गेल्यानंतर काही महिने लोटले आहे त. मानसी कोचावर बसली आहे. कुठले तरी इंग्रजी मासिक चाळते आहे. तेवढ्यात फोन वाजतो. मानसी उठून फोन घेते. फोनवर ' कोण पाहिजे ?....काय काम आहे ?....शटप् ! ' असे ती संतापून ओरडते आणि फोन खाली ठेवते. ]

अपर्णा : ( आतून ) कुणाचा फोन, ग ?
मानसी : रॉंग नंबर होता, ग...( विषय बदलण्यासाठी ) सावू, तुझा ' मल्टि-मेडिया'मधला इंटरव्ह्यू झाला का, ग ?
अपर्णा : ( आतून ) झाला ! पण काही होप्स् दिसत नाहीत !
मानसी : का ? काय झालं ?
अपर्णा : ( आतून ) अग, गेल्या काही महिन्यांत किती इंटरव्ह्यू झाले ? कुठं काही जमत नाहीए...

[ तेवढ्यात एक छोटासा पुष्पगुच्छ घेऊन संथ चालीने बाळाराव येतात. त्यांच्या हातात छोटी बॅगही आहे. ]

मानसी : या ..या...बाळाराव ! ( ताबडतोब हस्तांदोलनासाठी हात पुढे करते. )
बाळा० : ( आनंदित होऊन, तिचा हात हालवीत ) ओऽऽहोऽऽहोऽऽ ! तुम्ही ! वाः वाः वाः !

मानसी : (हात सोडवून घेत) बसा....बसा....बाळाराव... (बाळाराव बसतात.) काही ड्रिंक वगैरे घेणार ?

बाळा० : ड्रिंक!...नको...नको! सकाळ आहे!...आणि मला ताबडतोब निघायचं आहे...(पण लगेच विचार बदलून) हे बघा, मानसीबाई, थोऽऽडं....! (हाताने दाखवतात) आणि सोडा घालू नका! (मानसी ग्लासात व्हिस्की भरत असताना)...हल्ली कुठं दिसला नाहीत...हल्ली तुमचा पत्ता काय ?

मानसी : (ग्लास देत) पत्ता तोच !

बाळा० : पत्ता तोच ?...आणि नवरा ?

मानसी : (हसत) नवराही तोच !

बाळा० : (स्वतःशीच) चीअर्स.... चीअर्स....! (घोट घेतात) नवराही तोच ? म्हणजे हल्ली तुमचं ते विमेन्स लिबरेशन वगैरे थंडावलं ?

मानसी : काही थंडावलेलं नाही! सगळं चालू आहे! (हसते.)

बाळा० : एकाच नवऱ्याबरोबर ? (ती खळखळून हसते.) तुमचा जर्मन काय म्हणतो ?

मानसी : जर्मन नव्हे, हो! जमन! गुजराती नाव आहे ते....मध्यंतरी त्याला एक हार्ट-अॅटॅक येऊन गेला.

बाळा० : होय ? अरे, बाप, रे! (थांबून) बाकी तुमच्याबरोबर दिवस काढायचे, म्हणजे एखादा-दुसरा हार्ट-अॅटॅक यायचाच ! (ती खळखळून हसते.) आता कसा आहे ?

मानसी : आता ठीक आहे ! (बाळाराव ग्लास संपवून खाली ठेवतात.) आणखी एखादा ?

बाळा० : छे...छे!...(शोधत) सावू कुठं बाहेर गेलीय् ?

मानसी : (आत बघत.) अग, सावू, बाळाराव आलेत...

अपर्णा : (बाहेर येत) काय म्हणता, बाळाराव ?

बाळा० : (एकदम उठून, तिचा हात हातात घेत) सावू, माय डिअर...मेनी ...मेनी...हॅपी...

मानसी : थांबा...थांबा....बाळाराव....

बाळा० : (गोंधळून) काय झालं ? (मानसी बाळारावांनी आणलेला पुष्पगुच्छ

अपर्णाकडे देते. ) हो...हो ! –रिटर्न्स् ऑफ द डे !

अपर्णा : ( हात सोडवून घेत ) थँक्यू...थँक्यू, बाळाराव ! ( मानसीला ) बाळारावांचं एक आहे, मानसी ! बाळाराव हा दिवस कधी चुकवीत नाहीत ! मी लहान असल्यापासून !

बाळा० : ( बसत ) सावू, तुझा चेहरा आज असा का ?

अपर्णा : कसा ?

बाळा० : रात्री चांगली झोप लागली नाही ?

अपर्णा : लागली की !

बाळा० : टेक केअर, सावू ! ( मानसीला ) हल्ली सावू जरा एकटेपणामुळं अस्थिर झालीय्....तिला चांगली झोप येत नाही...भीतिदायक स्वप्नं पडतात....

मानसी : होय, ग, सावू ?

अपर्णा : छे, ग ! काही तरीच बाळारावांचं !

बाळा० : काही तरीच कसं ? सांगत नव्हतीस त्या दिवशी ? ( अपर्णा गंभीर होऊन खिडकीतून बाहेर बघते. ) तू सारखी सारखी त्या स्मशानाकडे बघू नकोस !...आणि त्या परेराबाईचा विचार करू नकोस...

अपर्णा : नाही !...तुम्हांला थोडा चहा आणते !

बाळा० : नको !...आमचं सगळं झालंय् !...मलाही निघायचंय्...(मानसीला) मानसीबाई, जरा माझी ती बॅग द्या ! ( मानसी बॅग देते. ) तुझ्या सुनेचे दागिने दाखवतो ! ( अपर्णा गंभीर. ) सतीशच्या बायकोचे, ग....

[ तरीही ती गंभीर ! बाळाराव दोन–तीन लहान–मोठ्या पेट्या उघडून दागिने दाखवतात. ती ते धड बघत सुद्धा नाही ! पेट्या बंद करून ठेवून देते. उलट अधिक उदास होते. ]

मानसी : सतीशचं लग्न म्हणजे....गंमत आहे, नाही ?

बाळा० : का ? का ?

मानसी : श्यामू आणि सावू या जागेत आली, तेव्हा सतीश एवढासा होता. बघता बघता केवढा मोठा झाला...मग एक प्रकारची हुरहूर वाटते.

अपर्णा : का, ग ?
मानसी : म्हणजे आपण किती म्हाताऱ्या झालो, त्याची जाणीव होते, ना !

[ सर्वजण हसतात. ]

बाळा० : ( दागिने ठेवीत ) चला ! सावू , मी निघतो...
अपर्णा : एवढी घाई कसली, बाळाराव !
बाळा० : आज फतवा निघालाय्...दुपारी लवकर जेवून फडकेवाडीत जायचंय्...तिथं कुठला तरी स्वामी आलाय् !...संध्याकाळी शालू खरेदी करायचेत...काही विचारू नकोस ! ( उठतात. )
अपर्णा : आमंत्रणं छापली ? ( बाळाराव मानेने 'हो' म्हणतात ) कुणाच्या नावानं ?
बाळा० : ( तो प्रश्न टाळत ) नसते विचार करू नकोस ! त्यामुळं तुला, सावू , झोप लागत नाही !....आणि झोपेच्या गोळ्या घेऊ नकोस ! वाईट सवय ती ! ( मानसीला गडबडीने ) मानसीबाई, तुम्ही जरा हिच्या नोकरीचं बघा...तुमच्या जर्मनला सांगा...म्हणजे काय...काही तरी मनाला व्याप हवा...सम् सॉर्ट ऑफ मेंटल ऑक्युपेशन ! ....( निघता निघता ) आणि, सावू , त्या परेराबाईचा विचार करू नकोस....लेट हर गो टु हेल् ! ( घाईघाईने जातात. )

[ अपर्णा त्यांना उदासपणे पाठमोरे बघत राहते. तेवढ्यात फोन वाजतो. मानसी फोन घेते. ]

मानसी : ( फोनवर ).. हो ! आपण कोण ? ( चिडून ) काय फाजिलपणा लावलाय् ? शटप्.... ! ( फोन आपटते. )
अपर्णा : ( चिंताग्रस्त होत ) सारखे फोन येत असतात....रात्री-अपरात्री सुद्धा ! ( स्वत:शीच ) कुणाबरोबर राहिले, तर हसतात...एकटी राहिले, तर सतावतात ! खरोखर एकटीनं राहणं कठीण आहे ! अय्या जरी असती सोबतीला ना....

मानसी : तू खंबीर राहा, सावू ! अशी डगमगू नकोस !...त्या बानी देसाईचं काय झालं ? केटीनं सुचवलं होतं ना ?

अपर्णा : फोन आला होता केटीचा ! पण तो बानी देसाई सॉलिसिटर आहे... मी सॉलिसिटर्सकडे कसलं काम करणार ?

मानसी : अग, त्याच्या कुणी ओळखीचा असेल ॲडव्हर्टायजिंगमध्ये ! भेट तू त्याला....

अपर्णा : तोच 'फोन करीन,' म्हणाला होता.

मानसी : ( उठत ) चल, मी निघू का ?

अपर्णा : बस, ग, थोडा वेळ ! कसली घाई ? आज आपण दोघी मिळून जेवण करू या का ?....कित्ती दिवस झाले, मी भांड्यांना हात सुद्धा लावलेला नाही !

मानसी : नॉट ए बॅड आयडिया !....पण आता नाही ! पुन्हा कधी तरी ! आता मला जाऊन जमनसाठी भाज्या उकडायला पाहिजेत !

अपर्णा : जमन अजून ऑफिसात जात नाही ?

मानसी : जाईल आठवडाभरानं !....अक्षरशः माझे दोन महिने त्याच्या सेवेत गेले.

अपर्णा : तू त्याच्याशी लग्न का करीत नाहीस, मानसी ?

मानसी : तत्त्वासाठी भांडणाऱ्या बाईशी लग्न कोण करणार ? कुणालाही, सावू, बरोबरीची बायको नको असते !....आमच्या या मार्गात नवरा मिळत नाही...मित्र मिळतात !

अपर्णा : तुला हे बरं, बाई, सगळं जमतं ! मला तर भीतीच वाटते....

मानसी : तू सीता-सावित्री ! तुला त्रास होणारच !

अपर्णा : ( स्वतःशीच ) मला वाटतं...माझं काही तरी चुकतच गेलं ! काय आहे, माहीत आहे का ? मी या शांताबाईएवढी मागासलेली नाही... आणि तुझ्याएवढी पुढारलेली नाही ! म्हणून मी लोंबकळतेय् अधांतरी !

मानसी : तुझं कुठं चुकलं, सावू, माहीत आहे का ?....श्यामू गेल्याबर हिमतीनं तू एकटी राहायला हवं होतंस...

अपर्णा : ( गदगदून ) मानसी, मी नाही राहिले एकटी ? चांगली सात-आठ महिने एकटी राहिले—श्यामू परत येईल, म्हणून वाट बघत ! पण एकटं राहणं

वाटतं तेवढं सोपं नाही, मानसी ! रोज रात्री घरी येताना जीव हुरहुरायचा.... भीती वाटायची....धीरासाठी जवळ कुणी तरी असावंसं वाटायचं...त्यावेळी अय्या आली असती, तरी मी तिला ठेवून घेतली असती !

मानसी : म्हणून केटीला गाठलंस....

अपर्णा : मी गाठलं नाही !...तो अधनं मधनं यायचा...मला कंपनी देण्यासाठी...भीती वाटू नये, म्हणून...धीर देण्यासाठी...( थांबून ) एकटं राहणं सोपं नाही ! मोह टाळा...टाळा...सगळे सांगतात ! ते सोपं नाही !... त्या काळात केटीनं मला खूप सावरलं !

मानसी : आणि आता ? ( फोन वाजतो. अपर्णा फोन घ्यायला कचरते फोन घेते ) हॅलो...कोण ? बानी देसाई ? हो...हो ( फोन अपर्णाक देत ) बानी देसाई....

अपर्णा : ( फोनवर ) हॅलो...नमस्कार हो.. हो ! केटीनं फोन केला होत ( ऐकते ) मला सॉलिसिटर्स कंपनीतला कसलाही अनुभव नाही ! ( ऐकते ...आणि ) तुम्हांला कंपनी द्यायची ?...महिना तीन हजार...थांबा... थांबा...माझं ऐका...बानी देसाई...प्लीज, लिसन टु मी ! याचा अर्थ महिना तीन हजार रुपये घेऊन मी तुमची ठेवलेली बाई म्हणून राहायचं ?... लेट मी टेल यू...( चिडून ) नो...नो...हे पाहा, मिस्टर देसाई...तुम्ही इथं यायचं नाही...आणि त्या केटीलाही इथं आणायचं नाही ! मला तुमची दोघांचीही तोंडं बघायची इच्छा नाही ! स्टॉप इट् ! ( फोन आपटते आणि गर्भगळीत होऊन खाली बसते. रडकुंडीला येते...वेडाचा झटका आल्यासारखी स्वतःशीच बरळते. ) हा बानी...मेला...पैशाच्या जोरावर...मला ठेवायला बघतोय्.. मी ठेवलेली बाई होऊ ?... ॲम आय् ए कॉल-गर्ल ? ( डोळे पुसते. )

मानसी : ( तिला थोपटत ) शांत राहा, सावू ! अशीच खंबीर राहिलीस ना, तरच तुझा निभाव लागेल !

[ ती डोळे पुसत असतानाच सुषमा येते. तिच्या हातात जड पिशवी आहे.

सुषमा : मानसीबाई, तुमचाच निरोप घ्यायला मुद्दाम आले.

मानसी : कुठं निघालात ?

सुषमा : आज रात्री आम्ही दोघं नागपूरला जातोय्...मुलीकडे ! (हर्षभराने) जावयानं सासऱ्याला पत्र पाठवलंय् विश्रामला...तुम्हांला मुलगा नाही... मलाच तुम्ही तुमचा मुलगा समजा...आणि पुढलं म्हातारपण माझ्याकडे घालवा, म्हणून ! (आनंदित होते) असा जावई सापडेल कुठं ?...नाही–तर हल्लीचे जावई !...मुलीला नोकरी द्या...राहायला जागा द्या...हुंडा द्या...दागिने द्या !

मानसी : म्हणजे तुम्ही नोकरी...आणि जागा सोडताय् ?

सुषमा : सध्या काही सोडणार नाही !...पटलं, तर बरं ! हल्लीची पोरं ही ! उद्या लाथा घातल्या, तर कुठं जायचं ? खरं ना ? (हसते. मानसीही हसते. सावू गंभीर आहे.) निघते...बांधाबांध करायचीय्...

मानसी : एवढं हे काय घेतलंत ?

सुषमा : पाच किलो कडवे वाल घेतले ! आमचा जावई ! सीकेपी लोकांना कडवे वाल म्हणजे जीव, की प्राण ! (हसते.) येते हो, अपर्णाबाई !

अपर्णा : (उदास होत, डोळे पुसत) तुम्ही गेलात, म्हणजे मला फार उघडं उघडं वाटणार !...

सुषमा : तुम्ही घाबरू नका, अपर्णाबाई ! सगळं सगळं ठीक होईल ! माझ्याही आयुष्यात असे दिवस येऊन गेलेत ! धीर धरा ! आणि त्या परेराबाईचा विचार करू नका ! तुम्ही तो विचार करता, म्हणून तुम्हांला ती स्वप्नात दिसते !.... येते... पोचले, म्हणजे पत्र पाठवीन... (जाते.)

[थोडा वेळ भीषण शांतता. मानसी जाण्याच्या तयारीत आहे. तरीही अपर्णा सुषमालाच पाठमोरी बघत राहते.]

मानसी : (तिला थोपटत) निघू मी !

अपर्णा : (आपल्याच तंद्रीत) शेवटी हिचंही सगळं ठीक झालं !

मानसी : कुणाचं ?

अपर्णा : याच सुषमाचं, ग !... आता आपली मुलगी... आपला जावई यांच्याबरोबर एकत्र राहील.... ती.... तिचा नवरा....

मानसी : मी जाऊ?

अपर्णा : हो! हो! (काही तरी आठवत) मी तुला काही तरी विचारणार होते!

मानसी : काय?

अपर्णा : (भ्रमिष्टासारखी बघते) काय, तेच आठवत नाही! (काही तरी तंद्रीत शोधू लागते.)

मानसी : तू काय शोधते आहेस, सावू?

अपर्णा : (इकडे तिकडे शोधत) मी नेलकटर कुठं ठेवला?

मानसी : बरी आहेस ना?

अपर्णा : मला काय झालंय्?... (शोधत) माझी एक मोठी चूक झाली! (मानसी चक्रावून तिच्याकडे बघत राहते.) अय्या दोनदा माझ्या दारावर आली... मी तिला हाकलून द्यायला नको होतं! तिला ठेवून घेतली असती, तर आज मला आधार झाला असता.

मानसी : सावू, आता मध्येच अय्याचं काय?

अपर्णा : तसं नव्हे, ग! पण अय्या पळून गेली.... पळून गेली, म्हणून आम्ही तिला दोष दिला... पण तिचीही काही बाजू असेल ना?.... ती ऐकायला नको?

मानसी : ती अय्या आता राहते कुठं?

अपर्णा : कोण जाणे, कुठं राहते? (एकदम तिला कोपऱ्यात नेलकटर दिसतो.) हा बघ मिळाला नेलकटर! कुठं तरी ठेवला, ते आठवत होतं....

मानसी : येऊ मी? आणि बघ... त्या झोपेच्या गोळ्या घेत जाऊ नकोस! आणि त्या परेराला कसली घाबरतेस?

अपर्णा : काय भयाण दिसते, ग, ती स्वप्नात... थडग्यात झोपलेली... भयाण डोळे उघडे... ओठ नाहीत... नुसतेच दात!... आणि दातांतून आवाज येतो....

As you are now, so once was I ...
Prepare for death and follow me ...

मानसी : (थोपटत) विचार करू नकोस....

अपर्णा : (भेदरलेली) काल रात्री, ग.... घाबरीघुबरी होऊन मी गॅलरीत

येऊन बसले... रात्री दोन वाजता... कुणीही नाही रस्त्यावर! एकच माणूस शांतपणे... असा.... असा... चालला होता... तो श्यामू असेल का, असा विचार मनात आला... आणि खूप रडले मी!

मानसी : काही तरी वाचत बस! यातून तुला बाहेर पडायला पाहिजे... की माझ्याकडे येतेस?

अपर्णा : (सावरत) छे, ग, मला काहीही झालेलं नाही....(मध्येच एकदम) हल्ली भेटला होता?

मानसी : कोण?

अपर्णा : श्यामू....

मानसी : कालच आला होता....

अपर्णा : सतीशच्या लग्नाचं आमंत्रण द्यायला?

मानसी : हो!

अपर्णा : बोलली नाहीस?

मानसी : तुझ्या मनाला त्रास नको, म्हणून... तुलाही आमंत्रण दे म्हटलं होतं मी त्याला...

अपर्णा : काय म्हणाला?

मानसी : काही बोलला नाही!

अपर्णा : आमंत्रणपत्रिका कुणाच्या नावानं छापलीय?

मानसी : स्वतःच्याच...

अपर्णा : एकट्याच्याच?

मानसी : या गोष्टी तू मनाला लावून घेऊ नकोस! सावू, यातून तुला बाहेर पडायला पाहिजे... (अपर्णा मानसीच्या तोंडाकडे बघत राहते.) अशी काय बघतेस? (ती मानेनं काही नाही म्हणते) मी जाऊ ना?

अपर्णा : जा, ग! मला काहीही झालेलं नाही!

मानसी : आणि झोपेच्या गोळ्या घ्यायच्या नाहीत...

अपर्णा : नाही.... नाही.... नाही! जा तू!

[मानसी जाते. दरवाजा बंद करून अपर्णा तिला गॅलरीतून बघते. मग ती काही क्षण गॅलरीतच उभी राहते. उदास, विदीर्ण होऊन.

हळू हळू काळोख होता होता They are all gone away... ही कविता सूक्ष्मशी ऐकू येते आणि काळोख होतो. ]

( काळोख )

( प्रकाश )

[ खोलीचा दरवाजा बंद असला, तरी मिट्ट काळोखात एक बाई पाठमोरी दिसते. तिच्या हातात छोटासा दिवा आहे. त्या दिव्याच्या प्रकाशात त्या बाईची पाठमोरी आकृती दिसते. आणि तीच म्हणत असल्याप्रमाणे:

As you are now, so once was I,
Prepare for death and follow me....

ह्या ओळी ऐकू येतात.
या ओळी ऐकू येत असतानाच ती वळते आणि पुढे पुढे येते. ती अय्या आहे... अय्याचा तिला भास होतो. ती टेबलावर दिवा ठेवते. सर्वत्र मंद प्रकाश. एका कोचावर अपर्णा झोपलेली दिसते. ]

अय्या : सावू, सावू, मी आल्येय्, ग...

अपर्णा : ( झोपेच्या आवाजात ) कोण.... कोण.... अय्या.... अय्या... ! ( आनंदाने ) अय्या, तू आलीस !... बरं केलंस.... मी तुझीच वाट पाहत होते... मी आता तुला इथनं जाऊ देणार नाही !... अय्या, मला जवळ घे, ग ! जवळ घे ! मला भीती वाटते.... ( अय्या तिला कुशीत घेते. )

अय्या : सावू, माझ्या अंगावर कसा काटा आला, बघ ! इतक्या वर्षांनी मी माझ्या पोरीला जवळ घेतली...

अपर्णा : अय्या, मला एक सांग... अय्या, तेव्हा तू आम्हांला सोडून का पळून गेलीस ?...

अय्या : चकवा, ग, तो, सावू, चकवा तो !

अपर्णा : चकवा ? चकवा म्हणजे ?

अय्या : त्याला चकवा म्हणतात !.... रात्रीच्या पहिल्या प्रहरी दारावर चकव्याची थाप पडते... आणि मागनं हाका ऐकू येतात... आपल्या मित्राची हाक आहे, असा भास होतो... ऐकणारा दार उघडून बाहेर

क्र. १८७१६ दि. ७/५/८३
वि. नाटक

येतो.... बोलत बोलत मित्राबरोबर चालत राहतो.... चालत राहतो... चालता चालता किती दूर आलो, याचं भान राहत नाही! ऐकणारा गुंगून जातो... ऐकता ऐकता अंधारातनं...झाडाझुडपांतनं... काट्याकुट्यांतनं... चालत राहतो.... आणि मग उत्तररात्री एकाएकी चकवा नाहीसा होतो... मग तो बाहेर पडलेला माणूस जागा होतो...कुठल्या तरी नादात आपण दूर दूर कुठं तरी भरकटत आलो.... पार थकून गेलो.... काट्याकुट्यांनी जखमी झालो, हे त्याला कळतं.... खूप उशिरा! याला चकवा म्हणतात... तो चकवा झाला!...

अपर्णा : (झोपेतल्या आवाजात) अय्या, मला झोप येतेय्! तू जवळ झोप! जाऊ नकोस....

अय्या : सावू, तुला मुलं किती?

अपर्णा : (जड आवाजात) एक... सतीश! त्याचं लग्न आहे, ग, उद्या!

अय्या : लग्न? माझ्या नातवाचं लग्न? या अल्ला!

अपर्णा : आपण जायचंय् लग्नाला... लवकर उठून... हा बघ... तुझा शालू... (शालू दाखवते) तुझा शालू नेसणार आहे... तुझी नथ घालणार आहे... (पाठीमागून सनई, मंगलाष्टके सूक्ष्म आवाजात ऐकू येतात.... तेवढ्यात अय्या उठते. दिवा फुंकते. अंधार होतो.) तू कुठं चाललीस, अय्या?

अय्या : जायला हवं मला... रात्र संपतेय्...

अपर्णा : (झोपेतल्या जड आवाजात) अय्या, जाऊ नकोस... जाऊ नकोस, अय्या... थांब.... थाब, अय्या... अय्या, हा शालू बघ.... अय्या, थांब...!

[काळोखातच हे आवाज स्मशानाकडील खिडकीच्या दिशेने ऐकू येतात आणि खिडकीचा लाकडी कठडा मोडून काही तरी जड पडल्याचा आवाज येतो... त्यापाठोपाठ अपर्णाची जोराने एक किंकाळी ऐकू येते. त्याच क्षणी रंगमंचावर धूसर निळसर प्रकाश येतो... त्या धूसर प्रकाशात अपर्णाचा शालू सोफ्यापासून खिडकीपर्यंत... खिडकीतून बाहेर गेलेला दिसतो... दुरून घंटेचे टोले ऐकू येतात आणि They are all gone away ही कविता त्यातच अस्पष्टशी ऐकू येत असतानाच पडदा पडतो.]

तिसरा अंक समाप्त